IRBK-0100559

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र ५५९

IRBK-0100559

५५६२

# आभार.

या नाटकाचा प्रथम प्रयोग भोंसले संगीत मंडळीकडून एल्फिन्स्टन थिएटरांत शनिवार ता २६।४।२४ रोजीं रात्रौ होईल. प्रथम प्रयोगाच्या वेळीं प्रस्तुत नाटकांत भूमिका घेणाऱ्या नटांचीं नांवें—

रामानंद—रा. गणेश गोपाळ वाटवे.

रहीम—रा. भाऊराव तुकाराम जाधव.

मिर्झा—रा. दत्तात्रेय वासुदेव रानडे.

IRBK-0100559

धनानंद—रा. जनार्दन वामन जोशी.

देभ—रा. गोविंद रामचंद्र जोशी.

दयाळ—रा. बाळकृष्ण नारायण पोतकर.

गयाळ—रा. वामन बळवन्त मुळे.

गोरख—मास्टर सदानंद पर्वतकर.

फाजल—मास्टर सदाशिव पडवळ.

पागल—रा. महादेव वामन जोशी.

कृष्णंभट—रा. रामनाथ लक्ष्मण मोरे.

मोहन—रा. त्र्यंबक दत्तात्रेय वाळंदे.

पाटील—रा. पितळे.

रोशन—रा. रामचंद्र कुशाबा गुळवणी.

माया—रा. गोविंद गोपाळ वाटवे.

दया—रा. रघुनाथ माधव क्षीरसागर.

या पुस्तकांतील फोटो दिल्याबद्दल वरील सर्व नटांचा व भोंसः संगीत मंडळीचे मालक रा. भाऊराव जाधव व रा. रामभाऊ गुळवणः यांचा, तसेंच नाटकांतील पदांच्या चाली दिल्याबद्दल सदर रा. जाधव व गुळवणी यांचा मी अत्यंत आभारी आहें. तसेंच माझे स्नेहं प्रख्यात नाटककार रा. आपासाहेब टिपणीस, रा. बाळासाहेब पंडित, रा. शंकर भिकूजी सरकार, रा. बळवन्तराव पेठे, रा. त्र्यं. वा. जोशी, रा. गणपतराव खामकर, रा. वेर्डे एन्ग्रेव्हर, रा. पु. भा. जयवंत, रा. एस. बी. कोकाटे, रा. अबासाहेब कापडी, गजानन स्टोअर्सचे मालक, व माझे बंधु रा. शां. गो. शेट्ये व ज्या इतर गृहस्थांची, हें नाटक मंडळींत बसण्यापूर्वी व बसतेवेळीं तसेंच पुस्तक छापते-वेळीं, जी मदत झाली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

पार्वतीवाडी, माहीम
ता. २२।४।२४ } विश्वनाथ गोपाळ शेट्ये.

---


# सौभाग्यालंकार डेपो

यांची

## सर्वांग सुंदर शृंगार पेटी.

किंमत फक्त रु. ४-८-०

मिळण्याचें मुख्य ठिकाणः—

नोगी आणि कंपनी.

गिरगांव, मुंबई नं. ४.

# राम–रहीम.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

( स्थळः—गोपूर स्टेशन. हिंदु मुसलमान व्हॉलंटीअर. )

नांदी.

[ शुक्ल बिलावल—एकताला. ]

नमन गोकुला । अविरत हा नत जन रत मन ।
पावन वितरित चरणिं माला ॥ नमन गोकुला ॥ ध्रु० ॥
अधरिं मुरलि श्याम तोहि जगतिं जनन घे ।
गोप गोपि गोकुलिं जो भयहर करि ॥ नमन गोकुला ॥ १ ॥

( रोशन प्रवेश करिते. )

**रोशन**—मोहन, जमले का व्हॉलंटीअर्स ? पण गोरख कुठं दिसत नाहीं ?

**मोहन**—गोरख आहे लहरी आणि थिल्लर. छत्रपति शिवाजी महाराजांचें सोंग घेऊन भटकतो आहे सारा गांव.

**रोशन**—आणि आपल्या हिंदु मॉस्लेम युनियनचे प्रेसिडेंट मिर्झा साहेब ?

**मोहन**—ते व इतर पुढारी मंडळी प्लॅटफार्मवर आहेत.

**रोशन**—मग तुम्हीही तिथंच जायचं कीं स्टेशनबाहेर रेंगाळत रहायचं?

**मोहन**—आपलीच वाट पहात गोमातेचं गाणं गात आम्हीं इथं बसलों होतों.

**रोशन**—गाडी नऊ पंधराला यायचीना ? गाडीची वेळ होत आली. मग चला. मेलट्रेन थांबते, त्या प्लॅटफार्मवर चला. ( जाऊं लागतात तों रहीम प्रवेश करतो. )

**रहीम**—हं—सबूर! रोशन—

**रोशन**—कोण, रहीम ?—तुम्ही सारे व्हा पुढं. ही मी आलें. ( व्हॉलंटीअर जातात. )

**रहीम**—रोशन, हे कोण ?

**रोशन**—हिंदु-मास्लेम यूनियनचे व्हॉलंटीअर्स.

**रहीम**—यांच्याबरोबर तूं इथं आलीस ?

**रोशन**—होय—

**रहीम**—कशाला ?

**रोशन**—गोपूर हिंदु-मॉस्लेम यूनियनतर्फे, जीवदयासंघाचे अध्यक्ष रामानंद यांचं स्वागत करायला.

**रहीम**—रामानंदाचें स्वागत ? आणि तें कां ?

**रोशन**—यंदाच्या दारुण दुष्काळांत, आपल्या या गोपूर भोंवतालीं लाखों गोरगरिबांचे आणि गुराढोरांचे प्राण वाचवून, त्यांनीं केलेल्या भूतदयेच्या कामगिरीबद्दल.

**रहीम**—आणि हें स्वागत तूं करणार ?

**रोशन**—होय—

**रहीम**—संबंध ?

**रोशन**—हिंदु मॉस्लेम यूनियनची सेक्रेटरी या नात्यानं.

**रहीम**—पण या रहीमची तूं बहीण आहेस, हें नातं विसरलीस वाटतं ?

**रोशन**—तें मी कसं विसरेन !

**रहीम**—मग माझ्या हाडवैऱ्याचं—कट्ट्या दुष्मानाचं—

**रोशन**—कोण कुणाचा दुष्मन !

**रहीम**—रामानंद माझा कट्टा दुष्मन आहे.

रोशन—हंसेल कुणी ऐकलं तर असं. अरे माणुस माणसाचा वैरी ! राम रहीमचा दुष्मन ? दुष्मनगिरीचं कसलं भलतंच वेड हें !०

( पटदीप—त्रिताला )

मना साहिना । नाशा लाधे मानव हा । जगतीं त्यजी प्रेमा ॥ धृ० ॥ भेदाभेदा पदा न त्या दिसुनि ये प्रभुच्या हृदीं मग मानवा कां ? ॥ १ ॥

तशांत कॉलेजमध्यें होतें तेव्हांपासून रामानंदांना मी चांगली ओळखतें. त्यांच्या इतका त्यागी अन् तेजस्वी पुरुष अलम दुनियेंत तरी आढळेल का ? अशा थोर पुरुषाशीं तुझी दुष्मनगिरी ?

रहीम—कोण त्यागी ? कोण तेजस्वी ? हा रामानंद त्यागी ? हा पाजी परधर्मी पागल रामानंद तेजस्वी ? मुस्लीम धर्माविरुद्ध कारवाई करणाऱ्या एका कावेबाज काफीराच्या स्तुतीचा काथ्याकूट कुणाच्या तोंडीं ? एका मुसलमान स्त्रीच्या ? ही बाटगी बडबड कुणाच्या कानीं ? मुस्लीम धर्माचा अभिमान रोमारोमांत खेळणाऱ्या एका कट्टया मुसलमानाच्या ? संताप होतो हें पाहून ! रोशन, तूं एक गोष्ट विसरतेस. कांहीं झालं तरी रामानंद विधर्मी आहे—काफीर आहे—हिंदु आहे.

रोशन—असेल. पण विधर्मी झाला—काफीर झाला—हिंदु झाला, म्हणून त्याच्याशीं वैर करायचं, हा कुठला धर्म ?

रहीम—मग विधर्मी—काफीर माणसावर प्रेम करायचं हा तरी कुठला धर्म ! हाडाचा प्रत्येक मुसलमान हें पापच मानील.

रोशन—भारीच नवल. विधर्मी माणसावर प्रेम करणं हें पाप ! कोण हा अहंकार ! कुठला हा धर्म ? या धर्मवेड्या जगांत धर्मभोळेपणानं घडून येणारी ही भयंकर चूक नाहीं तर काय ? माणुस धर्मानं हिंदु झाला तरी तो एकाच परवरदिगारचा प्यारा पुत्र आहे, अनुकंपेला पात्र असं अल्लाचं लेकरूं आहे ! ईश्वराला तो अल्ला म्हणत नसेल, ब्रह्म म्हणेल ! रहीम म्हणत नसेल राम म्हणेल ! धर्मसमजुतीच्या या भ्रामक कल्पनेनं अन केवळ भाषाभेदानं माणसानं माणसाचं वैर करावं, या गोष्टीला अल्लाची मंजुरी मिळेल का ? कुराणाला तरी हें संमत होईल का ?

**रहीम**—कां होणार नाहीं ? मुसलमानांच्या कुरबानीला गोवधाची जरुरी आहे. असं असतां या इदीच्या सणांत एकही गाय मुसलमानांना मिळूं द्यावयाची नाहीं, असा चंग जर या रामानंदानं बांधला तर त्याची दुष्मनगिरी मी कां करूं नये ? याच्या या काफीरी कारवाईनं माझा कसाईखाना कसा ओस पडून गेला आहे !

**रोशन**—मग मी म्हणतें हा कसाईखानाच बंद कर.

**रहीम**—वाः, काय पण नामी तोड ? हा कसाईखाना मी बंद करावयाचा—कां ? तर, स्वार्थी गनीम गोरक्षक गफलतीच्या बुद्धीनं तसं म्हणतात म्हणून. गोरक्षणाच्या ढोंगानं साऱ्या महंमदी धर्माचा नायनाट करूं पहाणाऱ्या नादान हिंदूंच्या नादीं लागून त्याच्या कावेबाज काफीरी कारस्थानाला आंतून फूस देणारी तुझ्यासारखी एक घरभेदी स्त्री तसं सांगते म्हणून ! सहा पिढ्या सतत चालत आलेला धंदा तुझ्या या मतलबी मसलतीनं मी बंद करूं ? कसाईखाना बंद करून काय इस्लामी धर्मावर आग पाखडूं ? काय पोटावर बिब्बे वाळूं ?

**रोशन**—कशाला ? सतत सहा पिढ्या याच धंद्यावर कमावलेली जिंदगी काय थोडी आहे ? रहीम, स्वार्थ हा कुणालाच सुटलेला नाहीं. पण त्यागाची महती कांहीं और आहे. अरे, धर्मानं तूं मुसलमान ना ?

( कवाली. )

जब मुसलमान तुं हो तब त्यागिं सदा रम भाई ॥ धृ. ॥ कुरबानी दिला प्यार कधीं त्या त्यागा ना मना । कां न तरी दिल्से प्यार तोहि तुला ॥ १ ॥ इसलामी कुलाचार तुला मानावा ना मना । कां न तरी दिल्से प्यार तोहि तुला ॥ २ ॥

**रहीम**—बस कर ही बेजबाबी बडबड. तुझा हा पोरसवदा सवंग सल्ला मला बिलकुल ऐकावयाचा नाहीं. तूं काय सांगणार तें ऐकायला मी इथं आलों नाहीं. तर मी काय सांगतों तें तूं ऐकावं, आणि माझ्या दिला-

बरहुकूम वागायला तुला भाग पाडावं, असा ठाम निर्धार करून मी या जागीं आलों आहें. रोशन, माझं मस्तक बेफाम भडकलं नाहीं तोंच—

**रोशन**—शांत हो, आणि रामानंदांचं स्वागत करायला माझ्याबरोबर चल.

**रहीम**—त्या हरामजाद्याचं नाव कानीं पडून माझे कान बाटूं नयेत असं या दिलांत असतां, दिमाखानं फिरून फिरून तेच तेच शब्द माझ्यासमोर उच्चारण्याची तुला दिक्कत कशी नाहीं वाटत ? त्या हलकट हिंदूची माझी गांठ आतां एका दुष्मन दावेदारींत ! याला साक्ष एक परवरदिगार ! हिंदुमुसलमानांच्या एकीच्या मिषानं, इस्लामी धर्मावरील हिंदूंच्या दिग्विजयाची नौबत तमाम दुनियेंत पिटण्यासाठीं इदीच्या दिवशीं तुझा तो जिगरदोस्त हिंदुंच्या देवळांतून एक पोळ सोडणार आहे. तो पोळ या हातांनीं कापून मुसलमानांच्या सणाच्या पवित्र दिवशीं, मुद्दाम होऊन पोळ सोडण्यांत, मुसलमानांना अपशकुन करूं पहाणाऱ्या, त्या दोन पायांच्या पाजी पोळाचं चांगलं नाक कापीन तरच रहीम हें नांव पुनः सांगेन.

**रोशन**—आणि दुसऱ्याला अपशकून व्हावा म्हणून स्वतःचंच नाक कापून घेऊन, नाव बद्‌दू करीन असंच ना ?

**रहीम**—चूप !—जादा एक शब्दही ऐकायचा इरादा नाहीं. नात्यानं बहीण नसतीस, तर या जिभलीचा बेलगाम पट्टा बेगुमानपणं इथवर मुळींच चालूं दिला नसता. तुझा हा फाजील गमजा याउपर मी बिलकुल चालूं देणार नाहीं, याची खातरजमा असूं दे.

**रोशन**—अस्सं ? मग मीही तुला बजावूनच सांगतें, कीं तुझ्या या असल्या भेवडावण्याला मी मुळींच भीक घालायची नाहीं.

**रहीम**—हे भीकेचे डोहाळे सोड, आणि एकदम घरीं चल.

**रोशन**—येत नाहीं. जा. माझी मी मोकळी आहे.

**रहीम**—रोशन, पुरता विचार कर. फिरून एक वखत बजावतों. ही मनमुखत्यारी सोड आणि घरीं चल.

**रोशन**—मी साफ सांगतें–बिलकुल यायची नाहीं. माझी मी स्वतंत्र आहे. तुलाच माझ्या संगतीं यायचं असेल तर चल. ( पडद्यांत हिंदुमुसलमानकी जय. रामानंदकी जय. ) ही पहा ट्रेन आलीच. चल, रहीमभाई माझ्याबरोबर चल. काय, नाहीं यायचं ? मग ही मी चालले ( जाते )

**रहीम**—कोण ही बेमुर्वत तबियत ? काय हें बेदरकार बोलणं ? हें मगरूर वागणं ? हिच्या या बेताल आणि बेवकूफ दिमाखानं वखत तर मोठा बांका येऊन ठेपला ! आजवर जबर उमेद होती कीं आजना उद्यां हिचा मगज नीट ठिकाणावर येईल. पण आतांच्या हिच्या या बेदिलीनं माझा अंदाज फोल ठरून त्याबाबत मी पुरा फर्जीत झालों. माझा धर्म ! माझा प्यारा इस्लामी धर्म ! हजरत पैगंबरानं स्थापन केलेल्या आणि पैगंबराच्या मागं, त्याच्याच तक्तावर तक्तनशीन झालेल्या खलीफांनीं, रूमशामच्या बादशहांनीं, सोमनाथच्या मूर्ति फोडणारा गझनवी महंमद, महंमद घोरी, फिरोज तघलख, सम्राट अलमगीर इत्यादी धर्मवीरांनीं जोमदार वाढीस लावलेल्या, इलाहीच्या इस्लामी धर्माची इजत राखावी, म्हणून आज स्वतःच्या प्राणांचीही पर्वा न करतां मी हरदम धडपडत असतां, माझ्याच घरांत माझ्याच सख्या बहिणींनं अशी फितुरी करून, माझ्या नांवाला अन् करामतीला काळोखी फांसावी यापेक्षां दुसरी नामोशी ती कोणती ? नुसत्या कल्पनेनं जिवाचा कसा कोंडमारा होतो ! अस्मानच्या अस्मानी सिंहासनावर विराजमान झालेल्या इस्लामी धर्माच्या शहानशहा,

( तिलक कामोद–एकताला )

पावन नाम धाम मना श्रांत परवार्दिगार चरणिं थार दे अपार आपदिं प्रभु लावि पार ॥ धृ० ॥ तूं एक तापशमन दिलाराम दास नमित पायीं यास सकल काज ने जयास याविण नच आस आन ॥ १ ॥

( जातो. पडद्यांत-हिंदुमुसलमानकी जय. अल्ला हो अकबर. रामानंदकी जय असें ओरडत व्हॉलंटीअर्स, रोशन, रामानंद, मिर्झासाहेब इत्यादि मंडळी प्रवेश करतात. )

**मिर्झा**—रामानंद, हिंदु-मॉस्लेम यूनियनचा अध्यक्ष या नात्यानं, मी आपलं जाहिर स्वागत करतों. (रोशन गळ्यांत हार घालते व मिर्झा-साहेब तुरा देतो.)

**राम**—मिर्झासाहेब, रोशनबी, आपण आज जो माझा गौरव करीत अहात, तो माझा नसून, चालू दुष्काळांतील खेडवळ गरीब शेतकऱ्यांच्या ज्या दोनशें गाई सोडवून मी पांजरापोळांत रवाना करून येत आहें, त्या दोनशें गायींचा हा गौरव आहे, असंच मी समजतों. मिर्झासाहेब, आपण धर्मानं पवित्र मुसलमान! असं असतांहि आपल्यासारख्या थोर घरंदाज व उदारमनस्क मुसलमान गृहस्थांकडून जी आम्हाला अशी वेळोवेळीं सहानुभूति मिळते तिच्या जोरावरच आमच्या जीवदया संघाचं गोरक्षणाचं कार्य इतकं सुकर झालं आहे.

**मिर्झा**—रामानंद, इस्लामचं कार्य करीत असतां हिंदुस्थानच्या भवि-तव्यतेकडे नजर राखणं हें या हिंदुस्थानच्या भूमीवर जन्मास आलेल्या प्रत्येक मुसलमानाचं श्रेष्ठ कर्तव्य आहे. हिंदूंना नाखूष न राखतां, हें कर्तव्य पार पाडतां यावं, व हिंदु-मुसलमानांची एकी टिकावी, या एकाच हेतूनं, धर्मानं मुसलमान असतांहि, हिंदूंच्या गोरक्षणाला पाठिंबा द्यायला आज मी तयार झालों आहे.

**राम**—मिर्झासाहेब, गोरक्षण चळवळ यत्किंचितही कमजोर होऊं न देतां, हिंदुमुसलमानांच्या एकीचं आपलं कार्य यशस्वी करायच्या बुद्धीनं आपल्या हातांत हात घालून आपल्याशीं सहकार्य करायला, मीही तयार आहें.

**मिर्झा**—रामानंद, आतां लवकरच आपल्या अध्यक्षतेखालीं एक जाहीर सभा भरवायचं ठरलं आहे. तिच्या तयारीसाठीं मी पुढं होतों. (जातो)

**रोशन**—रामानंद, आमच्या रहीम भाईचा स्वभाव अत्यंत हेकेखोर अन् धर्मसमजुतींत माथेफिरू व दुराराध्य आहे. तो व त्याचे साथीदार मुसलमान हिंदुविरुद्ध बेफाम चिडून गेले आहेत.

**राम**—रोशनबी, त्याबाबत आपण अगदीं निश्चित असा. वाटेल तो प्रसंग आला, तरी रहीमला आपलासा करून, 'आपण आरंभिलेल्या या कार्याला

त्याची पूर्ण सहानुभूति तरी मिळवीन, नाहींतर हें कार्यच अजिबात सोडून देऊन, अंगाला राख फांसून मी पुरश्चरणासाठीं अरण्याचा मार्ग तरी सुधारीन. (पडद्यांत 'मेलों–मेलों–धावा–धावा'–अशी आरोळी ) कुणाचा हा शब्द ? ही काय गडबड आहे ?

**रोशन**—आमच्या रहीमभाईचा मुलगा फाजल. ( पडद्यांत–' मेलों मेलों ' हे शब्द ) आणि तो कोण ? गोरख–फाजलला खालीं पाडून गुद्दे देत आहे. निसटला–फाजल गोरखच्या हातून निसटला–आणि त्यानं इकडेच धूम ठोकली. ( फाजल धांवत धांवत येतो. )

**फाजल**—सोडवा, सोडवा, कुणितरी मला या हिंदच्या हातून सोडवा. काय ? या बाजूलाही इकडं हिंदूंच. आतां मी जाऊं तरी कुठं ? पळूं कुठं ? लपूं कुठं ?

**राम**—( बाहू पसरून ) तुझ्याच या एका हिंदूभाईच्या बाहूंत ! थांब मुला पळूं नकोस. असा भिऊं नकोस. ( फाजलला उचलून घेतो. ) मुसलमानांच्या मोहोल्यांत मुसलमानांचा गराडा तुझ्या भोंवतीं असतांही जो निर्भयपणा, जो आसरा तुला तिथं मिळणार नाहीं तो या एका हिंदूच्या बाहूंत या घट्ट मिठींत तुला लाभेल ! हिंदु मुसलमानाला अगर मुसलमान हिंदूला, नुसतं पाहून जर एकमेकापासून असे दूर पळूं लागले, तर हिंदु-मुसलमानांच्या या हिंदुस्थानला, अधोगतीच्या कोणत्या खोल खड्यांत ढकलील, याचा नेम नाहीं ! हिंदभूमाते या अंगाखांद्यावर खेळलेली हिंदु-मुसलमान भावडें, हिंदुस्थानच्या या एका घरांत, एकमेकांविषयीं जर अशी साशंक आणि भयभीत राहूं लागलीं, तर जगाच्या इतिहासांत, हिंदुस्थान नामशेष होऊन, भावी जगाला या दुर्दैवी देशाचं पुसट नांवही ऐकायला मिळणार नाहीं. म्हणून म्हणतों मी हिंदु असलों अगर या इथं आणखी दुसरे कोणी हिंदु असले, तरी आमच्यापासून धास्ती बाळगायचं तुला बिलकुल कारण नाहीं.

**रोशन**—( स्वगत ) अहाहा ! रामानंद, भूतदयेच्या याच बिनमोल गुणामुळं साऱ्या जनतेचीं हृदयं आपण काबीज केलींत मग माझ्यासारख्या एका अबलेचं हृदय आपण हिरावून नेलंत, यांत नवल कसलं ?



गोरख—मी—? मी शिवाजी ! ( पान ९ )

[ Photos by M. N. Kirtikar, Bombay

Blocks & Printing by Manoranjan Press, Bombay. ]

**राम**—फाजल, बेटा निर्भय हो आणि सांग. तूं चालला होतास कुठं आणि असा घाबरलास कां ?

**फाजल**—एक गाय घेऊन मी कसाईखान्याकडे चाललों होतों. वाटेंत स्टेशनच्या फाटकाजवळ एक बहुरूपी हिंदु शिवाजीच्या वेषांत—अरे बापरे-तो आलाच. आतां काय करूं ? मला वांचवा.

**राम**—पण मी इथं असतां भितोस कां ? कोण आला ? कुठं आहे ? ( गोरख शिवाजीच्या वेषांत एक गाय घेऊन येतो )

**गोरख**—हा मी इथं आहे. ( स्वगत ) अरेच्चा, हे मामा. घोटाळा झाला. यानीं मला ओळखलं तर ? छेः, कसचे ओळखतात ?

**राम**—तूं—! तूं कोण ?

**गोरख**—मी—? मी शिवाजी !

**रोशन**—( स्वगत ) वा: ऐट तर खूप आणली आहे !

**राम**—तूं शिवाजी ? छेः आम्ही तर एकच शिवाजी ओळखतों. आणि ते जिजा मातेच्या पोटीं शिवनेरी किल्यांत जन्मास आलेले छत्रपति शिवाजी महाराज ! मग आपण कुठले शिवाजी ?

**गोरख**—याच प्रांतांतला. या गोपूरी किल्यांत, आई-बाईच्या पोटीं जन्मास आलेला मी शिवाजी !

**राम**—धन्य ती माऊली कीं असं रत्न तिच्या पोटीं आलं ! पण काय हो शिवाजी महाराज, कांचेचं कुठं रत्न झालं आहे ? गारगोटीचा हिरा झाला आहे ? मोराचीं पिसं लावणारा डोमकावळा कधीं मोर झाला आहे ? सिंहाचं कातडं पांघरणारा गाढव कधीं मृगराज झाला आहे ?

**गोरख**—( स्वगत ) म्हणजे मी गाढव कीं काय !

**राम**—गप्प कां ? बोला—

**गोरख**—छेः बिलकुल नाहीं.

**राम**—मग दाढी लावली, नाक कृत्रिम बसवलं, आणि पायांत चढाव अंगांत शिवशाही अंगरखा आणि डोक्यावर जिरेटोप चढवला म्हणून काय वाटेल तो वाटेवरचा वाटमाऱ्या बहुरुपी छत्रपति झाला आहे ? तसं झालं असतं तर रंगभूमीवर अंबारींतून मिरवणाऱ्या चक्रवर्ती राजाचं काम

करणाऱ्या नटाच्या नशिबीं, सोंग उतरतांच, उलटी अंबारी कां आली असती ! छत्रपति व्हायला पुण्याई लागते. छत्रपति होण्याची इच्छा बाळगणं सोपं, पण छत्रपति होणं मात्र कल्पनातीत कठीण आहे. आतांच पहा ना. शिवशाही स्थापक छत्रपती शिवाजी महाराजांना अगदीं बाल वयापासून खोटं बोलण्याची भयंकर चीड होती. आणि तू तर हें सोंग आणून, मी शिवाजी म्हणून धडधडीत खोटं बोलत आहेस. तूं शिवाजी नाहींस हें सिद्ध करायला ही एकच गोष्ट पुरेशी नाहीं का ? मग बोल, तू शिवाजी ? गोरख –

**गोरख**—( स्वगत ) भ्रमाचा भोपळा फुटला ! ( रामानंदाचे पाय धरतो ) मामा, क्षमा करा.

**राम**—उठा शिवाजी महाराज—

**गोरख**—छेः मी शिवाजी नाहीं. मी आपला गोरख. मी चुकलों.

**राम**—शिवाजी व्हायची इच्छा बाळगलीस यांत चुकला नाहींस, तर शिवाजी व्हायचं कसं हें ओळखलं नाहींस यांत चुकलास ! महाराष्ट्रांतीलच काय पण आज या अखिल भारत वर्षांतील प्रत्येक तरूणानं आद्य छत्रपतींचा आदर्श पुढें ठेवून आणि त्यांच्या अंगच्या अनंत बहुमोल गुणांचं अनुकरण करून त्यादृष्टीनें शिवाजी बनण्याचा निश्चय केला, तर तें आज अवश्य पाहिजे आहे. या आर्यावर्तांत आज घरोघर जर असे अनेक शिवाजी झाले, तर पौर्वात्य राष्ट्रांत हिंदुस्थानचा दर्जा जपानच्या तोडीस तोड यायला एका क्षणाचा तरी विलंब लागेल का ? पण त्याला अंगावर शिवाजीचा पेहराव नको आहे. अंगीं शिवाजीच्या गुणांची जोपासना पाहिजे आहे.

**गोरख**—मग मामा, गोरक्षण हें शिवाजी महाराजांचं व्रत. त्याचं अनुकरण करावं म्हणूनचना हा पेहराव करून मी बाहेर पडलों ?

**राम**—बाहेर पडलास आणि काय पराक्रम केलास ? या निरपराध फाजलला मेरमरेतों बडवून काढलंस, असंच ना ?

**गोरख**—मग विजापुरांत असतां महाराजांनीं गोवध करणाऱ्या एका खाटकाला जिवें मारलं नव्हतं का ?

राम—तेव्हां या फाजलचा तूं जीव घेतला नाहींस, असंच ना? महाराजांनीं विजापुरांत एका खाटकाची हत्या केली, हें कांहीं खोटं नाहीं. पण तो काळ आणि आजचा काळ यांत किती महदंतर? शिवाजी महाराज जर आज हयात असते तर त्यांनीं सुद्धां आजचा काळ आणि आजची परिस्थिती अजमावून, मुसलमानबंधूंना शत्रू करून हिंसेच्या तत्त्वावर गोरक्षणाचें कार्य साधायचा डाव कधींच टाकला नसता. गोरख, बेटा तूं अद्याप बच्चा आहेस. शिवचरित्राचं नीटसं मनन केल्याशिवाय शिव चारित्र्यांतील रहस्याचीं कोडीं या वयांत तुला नीटशीं उलगडायचीं नाहींत.. म्हणून मी सांगतों तें ऐक. फाजलची गाय फाजलला देऊन टाक.

गोरख—ही गाय जर याला परत दिली तर कसाईखान्यांत हिची हत्या होईल.

राम—त्याची काळजी तुझ्याइतकीच मलाही आहे. मालकाला त्याची गाय परत दे.

गोरख—फाजल, ही घे आपली गाय. ( गोरख गाय देतो. )

फाजल—सलाम—येतों. ( गाय बरोबर न घेतां जाऊं लागतो. )

रोशन—अरे थांब, कुठं चाललास?

फाजल—घरीं.

रोशन—आणि ही गाय?

फाजल—ही गाय मी मोकळी सोडून दिली आहे.

रोशन—पण ही गाय सोडून दिल्याबद्दल घरीं रहीमभाई तुला बेदम मारील त्याची वाट?

फाजल—खुशाल मारूंदेत. बाबा देतील ती शिक्षा भोगायला मी तयार आहे. पण माझे प्राण वाचवणाऱ्या या माझ्या हिंदुभाईचं मन मी कधींच दुखवणार नाहीं.

जरि तात मारी । भय ना मनासी ॥ ध्रु ॥ मम प्राण राखी ।

आजि हिंदुभाई । कधिंना तरी दुखवी तयासी ॥ १ ॥

रोशन—शाबास, जा, बेटा अल्ला तुझं कल्याण करो! (फाजल जातो.)

**राम**—गोरख, हें सोंग काढायची कसली नाटकी लहरे ही ?

**गोरख**—मामा, तें असं झालं. गांवांत हल्लीं बहुरुपी आले आहेत. ते निरनिराळीं सोंगं काढून पोटं भरतात. तें पाहून मला वाटलं आपणही गोरक्षक संतांचीं अशींच सोंगं काढून गोरक्षणाचा उपदेश करीत फिरावं. आमच्या शाळेच्या संमेलनासाठीं एक नाटक बसवलं आहे. त्यांत शिवाजी महाराज, लोकमान्य, महात्मा, भगवान कृष्ण यांचे ड्रेस तयार आहेत. घेतला त्यापैकीं एक आणि बनलों शिवाजी झालं.

**रोशन**—काय विक्षिप्त मुलगा आहे हा ?

**राम**—अरे तुला गोरक्षणच करायचं आहे ना ? मग तेवढ्यासाठीं हीं सोंगं ढोंगं कशाला हवींत ? मी सांगतों एक तुझ्या जोगतं काम.

**गोरख**—मामा, ही सोंगं तर मी काढणारच. पण ती काढूनही वरती सांगाल तें काम करायला मी तयार आहे.

**राम**—तुझे बाबा धनानंद यांनीं तुझ्या दोघीं बहिणींचं-दयेमायेचं-लग्न जमवलं आहे पांजरापोळच्या बेअक्कल गयाळाशीं. या दोन गरीब गायींच्या गळ्चा हा लग्नाचा गळफांस सोडवलास तर गोरक्षण नाहीं का व्हायचं ? वाटेल तर या कामीं मी व तुझा आतेभाऊ दयाळ-आह्मीं तुला वाटेल ती मदत देऊं.

**गोरख**—मामा, आपला एवढा पाठिंबा असेल, तर मग पहा तर खरा पराक्रम या बाल गोरखचा. घरच्या घरीं असं गोरक्षण करतों—

**राम**—कीं साऱ्या जगानं तुला शाबासकी द्यावी, असंच ना ? शाबास, तूं आहेसच तसा. जा. ( गोरख जातो. ) रोशनजी, सभेची वेळ झाली असेल, आपण तडक तिकडंच जाऊं ( जातात )

## प्रवेश दुसरा

( धनानंदाचें घर. दया हातांत एक पत्र अशी प्रवेश करते. )

दया—या मायेनं तर आज सारखाच पिच्छा पुरवलनं! कसा पण गुंगारा दिला! पण ही चाहूल कुणाची? आली वाटतं? छेः नुसता भास! अंगीं गुण नसतील तर नुसतं रूप तरी मुलीच्या जातीला काय कामाचं? पण मी वेडी तर नाहीं? रूप नसलं तर या गुणांचं तरी जगांत काय मोल आहे? आम्ही दोघी सख्या बहिणी! माये, तुझ्या खालोखाल जरी मला रूप असतं तरी दयाळांनीं मला कां नाकारली असती? आणि कुलीन हिंदु मुलींच्या शालीनतेला कमीपणा आणणारं हें पत्र लिहिण्याचा तरी दुर्धर प्रसंग माझ्यावर कां येतां? (पडद्यांत माया ताई ताई ओरडते) आलीच मागें पाठपुरावा करायला. (पत्र लपवते. पडद्यांत–ताई–ताई) अग ही मी इथं आहें (माया येते)

माया—ताई, होतीस तरी कुठं हा वेळ? शोध शोधून दमलें. नसती भेटलीस तर कुठं तरी जाऊन जीवच दिला असता.

दया—माये, आतां तूं लहान का भरल्या घरांत असं भलतं बोलायला!

माया—हो खरंच पैशानं भरलं घर पण पोटभर खायला मिळायचीच काय ती पंचाईत! बाबांच्या चिक्कू स्वभावानं जीव कसा वैतागून गेला आहे. काय मेला न्याय! घरांत चूल पेटवावयाची नाहीं. पैसे वांचवायचे.

दया—दुप्पट बरं. अन्न सामुग्रीच्या खर्चाचे, आणि अजीर्णामुळं प्रकृति बिघडायची भीति नसल्यानं डॉक्टरच्या बिलाचे—

माया—रात्रीं घरांत साराच अंधार–दिवाबत्ती करायची नाहीं. कां तर तेलाच्या खर्चाची बचत करायची.

दया—तसं नव्हे, अग दिवाबत्ती केली, तर एकादवेळीं घराला आग लागायची आणि बाबांची नोटांचीं पुडकीं जळून खाक व्हायची.

**माया**—नेसायला तरी अंगभर पुरतं वस्त्र. हें माजरपाटी फाटकं फट-कूर. मेली खादी तरी आणायची होती.

**दया**—जाडी भरडी खादी खरेदी करावी तर तीहि आजकाल महाग. पाऊस पडला नाहीं तर गावांत दुष्काळ पडतो पण आमच्या बाबांच्या तिजोरींत पैशाचा किती पाऊस पडला तरी आमच्या घरीं तिन्हीं काळीं तिन्ही वेळीं मेला साऱ्याच गोष्टींचा दुकाळ.

**माया**—लग्न सराईत नवरोबांचाही ? मेलीं लग्नं लावून दिलीं असतीं तरी सुटका होती.

**दया**—मग जमवलं आहे ना बाबांनीं त्या गयाळाशीं ?

**माया**—माझं खेटर अडलं आहे ! तो नवरदेव तुलाच.

**दया**—नाहीं, तुला बरं ! ( गोरख येतो )

**गोरख**—अग अशा भांडतां कां ? मी म्हणतों दोघींनां.

**माया**—दोघींनां ? कोण ?

**गोरख**—एकटा गयाळ.

**माया**—असं कुठं झालं आहे ?

**गोरख**—पण आज या घरीं असं होतंय खरं.

**दया**—गोठ्यांतलीं गुरंच जशीं !

**गोरख**—गोठणीवरच्या गायीच म्हणाना !

**माया**—आम्हीं गाई तर तूं गाईचा भाऊ–

**गोरख**—बैलोबा ! असंच ना ? मग स्पष्ट बोलायला अशी लाज-तेस काय ? तुम्ही स्वतः गोगलगाईसारख्या गयाळाच्या पांजरपोळांत जायला खुषी असलांत तर तेवढ्यापुरतं मीहि बैल म्हणवून घ्यायला तयार आहे. आणि नसलांत तर निमुटपणं सांगतों तसं करा.

**माया**—बाई बाई ! इवलसं वय आणि गोष्टी पहा कशा आजोबाच्या.

**गोरख**—माई, माझं नांव काय ग ?

**माया**—काय बाई प्रश्न ? गोरख

**गोरख**—मी गोरख. म्हणजे गाई राखणारा गोपाल. वयाच्या आठव्या वर्षी गोकुळांत गोपालकृष्णानीं गोपालन केलं तर, या वयांत ऱ्या गोरखला या धेनुंचं रक्षण कां करतां येऊं नये?

( काफी-केरवा. )

गोरख—अतुल सान तोहि मुरारि धेनु तारी ॥ धु० ॥
मग मज कां ना होई गो-अवना । लव ना तत्पर हाही ॥
माया—अहा ग अहा ग बाइ हा मज प्राण ।
दया—तन मन धन करि मी कुरबान ।
गोरख—उभय गायि याही मुरारि हाहि तारी ॥ १ ॥

अरेच्चा! पण समोर कोण? बाबा. मग चला पळा इथून.

**माया**—खरंच मी आपली जातेच कशी ( जाते )

**दया**—गोरख, स्टेशनवर तुला दयाळ भेटले होते का रे? होय! मग मी तुला एक—

**गोरख**—नाजुक कामगिरी देणार आहेस वाटतं?

**दया**—चल, चावट कुठला! माझं एक काम आहे. करशील?

**गोरख**—हो अलबत.

**दया**—आंत चल सांगतें.

**गोरख**—तूं हो पुढं, मी आलोंच ( दया जाते ) बाबा इकडंच येत आहेत. त्यांची आज मजा करायची हुक्की आली आहे. ताई काय सांगते तें ऐकावं. आणि यावं पुनः झालं ( जातो. हातांत जमाखर्चाची अर्धी उघडी वही घेऊन पार्नें चाळीत धनानंद येतो. )

**धनानंद**—ठीक! जमा साडे सत्रा हजार रुपये कसाईखान्यापैकीं! ठीक—दहा हजार सावकारी वसूल! ठीक—दीड हजार व्याज खातें! ठीक—खर्च ९० रुपये ९ आणे ९ पै. एकूण सालमजकुर शिल्लक बाकी ठीक. ( पागल येतो. ) कोण पागल? गाई खरेदी आणायला गेला होतास ना?

**पागल**—बेशक.

**धनानंद्**—ठीक—मग गायी किती आणल्यास ?

**पागल**—एक दिकील नाय.

**धनानंद्**—बेशरम, पागल. लाज नाहीं वाटत ? अरे मनाची नाहीं, जनाची नाहीं पण निदान धनाची तरी ? इतके पैसे खर्च करूनही म्हणे शेवटीं एक सुद्धां गाय नाहीं. काय हजामती करीत फिरत होतास ? इदीच्या दिवशीं कमीत कमी दोनशें गायी रहीमच्या कसाईखान्याला पुरवायचा आपला वायदा आहे. आणि आतां तूं तर असा हात हालवीत परत आलास. अरे बैला, किती दिवस गायी शोधीत हिंडतो आहेस ? आठवण आहे ?

**पागल**—बेशक, पण मी काय केरूं ? जय जावा थैंय किम्मत वाडवून रामानंद गायी घेय.

**धनानंद्**—ठीक—म्हणे किंमत वाढवून रामानंद गायी घेय. मग तुझ्याजवळ नव्हते वाटतं पैसे.

**पागल**—बेशक—पण किती ? दोनशें गायों घेवका सगलें शंभर रुपये दिलेव.

**धनानंद्**—ठीक—मग ते काय थोडे झाले ? शंभर रुपये—शंभर रुपये ! अबबब कित्ती तरी. इतके रुपये बरोबर देऊनही शेवटीं एक सुद्धां गाय नाहीं आणलीस ? एकूण साल मजकुर शिल्लक बाकी ठीक—आण पाहूं ते शंभर रुपये परत.

**पागल**—बेशक ! ( नव्वद रुपयांच्या नोटा देतो. धनानंद त्या पुनः पुनः मोजतो )

**धनानंद्**—किती ? नव्वद ! ठीक—आणि बाकीचे दहा ?

**पागल**—खरचले. आगीन गाडीका उतार आणि पोटाका पोटगी.

**धनानंद्**—किती दहा ? दहा रुपये ? दोन महिन्याला पोटगी आणि रेल्वे उतार दहा रुपये ! दिवाळखोर ! अरे उधळ्या, दुष्काळांत गेला होतास ना ? मग तिथं कसली आली आहे पोटगी ? इथून दुष्काळांतून गेला होतास कीं तिथंच दुष्काळांत सांपडला होतास ? पागल, आतां गावांत



**गोरख**—उभय गायि याही मुरारि हाहि तारी ( पान १५ )

[ Photos by M. N. Kirtikar, Bombay.

Blocks & Printing by Manoranjan Press, Bombay.]

गुरांचा बाजार भरायचा आहे. तिथं सवदा हा पटलाच पाहिजे. रहीमचा वायदा चुकतां कामा नये. नाहींतर व्हायची साल मजकुर शिल्लक बाकी ठीक. ( पडद्यांत–' जिला तोषवीलें अशी धन्य गाय। तिला पूजितां नित्य कल्याण होय। जय जय श्रीगोमाताकी जय. ' ) भिक्षा मागायला येताहेत चोर ! लाथ मारून हाकून दिले पाहिजेत. पागल, जा खेच त्या गोग्रास भिक्षेकऱ्याला आंत.

पागल—बेशक. ( जातो )

धनानंद—चांगलं पेकट मोडतों एकेकाचं. चल खेच त्याला आंत. (पागल गोग्रासवाल्याच्या सोंगांत गोरखला खेचतो. धनानंद हात उगारतो)

गोरख—' अहिंसेहुनी अन्य ना श्रेष्ठ धर्म। श्रुति शास्त्र ग्रंथांतरीं हेंच वर्म ॥ '

धनानंद—अरे हा गोरख. म्हणजे तूंही लागलास वाटतं आईमाई गाईच्या उद्धाराला ?

गोरख—' असे गाय ही माय जाणून कष्टी। उठा शीघ्र गोग्रास द्या धान्यमुष्टी ॥ '

धनानंद—गोग्रास कशाला; चांगले मुष्टिमोदक देतों. पोराचं वय तें काय आणि ढंग कसले पहा.

गोरख—' नका रंग ढंगामध्यें नित्य लोळूं। जरा गाईसाठीं बनाहो कृपाळू ॥ '

धनानंद—माझे आई ! हात जोडतों. कृपाळू हो, हे ढंग सोड, आणि शाळेंत जायला लाग.

गोरख—हो कबूल. पण बाबा फी ?

धनानंद—फी कशाला हवी ? धर्मार्थ फुकट शाळा काय थोड्या आहेत ? आणि हा झकपक पोषाख कुठला ?

गोरख—बाबा, धर्मार्थ आहे. फुकट आहे.

धनानंद—फुकट असला तरी नाहीं घालायचा. ही भलतीच संवय नाहीं कामाची. आज फुकट आहे, उद्यां विकत घ्यायची हुक्की यायची.

**गोरख**—मग बाबा, शिक्षणही फुकट घ्यायची सोय नाहीं. आज फुकट घेतलं, उद्यां विकत घ्यायची हुकी यायची.

**धनानंद**—कां? फारसी जीभ लांबली आहे? पागल, पहातोस काय? लगाव. ( पागल त्याला धरतो. गोरख सुटायची धडपड करतो. )

**गोरख**—तूं टाक चिरुनि ही मान। नको अनमान। हा कसाब झाला तात। करुं सजे गायिचा घात। लवलेश दया न मनांत। विसरुनि माया घालितसे हा कदर्युचा थैमान ॥ १ ॥ ( पागल मारणार तोंच गोरख पळतो. )

**धनानंद**—धर पकड त्याला. ( दोघे मागून जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

(**स्थळ**—गुरांच्या बाजारानजीकचें ठिकाण. पागल एक गाय ओढीत आणतो. मोहन हातीं पायीं पडून गाय अडवीत असतां, त्याला एक फटका लगावून गाय घेऊन जातो. इतक्यांत दयाळ येतो. )

**दयाळ**—मोहन, अरे कां करतोस जीवाची उगाच आटाआट? गोरक्षणेचं हृदयद्रावक चित्र करुण रसांत कितीही आळवलंस, तरी या उदरंभर पोटभरू फत्तर दलालांच्या हृदयाला काय पाझर फुटणार आहे? बाजारांत गायी सोडवायला कितीही पैसे ओतलेस तरी काय खरं गोरक्षण होणार आहे?

**मोहन**—गेल्या आठवड्याच्या बाजारांत मी एक गाय सोडविली आणि पांजरापोळांत सोडून दिली. तीच गाय, अगदीं अचुक तीच गाय आज पागलनं या बाजारांत विकायला आणली.

**दयाळ**—आणि म्हणूनच ही गाय तूं आज सोडवणार वाटतं? आणि पुढल्या बाजारांत ती पागलच्या हातीं पुनः लागली म्हणजे पुनः सोडवायला येणार, असंच ना? ही गाय पागलच्या हातीं कशी आली ठाऊक आहे?

**मोहन**—मुळींच नाहीं.

दयाळ—ही गाय खास पांजरापोळच्या रखवालदाराला पैसे चारून या पागलनं मिळविली आहे. सांग, ही गाय इथून आतां हा कुठं नेणार?

मोहन—कसाईखान्यांत.

दयाळ—छेः बिलकुल नाहीं. ही गाय इथन आतां हा बाजारांत नेणार आणि एक किफायतशीर धंदा करणार. त्याला ठाऊक, खाटकाच्या हातून गाय सोडवण्यासाठीं जीवदयेच्या दृष्टीनं गोग्रासवाले तो म्हणेल ती किंमत मोजणार. गायीच्या मूळ किंमतीच्या दशांश किंमतींत गाय हातीं आली असूनही बाजारांत मूळ किंमतीच्या दसपट भाव तो आपल्याकडून घेणार आणि आल्या रकमेंत गरीब शेतकऱ्यांकडून पुनः दहा गायी खरेदी करून तो कसाईखान्यांत नेणार! म्हणजे बाजारांत एक गाय सोडवायच्या खटपटींत दहा गाईंचे पैसे गमावून, एका जीवाऐवजीं दहा जीवांचे गळे आपण कसायाच्या सुरीला बळी देणार.

मोहन—असं! मग दयाळ, आपण आज बाजारांत कां आलांत!

दयाळ—तुला माहीत आहे, आपल्या या गोपूरांतील दे. भ. चे वडील नुकतेच वारले. त्यांच्या पश्चात् त्यांच्या दुभत्या गाई त्या दे. भ. नें जाहीर नोटीस देऊन विकायला काढल्या आहेत. त्या गायी कदाचित आजच्या बाजारांत विकायला येतील असा अंदाज आहे. एका लोकप्रिय पुढाऱ्याच्या गायी अशा जाहीर लिलावानं विकल्या जाव्यात ना! शिव शिव! गोवधामुळं आपल्या देशाची सांप्रत कोण ही शोचनीय स्थिति?

( शंकरा-त्रिताल. )

घनाहिन आज जाहला देश बुडाला। नयनाला मिटा कां हो? ॥ धृ० ॥ सुरभीला वधिककरीं द्या सुर जीचे चरण ध्याती हो खेद मनाला ॥ १ ॥

मोहन, चल आपण त्या गायींची टेहळणी करूं—

( गोमाताकी जय असें ओरडत जातात. ती गर्जना ऐकून रहीम रागारागानें येतो. )

**रहीम**—या अल्ला ! परवरदिगार ! बेजार करून सोडलं या हरामखोर गोग्रासवाल्यांनीं ! ( पुनः आंत गोमाताकी जय आरोळी. ) छेः कानठाळे बसले ! प्राण हैराण झाला ! या गनीम गोरक्षकांच्या जिभेचा हा धूमधडाका आतां सहन तरी किती करायचा ? या कमस्सल हिंदु अवलादींच्या लीलांकडे जों जों कानाडोळा करावा, तों तों त्यांच्या मस्तवालपणाला सीमाच नाहींशी होत चालली ! नामर्दासारखे आम्हीं मुसलमान जर यावेळीं मूग गिळून स्वस्थ बसलों तर भित्या मागं ब्रह्मराक्षस होऊन मुसलमानांची नालस्ती कानांनीं ऐकायची आणि इस्लामी धर्माची प्यादेमात डोळ्यांनीं पहायची आफत दुणावेल यांत बिलकुल अंदेशा नाहीं. प्राचीन थेर मुसलमानांचं नांव सांगणाऱ्या आजच्या मुसलमानभाई हो, महंमद पैगंबराच्या पवित्र पैगामाशीं जर आज आपण बेइमान ठरलों तर जगांत तोंड दाखवायला तरी आम्हां मुसलमानांना जागा राहील काय ?

( मांड—दीपचंदी. )

कैसा हो अल्ला हा मन्सबा मानें प्यारा ॥ धृ० ॥ मुसलिम धरम कुराण न माना मूरख वदे जन सारा ॥ १ ॥

छेः तें कांहीं नाहीं. इस्लामची पायमल्ली करणाऱ्या हिंदु चळवळीला पुरता पायबंद हा घातलाच पाहिजे ! ठोशास ठोसा लगावन हिंदूंचीं हाडें चांगलीं ठेचलीच पाहिजेत, आणि विरोधाच्या या पहिल्या चकमकीचा आरंभ आतां या ठिकाणीं, या क्षणीं हा बाजार संपण्यापूर्वीच झाला पाहिजे. ( धनानंदाबरोबर पागल येतो ) का ? आलास ? हा वेळ ? हिंदु म्हटला कीं तो एकजात बेइमान !

**धनानंद**—हां, एवढं मात्र मी म्हणून घेणार नाहीं.

**रहीम**—बेइमान नाहीं तर काय ? बाजार संपत आला तरी तुझा ठिकाण नाहीं. तूंही गांवांतल्या हिंदूना फितुर दिसतोस !

**धनानंद**—हिंदुबिंदु हा धनानंद कांहीं कुणी ओळखीत नाहीं. हा धनानंद दुनियेंत एकच चीज पच्छानतो आणि ती म्हणजे धन ! धन

देणाऱ्या धंद्याशीं फितुरी ? धनाशीं बेइमानी ? ठीक. ही शंका तरी आपल्याला कशी आली ?

रहीम—इमानदारीच्या तुझ्या गप्पा मला नको आहेत. कृति पाहिजे आहे. सांगतों ती एक कामगिरी पार पाडण्याची तुझी तयारी आहे ? आहे कबुल ?

धनानंद—ठीक !—बोला—

रहीम—या गोग्रासवाल्यांची चांगली रग जिरवायचा माझा इरादा आहे. कांहींतरी कुरापत काढून बाजार संपण्यापूर्वी पांच दहा व्हॉलंटीअर्सना असा बेदम ठोक द्यायचा कीं पुरी जरब बसून पुनः ते या दिशेला फिरकायचेही नाहींत.

धनानंद—ठीक.-पण किफायत ?

रहीम—धंद्यांत बरकत.

धनानंद—ठीक-हा झाला उधारी व्यवहार. पण रोखी ?

रहीम—व्हालंटीअर्सच्या उघड्या पाठीवरील प्रत्येक फटक्यागणीक एक एक रुपया—

धनानंद—ठीक-मग पांच दहाच काय बोलतां ? शंपन्नास बोलाना. चांगले शंपाचशें व्हॉलंटीअर्स लोळवतों. चामडी फुटे तों बेदम ठोकतों ! मरेमरे तों झोडपून काढतों !

रहीम—मरेमरे तों मार दे. पण मार देऊन त्यांतील कुणी मरूं देऊं नकोस. नाहींतर स्वतःच फांशी जावं लागेल.

धनानंद—जाऊंद्या-त्याला कोण भितो ? अहो देवघेवीच्या व्यवहारांत जीव घेऊन जर वरती कुणी पैसा देत असेल, तर आपण तरी माघार घेणार नाहीं बुवा ! अशी माघार घेतली तर साल मजकुर शिल्लक बाकी ठीक !

रहीम—शाबास ! एवढी हिंमत धरशील तर आणखी काय पाहिजे ?

( देभ दोन गाई व एक वासरू घेऊन येतो. त्याला दयाळ अडवतो. )

दयाळ—सोडा-देभ, सोडा या गाई.

देभ—चला-दूर व्हा. Get away !

दयाळ—हें पहा, मी तुम्हाला हात जोडतों. असे निष्ठुर होऊं नका. एवढं ऐकाच. नका मागं पुढं पाहूं.

देभ—किती लोचट तुम्ही हो. एकदां नाहीं म्हटलं कळत नाहीं ! Brute ! कुठं गेली तुमची अक्कल !

दयाळ—आमची अक्कल तुमच्याच पायीं गाईकरतां भिक्षा मागायला आली आहे.

देभ—भिक्षाच मागायची असेल तर गांव काय ओस पडला आहे ? कोण शिचा त्रास ! A beggar ! A mere pauper !

दयाळ—देभ, स्वतःच्या पोटासाठीं मला आपल्याकडे भिक्षा मागायची नाहीं. तर या मुक्या जीवासाठीं ! हीं जनावरें कसायाच्या हातीं जाऊं नयेत म्हणून—

रहीम—हरामखोर ! कसायाला नांवं ठेवतोस ? मला शिव्या देतोस ? याद राखून रहा, एक शब्द उच्चारशील तर हड्डी नरम करीन. धनानंद पकडा या पाजी माणसाला—( धनानंद व पागल दयाळाला पकडून ठेवतात. ) चूप, खबरदार असा घडपडशील तर. कसायाची निंदा करीत गांवभर फिरतांना कांहीं दिक्कत वाटत नाहीं ? मग आतां कां ? घे कसायाच्या हातचा प्रसाद. ( एक चाबूक मारतो. ) बोंबल, वाटेल तितका बोंबल. धनानंद, खेच त्याला त्या बाजूला—( दयाळ-' गोमाताकी जय ' ओरडतो. धनानंद पागल त्याला खेंचतात. ) आपण कोण ?

देभ—मी देभ. I am Mr. Debha–that means Deshbhakta!

रहीम—या आपल्या गाई विकायच्या आहेत ? काय किंमत बोला.

देभ—पण प्रथम या गाई कुणाच्या आहेत हें ठाऊक आहे ? या गोपुरांतील अत्यंत लोकप्रिय अशा एका देशभक्त पुढाऱ्याच्या. विलायतेंत कुणा सामान्य देशभक्ताची एकादी सामान्य वस्तुही त्यांच्या पश्चात विकायला निघाली तर हजारों रुपये मोजून ती संग्रही ठेवण्यासाठीं लाखो लोकांच्या उड्या पडतात. आणि आपल्या इकडे साराच दरिद्री व्यवहार ! Oh poor India !

रहीम—तें नको आहे. किंमत बोला आणि मोकळे व्हा.

देभ—या गाईंचे मी पांचशें रुपये घेईन. Yes, Rs. 500 in cash.

धनानंद—पांचशें रुपये ! अबबब इतके !—( धनानंद डोक्याला हात लावून मटकन खालीं बसतो. दयाळ सुटून पुढं येतो व देभचे पाय धरतो.)

रहीम—फितूर,–सोडतोस काय त्याला ? धर–पकड !

दयाळ—देभ, करा एवढी दया. ही गुरं सोडा. मी तुमच्या पायावर डोकं ठेवतों. विश्वजननी गोमातेचं स्मरण करा. आपल्या पुण्यश्लोक वडिलांच्या पुण्यपावन पावलांचं स्मरण करा आणि या कसाबाला–

रहीम—कसाब ! तुझा बाप कसाब ! जित्याची खोड मेल्याशिवाय जायची नाहीं. धनानंद, पहातोस काय ? लगाव लाटी.

दयाळ—मग ही नुसती लाठीच कशाला ? कसाईखान्यांतला सुरा आणा, आणि ही गर्दन छाटा.

( खमाज–त्रिताल. )

अजि मला मरण गोपार्थिं द्या । प्राण तारण्या प्राण घ्या ॥ धृ. ॥
थोर मराणिं मृत्युंजय पावे । मराणिं मरण प्रिय याविण ना ॥ १ ॥

गाईच्या प्राणांची याचना करतां करतां तुमच्या हातून मला मृत्यु आला तर माझ्या जन्माचं सार्थक होईल ! मग चला व्हा पुढं आणि घ्या माझा प्राण–

रहीम—छेः, सुखासुखी तुझे प्राण कोण घेईल ? एकदम मेलास तर एकदम सुटशील. मग आणरे गोमांस. तुला चांगला इंगाच दाखवतों. बत्तीशी पाडून तुझं मुस्कट खोलतों, आणि त्यांत गोमांस कोंबून तुला मुसलमान करतों. (रहीम त्याला धरतो इतक्यांत मिर्झासाहेब येतो.)

मिर्झा—खबरदार ! हा मिर्झासाहेब जिवंत असतांना ही गोष्ट कधींच करूं देणार नाहीं. जबरदस्तीनं बाटवून कुणालाही मुसलमान करण्याची कुराणाची सक्त मनाई आहे ! रहीम, भानावर ये आणि पहा–केवढा भयंकर अत्याचार करीत आहेस तें. बऱ्या बोलानं याला सोडून दे. नाहीं तर इस्लामचा खरा अनुयायी या नात्यानं तुझा हात धरून, तुला अस्सं बाजूला खेचावं लागेल. ( त्याला बाजूला खेंचतो. दयाळ उठून बाजूला होतो. )

रहीम—इस्लामचा खरा अनुयायी तूं! आणि मी कोण?

मिर्झा—कुराणाची आज्ञा धाब्यावर बसवून, असल्या अत्याचारांनीं इस्लामच्या नांवाला काळं फांसणारा एक माथेफिरू मुसलमान.

रहीम—आणि तूं कोण? ढोंगी मुसलमान! तूं जर खरा मुसलमान असतास तर या गनीम हिंदूला मिलाफ होऊन, आपल्याच एका मुसलमान भाईवर असा तुटून कधींच पडला नसतास.

मिर्झा—जो हाडाचा खरा मुसलमान आहे, त्याला हिंदुकडून मुसलमानांवर झालेल्या अत्याचाराची जितकी चीड येते, त्यापेक्षां मुसलमानांकडून हिंदूवर झालेल्या अत्याचाराची जास्तच येते! धर्मानं मुसलमान असो वा हिंदु असो; हिंदु, मुसलमान, खिश्चन, पारशी, यहुदी हे सारे एकाच हिंदुस्थानचे सुपुत्र असून, या साऱ्यांचीं सुखदुःखं एक होत, असं आज जो मुसलमान मानील, तोच खरा मुसलमान! रहीम, मींहि मुसलमान आहें, आणि तुमच्याइतकेंच कुराण व इस्लाम धर्म मला प्यार आहेत. इस्लामी धर्माची प्रतिष्ठा वाढावी, मुस्लीम धर्माचा सर्व जगभर प्रसार व्हावा, असं मलाही अन्तःकरणपूर्वक वाटतं पण तो परधर्मीयांवर सक्ती करून नाहीं–अमानुष व राक्षसी अत्याचार करून नाहीं–किंवा तरवारीच्या धमकीनंही नाहीं!

रहीम—तुझ्यासारखे पैगंबर बनले तर एका हातांत तरवार व दुसऱ्या हातांत कुराण घेऊन धर्मप्रसार करणाऱ्या पैगंबराचा इस्लामी धर्म तेव्हांच संपुष्टांत येईल!

मिर्झा—एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत तरवार ही युद्धनीति कुराणांत सांगितलेली नाहीं. धर्माच्या कामांत सक्ती करणं, गैर असून, उपदेशानं चुकीच्या मार्गापासून लोकांना परावृत्त करणं, एवढ्यासाठींच मुस्लीम धर्माचा अवतार झाला आहे, असं कुराणे–शरीफांत स्पष्ट म्हटलेलं आहे.

रहीम—तुझ्यासारख्या बाटग्या फितुर मुसलमानांच्या तोंडचा हा असला उपदेश ऐकूनच ही गोग्रासवालीं भिकार भिक्षेकरी पोरं, आम्हां



मिर्झाः—खबरदार ! ( पान २३. )

Blocks & Printing, by Manoranjan Press, Bombay.] [ Photos by M. N. Kirtikar, Bombay

मुसलमानांचा वाटेल तिथं, वाटेल तेव्हां, असा उपमर्द करूं लागलीं आहेत.

मिर्झा—गोरक्षक हिंदु जर मुसलमानांचा वृथा उपमर्द करतील तर त्या गोष्टीनंहि मला तितकाच संताप येईल. बोला, यांनीं आपला उपमर्द केला?

रहीम—तें विचार याच हरामखोराला—

दयाळ—मिर्झासाहेब, या रहीमशीं मी एक चकार शब्दही उच्चारला नाहीं, अगर त्यांचा कोणत्याहि तऱ्हेनं उपमर्द केला नाहीं. या देभनीं या बाजारांत ही गाय विकायला आणली. त्यांच्या हातीं पायीं पडून ही गाय कसायाला विकूं नकोस, अशी त्यांची मी विनवणी केली.

मिर्झा—यांत रहीम आपला उपमर्द कसा झाला? बाजारांत ही गाय चाहील त्या इसमाला विकायचा जसा मालकाला हक्क आहे, अगर चढेल ती किंमत चढवून ही गाय खरेदी घेण्याचा जसा आपला हक्क आहे तसाच ही गाय या कसायाला विकूं नकोस अशी मालकाला विनवणी करण्याचा या दयाळालाही हक्क आहे. काय हो देभ, ही गाय आपण रहीमला विकायला कबूल आहांत?

देभ—छेः Impossible! यानं माझ्या डोळ्यांदेखत एका हिंदूच्या तोंडांत गोमांस कोंबण्याचा प्रयत्न केला. यालाच काय पण आतां कुणाही मुसलमानाला ही गाय विकायला मी मुळींच कबूल नाहीं.

(रामानंद येतो.)

राम—शाबास, देभ शाबास!—

रहीम—बेवकूब–हलकट–पाजी–हिंदु—　　　(निघून जातो.)

राम—देभ, या गाई आपण या बाजारांत विकायला आणल्यात?

देभ—होय—

राम—कायहो देभ, लाज नाहीं वाटत आपल्याला असं बोलायला? अगाध विद्वत्ता, निस्सीम धर्मपरायणता, अपूर्व स्वार्थत्याग, आणि खऱ्या दिलाची देशसेवा इत्यादि अलौकिक गुणांनीं आपले वडील इतके लोकप्रिय होऊन गेले कीं, मीच काय पण या गोपुरांत त्यांना न ओळखणारा असा एकही माणूस मिळणार नाहीं. अशा एका लोकप्रिय

पुढाऱ्याचे आपण पुत्र, माझ्या एका जिवलग स्नेह्याचे आपण चिरंजीव या नात्यानं मी आपल्याला विचारतों, या गाई आपण या बाजारांत आतां विकणार ?

देभ—कुणाही मुसलमानाला नाहीं तर एकाद्या हिंदुला–

धनानंद—हो मला ! मी ह्या गाई खरेदी घ्यायचं ठरवलं आहे. हां किंमत रुपये पांचशें म्हणतो, पण भाव पटला तर या गायी मीच घेणार आहें.

राम—या गायी कसाईखान्यासाठीं एखाद्या मुसलमानानं खरेदी केल्या काय, अगर हिंदूनं खरेदी केल्या काय, या दोन्ही गोष्टी सारख्याच अनिष्ट आहेत. पण देभ, जाहिर लीलाव पुकारून ज्या या गायी आपण बाजारांत विकायला आणल्यात त्या गायी आपल्या वडिलांकडे कशा आल्या, हें आपल्याला माहीत आहे ? या गायीबद्दल आपण आतां पाचशेंची किंमत मागता. पण तितकीही जिनगी संग्रहीं नसलेल्या एका गरीब ब्राह्मणानं, आपल्या वडिलांच्या देशसेवेवर दिलखुष होऊन विना-मोल दुधदुभत्यासाठीं त्यांना नजर केल्या होत्या, ही जगजाहीर गोष्ट आपल्याला ठाऊक नाहीं, हें शक्य आहे का ? अहाहा, किती थोर हृदय त्या ब्राह्मणाचं आणि आपण ? धर्मानं हिंदू, पण कृतीनं ? सांगा अशी मान खालीं कां घालतां ? सांगा–'कन्या गो करी कथेचा विक्रा । चांडाळ तो खरा तया नामें'। ही संतवाणी कधीं आपल्या ऐकिवांत आली आहे ? हीन जातींतील माणूस सुद्धां शक्य तोपरी या संत वचनाप्रमाणं वागत असतो, मग आपण जातीनं उच्च कुलांत, असामान्य पित्याच्या पोटीं जन्मास यायचं भाग्य लाभलेले, वडिलांना दिवंगत होऊन एक महिनाहि लोटला नाहीं, तोंच त्यांच्याच गायी अशा जाहीर विक्रीला बाहेर काढतां, यापेक्षां शरमेची गोष्ट ती कोणती ?

देभ—खरोखर, या गायींचा मला घरीं उपयोग नव्हता—

राम—म्हणून आपण या कसायाकडे विकायला आणल्यात ? मूळ मालकाला त्या पुनः दान द्यायच्या होत्या ! पांजरपोळांत रवाना करा-यच्या होत्या ! पोळ म्हणून गावांत सोडून द्यायच्या होत्या ! पण गोधन विकायला निघालांत ! काय म्हणावं आपल्याला ? गोवधाबद्दल विधर्मी

मुसलमानांना आम्हीं नांवें ठेवतों, पण विश्वमाता म्हणून भारतांत गौरवलेल्या गायींचा आपल्या सारखे हिंदूच जर असा राजरोस विकरा करूं लागले, तर मुसलमानांनां तरी गोवध करूं नका, असं म्हणायचा आम्हां हिंदूना काय अधिकार?

( यमन–त्रिताल. )

वधिका करिं जरि देती गायी । माता कां न विकावी ? ॥ धृ० ॥
निशिदिनिं त्यांना देइ कसाबा । तो नर जन्मा येउनि वाया ।
स्वर्गातें पामर मुकत फुका ॥ १ ॥

म्हणून म्हणतों देभ, गोरक्षणाच्या दृष्टीनं विचार करा, हिंदुदृष्टीनं पहा म्हणजे दिसेल, कीं आपण—

**देभ**—एक आसुरी वृत्तीचा चांडाळ आहे असं! रामानंद, नका लाजवूं मला. माझी चूक मला कळली. या गाई मी इथून पांजरपोळांत रवाना करतों आणि गोधनविक्रीच्या पापाचं क्षालन म्हणून, आपल्या या दयाळाबरोबर गोसेवक होण्याची गोमातेची शपथ घेतों. I swear in presence of God and Cow!

**राम**—अहाहा! आनुवंशिक संस्कार म्हणतात तो हा! आपल्या वडिलांच्या पुण्याईचं हें फळ असंच मी समजतों. आपल्या या नव्या निर्धाराला आपल्या वडिलांचा आणि लोकमान्य टिळकादि इतर थोर देशभक्तांचा आशिर्वाद मिळेल! ( पडद्यांत–' कल्याण–कल्याण ' असा आवाज ) या मंगल प्रसंगीं ही आकाशवाणी कुठून आली? अरे हा गोरख!

( गोरख टिळकांच्या वेषांत येतो. )

**गोरख**—सर्वे सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु ।

ॐ शांतिः शांतिः शांतिः । ( पडदा. )

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

( रहीमचा बंगला. रहीम आणि फाजल. )

**रहीम**—फाजल, बेटा बोल, परवां रामानंदाच्या स्वागत मिरवणुकीच्या वेळीं तूं स्टेशनवर गाय सोडून दिलीस ?

**फाजल**—होय.

**रहीम**—कारण ?

**फाजल**—रामानंदाला नाखुष न करावं म्हणून !

**रहीम**—कुणाला ! त्या दुष्मानाला ?

**फाजल**—दुष्मानाला नव्हे. तर माझे प्राण वांचविणाऱ्या एका हिंदु भाईला.

**रहीम**—चूप ! हिंदु भाई ? हिंदु तुझा दुष्मन ! एका हिंदुकडून प्राण वांचवून घेण्याऐवजीं काय बिघडलं असतं त्याच जागीं मेला असतास तर ? दिक्कत वाटते आहे का पहा कारट्याला माझ्या समोर फिरून फिरून तेंच तेंच सांगायला ? ( रोशन येते )

**रोशन**—मग काय ? तुझ्या समोर त्यानं फिरून फिरून खोटं सांगावं असं तुझं म्हणणं ?

**रहीम**—कां ? आलीस पुनः हिंदु भाईची तरफदारी करायला ! रोशन, या फाजलच्या डोक्यांत हिंदु भाईच्या प्रेमाचं वेड भरवून देणारी तूं !

**रोशन**—हिंदु भाईवर प्रेम करायला मी त्याला शिकवलं, तर त्यांत तो बिघडला असं मला मुळींच वाटत नाहीं.

**रहीम**—हा कारटा बिघडला नसता तर गाय सोडून जमातीचा फतवा यानं खास धाब्यावर बसवला नसता—

**रोशन**—कुराणांतील पवित्र धर्माज्ञेला धाब्यावर बसवणारा एकादा हुकूम जर जमातीनं सोडला तर तो मोडणं पाप होईल ?

**रहीम**—लौकिक धर्माच्या दृष्टीनं जमातीचे धर्मनिर्णय पाळणं यांतच खरा धर्म आहे. फाजल, बोल जमातीच्या हुकमतीनं तूं मुस्लीम धर्म पाळणार कीं गावगुंड बनून मुस्लीम धर्माची बदनामी करणार ?

**फाजल**—बाबा, मी आपला मुलगा आहें. आणि यांतच माझं सारं उत्तर आहे.

**रहीम**—शाबास, मग जा. मौलवीसाहेबांकडे कुराण पढायला जा. ( फाजल जातो. ) रोशन, आज कदाचित मिर्झासाहेब इथं येईल.

**रोशन**—कशाला ?

**रहीम**—तुझ्या शादीचं नक्की करायला. त्यानें तुझी मागणी केली आहे.

**रोशन**—मला मुळीं शादीच नाहीं करायची.

**रहीम**—मिर्झासाहेबासारखें स्थळ पाया पडूनही नाहीं मिळायचं. जुनं मुसलमान घराणं, विपुल श्रीमंती, विद्वत्तेतहीं कांहीं कमी नाहीं. तुझ्या त्या काफीर रामानंदापेक्षां दसपट उत्तम. शहाणी असशील तर त्यांच्याशीं नीट बोल आणि होकार दे.

**रोशन**—तें माझं मला कळतं ! पण रहीम, हिंदु मुसलमानांच्या एकीच्या विषयावर तुझ्याशीं बोलायला रामानंद आतां इथं येणार आहेत.

**रहीम**—तें ही माझं मला कळतं ! म्हणे रामानंद येणार आहे ! कशाला येणार ? मला भेटायला ? तूं सुटली आहेसना मोकळी त्याच्या भेटी घ्यायला ? घे तूंच त्याची भेट आणि घाल दिल चाहिल तो धिंगाणा ! मला त्याची सुरतही पहायची नाहीं.

( अडाणा–त्रिताल )

संग न हा बरा टाकि न पद न पथ हा खरा । अवनती कुजन नरा ने ।। धृ० ।। प्रेमभाव खला जरि कुणि देइ ललना । गमत मला ती कुलटा ।। १ ।।　　　　( जातो. )

**रोशन**—गेला, निघून गेला. रामानंदांचं नुसतं नांवहीं ऐकून घ्यायला तयार नाहीं. काय दोघांचा ऋणानुबंध असेल देव जाणे. हिंदु धर्मांत जन्म जन्मीचा लागाबांधा मानतात, तो यावेळीं असा खरा वाटूं लागतो. नाहीतर मला तरी रामानंदाबद्दल इतकं असं कां वाटावं ? मला काय

वाटतं ? काय वाटतं मला हें बोलायला मी लाजतें का ? जनांत लाजलें तरी मनाशीं मी कां लाजावं ? काय वाटतं मला रामानंदाबद्दल ? प्रेम ? हो ! हें लोकांत झालं तर लोक हांसतील. एका यावनी स्त्रीनं एका हिंदुवर प्रेम करावं ! त्याच्याशीं विवाह करून आजन्म त्याची दासी व्हावसं वाटावं ! लोक नांवं ठेवतील ! ठेवतील नांवं—त्याचं काय मला ? पण रामानंदांना कळलं तर त्यांना काय वाटेल ? त्यांना हें रुचेल का ? कसं कळावं मला ? कॉलेज सुटल्यापासून त्यांच्या माझ्या इतक्या गांठी पडल्या. पण हृदयाचा ठाव काढायचं एकदांही धाडस झालं नाहीं. करून पहावा का आज धीर ? पण हें व्हावं कसं ? समोर आलें कीं हृदयींचं हितगुज खुलं करायला मुखावाटे अक्षरही निघत नाहीं. एकदां वाटतं, प्रेमाचा हा ठेवा, हृदयाच्या कडी कुलपांत असाच कोंडून ठेवावा. आजन्म या हृदयाशीं बाळगावा. याच गोड विचारांत देह ठेवावा. पुनर्जन्म खरा असेल तर पुन्हां हिंदू होऊन यावं, आणि या जन्मीं नाहीं तर पुढील जन्मीं तरी रामानंदांची पत्नी व्हावं ! किती गोड सुखस्वप्न हें ?

( मांड—केरवा )

देह राम आरामा । मानस धालें । मानसिं झालें । रामा ।। धृ. ।। हृदीं मूर्ति संतत डोळे नाहि त्या विरामा । आरामा ।। १ ।। मनीं ध्यानिं अंकित दासी मानि का स्वभामा । रामा ।। २ ।।

( रामानंद येतो )

**राम**—काय चाललं आहे रोशनबी ?

**रोशन**—आपलीच आठवण निघाली होती.

**राम**—आहेत कां रहीम घरांत ?

**रोशन**—नाहीं, आतांच बाहेर गेला.

**राम**—काल आपण व्याख्यानाला नाहीं आलांत ?

**रोशन**—बरं नव्हतं थोडं. काय होता विषय ?

**राम**—हिंदुमुसलमानांची एकी व रोटीबेटी व्यवहार.

**रोशन**—काय सांगितलं व्याख्यात्यांनीं.

राम—एकीला या दोन्ही गोष्टी अवश्य आहेत असं.

रोशन—मग आपलं काय मत पडलं यावर ?

राम—या गोष्टी मुळींच आवश्यक नाहींत ! हे प्रश्न आज एकीला पोषक नसून, उलट मारक आहेत. मिश्रविवाहासारख्या या प्रश्नांची भीति जर यावेळीं या दोन्हीं समाजांत उत्पन्न झाली, तर कोणता मुसलमान बाप आपल्या मुलीला, अगर कोणता हिंदु बाप आपल्या मुलाला, हिंदु मुस्लीम संमिश्र समाजांत मनमोकळेपणानं वावरूं देईल ? हिंदु-मुसलमानांच्या एकीची इमारत असल्या साशंक वृत्तीच्या पायावर कधींतरी उभारली जाईल काय ?

रोशन—पण हे प्रश्न आवश्यक नसले तरी ते आज टाळतां येण्यासारखे नाहींत, असं नाहीं आपल्याला वाटत ?

राम—यांत टाळतां न येण्यासारखं काय आहे ? रोशनबी, एकाच घरांत, एकाच आईबापांच्या पोटीं आलेलीं भावंडं एका घरांत नांदत नाहींत का ?

रोशन—हो नांदतात. तसं न होईल तर समाजाच्या अस्तित्वावर घाला येईल. जगावर प्रलयकाल लोटेल.

राम— होय ना ! मग एकाच घरीं वाढलेलीं बहीणभावंडं, वैषयिक प्रेमाच्या विषारी विचारानं न विटाळतां एकत्र नांदूं शकतात तर एकाच हिंदभूमातेच्या मांडीवर खेळलेलीं, या एकाच हिंदुस्थानांत एकत्र वाढलेलीं हिंदुमुसलमान भावंडं, वैषयिक प्रेमाचा संपर्क न होतां एकत्र कां नांदूं नयेत ? भावाच्या मनांत बहिणीशीं लग्न करावं ही कल्पना बीजरूपानंही रुजणं शक्य नाहीं, तशीच हिंदु तरुणांच्या मनांत यावनी युवतीविषयीं तशी विपरित भावना येणं शक्य नाहीं, असं मी कां मानूं नये ?

रोशन—अवश्य मानावं. पण लौकिक दृष्ट्या अनुभव काय येईल ?

राम—मी माझ्या मनावरून साऱ्या जनाची पारख करतों. आज इतकीं वर्षं हिंदुमुस्लीम संमिश्र समाजांत मनमोकळेपणानं मी वावरतों आहें.

पण या अवधींत कुणाही मुसलमान तरुणीविषयीं सख्या बहिणी व्यतिरिक्त अन्य भावना माझ्या मनाला कधींच शिवली नाहीं.

**रोशन**—असे विवाह होणं हें पाप आहे असं आपलं मत आहे ?

**राम**—हो-धार्मिक दृष्ट्या हें पाप आहे-हिंदुधर्माप्रमाणं हें पाप आहे-असंच मी मानतों.

**रोशन**—धर्म ! हिंदुधर्म ! मुस्लीमधर्म ! ख्रिस्ती धर्म ! जगांत जितकी खंडें तितके हे विविध धर्म कुणी निर्माण केले ? मानवी बुद्धीनंच ना ? मानवी अहंकारानं प्रेरित होऊन मनुष्यानंच ना ? विराट स्वरूपी परमेश्वराच्या घरीं धर्म एकच. त्या एकाच अनादिसिद्ध धर्माची अनंत शकलं करून, धर्माच्या नांवावर रक्तपात करणं, वाटेल तो सावळा गोंधळ घालणं, म्हणजे खऱ्या धर्माची विटंबना नव्हे काय ?

**राम**—पण आज असे विविध धर्म, नाना पंथ सर्वत्र रूढ होऊन बसले आहेत. भिन्न धर्मसमजुती हाडींमाशीं खिळून गेल्या आहेत. विश्वव्यापी धर्माच्या आपल्या या कल्पनेनं त्या त्या धर्मभावनांवर कुऱ्हाड घालूं म्हटलं तरी तें आज शक्य आहे का ? रोशनबी, जगांतले नाना धर्म नाहींसे करण्यापेक्षां धर्मविद्वेष नाहींसा करण्यांत आज अधिक हित होणार नाहीं का ? हिंदूनं हिंदू रहावं पण मुसलमानांचा द्वेष कां करावा ? मुसलमानानं मुसलमान रहावं पण ख्रिस्ती समाजाचा द्वेष कां करावा ? जगांत जर सहिष्णुतेचा प्रसार होईल, धर्मविद्वेष मोडेल, तर काय बिघडलं पृथ्वीच्या पाठीवर नाना धर्म पसरले म्हणून ? विविध धर्म भावनांनीं जगाचं असं काय नुकसान व्हायचं आहे ?

**रोशन**—रामानंद, आपल्याला मी एकच प्रश्न विचारतें. विश्वव्यापी धर्म कल्पनेनं वेडावलेल्या एखाद्या यावनी स्त्रीनं तत्वदृष्ट्या एखाद्या हिंदूवर प्रेम केलं, त्याच्याशीं लग्न व्हावं अशी इच्छा धरली, तर अशा स्त्रीला आपण काय म्हणाल ?

**राम**—या व्यावहारिक जगांत मी तिला वेडी म्हणेन.

**रोशन**—आपण तिचा तिटकारा कराल ?

**राम**—छेः, उलट मी तिची कींवच करीन.

**रोशन**—रामानंद, क्षमा करा. समजा आपल्यावरच तसा प्रसंग आला तर आपण तिच्याशीं विवाह कराल ?

**राम**—बिलकुल नाही.

**रोशन**—याचा अर्थ आपल्या मनांत विश्वव्यापी प्रेम नाहीं, असंच ना ?

**राम**—कोण म्हणेल असं ? सगळ्या जगावर मी प्रेम करूं इच्छितों, पण धर्मबंधनं मात्र तोडूं इच्छित नाहीं. मी मुसलमानांचा मुसलमान म्हणून द्वेष करणार नाहीं. त्यांच्यावर प्रेमच करीन. तरी पण माझं हिंदुत्व नष्ट करणाऱ्या यावनी स्त्रीबरोबरील विवाहाला मात्र मी केव्हांच संमति देणार नाहीं. रोशनबी बसा, येतों मी. रहीमला मी मागाहून भेटेन (जातो.)

**रोशन**—हतभागी रोशन, शेवटीं रामानंदांनीं तुला फसवलं ! मनचे विचार मनींच राहिले ! हृदयींचं हितगुज हृदयींच जिरलं ! आशेनं प्रेमाच्या अथांग सागरांत पोहायला निघालीस पण निराशेच्या मृगजलांत सांपडून फजीत मात्र झालीस. कल्पना सृष्टींतलं मनोराज्य केवढं सुखाचं ? किती वेडी मी ? रामानंदांच्या हृदयाचा ठाव काढायच्या भलत्या भरीस पडून त्या सुखाला मात्र आचवले ! रामानंदांच्या निराकार निर्गुण प्रेमभावनेशीं खेळणारी मी, काल किती सुखी होतं ? पण आज ! आज तरी मी अशी कष्टी कां व्हावं ?

( आनंद भैरवी—त्रिताल )

असुखा वाया । मानस अनिवार घे कां या ? ॥ धृ. ॥ विधि हो सकलां तो नियंता मति ती जगतीं सुफला विफला । भावा सूत्रीं दंपतींच्या रचिता हर्ता मनुजहातीं नाहीं कांहीं; मानि ना ॥ १ ॥

भावप्रवण वेड्या मना, ठेव, हृदयींचं हितगुज हृदयाच्या कडी कुलुपांत असंच कोंडून ठेव. भावनामय रम्य ब्रह्मानंदांत अशीच तल्लीन रहा, आणि भूतदयेचा संसार थाटून निरंतर सुखी हो. पण हे समोर कोण ? मिर्झासाहेब. सुखाची इच्छा मनांत यायची खोटी तोंच दुःखाचं ताट पुढं वाढून तयार. ( मिर्झासाहेब येतो ) या मिर्झासाहेब. आपण यावेळीं आज इकडं कुठं ? रहीमभाईला भेटून त्याची समजूत घालायला वाटतं ?

**मिर्झा**—आपल्याकडेच आलों आहे.

रोशन—मग मला भेटायला आपल्याला इथवर यायची तसदी घ्यायचं कारण नव्हतं. नित्याप्रमाणं मी आज हिंदमुस्लीम युनियनच्या ऑफिसमध्यें यायचीच होतें,

मिर्झा—तिथं भेटून बोलण्यासारखं हें काम नाहीं.

रोशन—मिर्झासाहेब, बाकी आमच्या रहीमचा आपला एक हटवादीपणा. पडली नव्हती का काल गांठ? झाला आहे का कबूल आपला हट्ट सोडायला?

मिर्झा—होय, रहीम कबूल झाला आहे आपला हट्ट सोडायला. पण तो एका अटीवर.

रोशन—ती कोणती?

मिर्झा—आपला हट्ट सोडायला आपण तयार असाल तर.

रोशन—माझा हट्ट? तो कसला?

मिर्झा—माझ्या मागणीचा स्वीकार करून, आपल्या उभयतांच्या शादीला होकार देण्याचा.

रोशन—ही अट रहीमभाईची कीं आपली?

मिर्झा—अट रहीमची. पण मागणी माझी आहे. अट घातली आहे रहीमनं. मागणी केली आहे मी. आतां होकार देणं सर्वस्वी आपल्या हातीं आहे.

रोशन—माझ्या हातीं काय आहे?

मिर्झा—आपण मनावर घ्याल तर आपल्या हातीं सर्व कांहीं आहे. नुसतं होय म्हणायचं.

रोशन—पण माझं मनच घेत नाहीं तसं म्हणायला त्याला मी काय करूं? मिर्झासाहेब, आपलं घराणं खानदानी आहे. श्रीमंती पिढीजाद आहे. अभिजात विद्वत्ता, धार्मिक उदारता आणि मानसिक कोमलता. इत्यादि अनेक गुणांमुळं आपल्याविषयीं माझ्या मनांत पुष्कळ आदर आहे.

मिर्झा—पण प्रेम नाहीं, असंच ना!—मग रोशन आपल्या प्रेमाचा विषय होण्याचं भाग्य ज्याला लाभलं आहे, अशा पुण्यशील पुरुषाचं नांव माझ्या कानीं घालून माझे कान आपण पावन कराल का?

रोशन—तें मला सांगतां येत नाहीं.

मिर्झा—आपल्याला सांगतां येत नसेल तर मी सांगतों.

रोशन—कोण ?

मिर्झा—रामानंद !

रोशन—कशावरून बोलतां आपण हें असं ?

मिर्झा—रोशन, बोलण्यापूर्वी हा एक माझा तर्क होता, पण बोलून घेतल्यानंतर आतां मात्र माझी पुरी खात्री झाली आहे. रामानंदाचं नांव घेतांच आपलं सर्वांग रोमांचित झालं, कपोल आरक्त झाले! आपला हृदयभेद करणारी हीं बाह्य चिन्हं माझी खात्री पटवायला काय थोडीं आहेत ? रोशन, मी, रामानंद, आपण तिघं एका कॉलेजांत शिकलों. बी. एचा तुमचा ऐच्छिक विषय संस्कृत. रामानंदानींच आपल्याकडून करून घेतला. तेव्हांपासून तुमची विशेष सलगी रामानंदांशीं. त्या विशेष सलगीचं रूपांतर आज प्रेमांत झालं असावं असा रहीमला निव्वळ अंदेशा आहे, पण माझी या बाबत खात्री आहे. रोशन, बोला—आतां तरी बोला. प्रेमांत माझा प्रतिस्पर्धी रामानंदच ना ? रामानंदापेक्षां माझ्या ठायीं आपल्याला असा कोणता उणेपणा आढळला कीं त्या योगं आपण माझ्या प्रेमाचा असा अव्हेर करावात ?

रोशन—गुणावगुणाच्या कांटेतोलपणांत प्रेम आंधळं असतं.

( दुर्गा—त्रिताला. )

प्रणयी जना नोहे डोळे; स्मरशर भेदीऽऽ ॥ धृ० ॥
पाही कदा ना प्रेमीं लाभालाऽ ॥ १ ॥

मिर्झासाहेब, आपल्या उभयतांत कोण कुणापेक्षां श्रेष्ठ हें ठरवणं जगाला कठीण जाईल हें मी कबूल करतें. तरी पण प्रेमाचा विषय ठरविण्यांत माझ्या प्रेमाला तितकंसं तें कठीण गेलं नाहीं, हें मी तितक्याच प्रांजळपणं कबूल करतें.

मिर्झा—आपण एक गोष्ट विसरलांत, रामानंद धर्मानं हिंदू आहे.

रोशन—हिंदुमुसलमान हा भेद माझ्या प्रेमाआड येऊं शकत नाहीं.

**मिर्झा**—पण रामानंदासारखा कर्मठ हिंदु हिंदुधर्म सोडून आपल्या प्रेमाचा स्वीकार करील? एका मुसलमान स्त्री बरोबर शादी लावायला तो तयार होईल?

**रोशन**—काय होईल तें कुणी सांगावं! मिर्झासाहेब, मी आपल्याला हात जोडतें. या वेळीं या विषयावर आपल्याशीं एक शब्दही बोलायला मी समर्थ नाहीं. आपला अपमान होईल तर मला क्षमा करा. मी येतें (जाते)

**मिर्झा**—रामानंदावर हिचें प्रेम! त्या रामानंदाबद्दल मला काय वाटतं? द्वेष वाटतो का? त्याचा मला हेवा वाटतो हें खास. एका मुसलमान स्त्रीनं एका हिंदूशीं विवाह करावा, ही गोष्ट माझ्या सारख्या उदार मत-वादी मुसलमानालाही रुचणार नाहीं. मग त्या योगानं रहीम सारख्या एका कट्टया कर्मठ मुसलमानाची तळव्याची आग मस्तकास जाऊन भिडल्यास, त्यांत नवल काय?—पण एका व्यक्तीच्या धर्मांतराकडे बोट दाखवून अगर स्वतःचा स्वार्थ साधत नाहीं म्हणून, हिंदु मुसलमानांनीं एकमेकांचीं डोकीं फोडायला तयार व्हावं, हें मात्र मला आज बिलकूल पसंत नाहीं. दोन चार व्यक्ति हिंदूच्या मुसलमान झाल्या काय, अगर मुसलमानांच्या हिंदू झाल्या काय, म्हणून तेवढ्यासाठीं एकीची बेकी करून, आपापसांत दुही माजवून, राष्ट्राच्या भवितव्यतेवर जाणून बुजून रसरसलेले आगीचे निखारे ठेवावेत, हें अत्यंत हानिकारक आहे! दोघांत भांडणं लावून स्वतःची तुंबडी भरूं पहाणाऱ्या कपटी, कावेबाज मतलबी शेजाऱ्याला स्वार्थ साधायला आयती संधि आणून द्यावी, हा तर आत्मघातकीपणा आहे. आज ना उद्यां सामोपचाराच्या चार शब्दांनीं रोशनचं मन वळलं, तर ठीकच आहे. नाहींतर प्रेमाची फकिरी नशीबीं लिहिलेलीच आहे. ( जातो )

## प्रवेश २ रा

( धनानंदाचें घर. दयाळ येतो. )

दयाळ—हें दयेचं पत्र. भेटायला या म्हणून पत्रांत लिहिलेली हीच वेळ. दये, तुझी मला दया येते, पण तुझ्याबद्दल हृदयांत प्रेम उत्पन्न होत नाहीं त्याला मी काय करूं ? लग्न करायचं तर तें काळ्या मुलीशीं ! दया जर गोरी असती–पण ती गोरी नाहीं, हा का तिचा दोष ?—हा तिचा दोष नसला तरी माझ्या दृष्टीनं हा गुण नाहीं खास. तें कांहीं नाहीं. आपला निर्धार कायम. माया गोरी आहे पण तिच्यांत दयेचा विनय नाहीं. असली उर्मट बायको कोण संभाळील ? पत्नी गोरी तर पाहिजेच. पण अमर्यादशील असतां नये. बाह्यांगा इतकंच अंतरंग मनोहर असेल तरच तें सौंदर्य ! माया गोरी आहे, पण विनयशील नाहीं. दया विनयशील आहे पण गोरी नाहीं. माझ्या दृष्टीनं या दोन्ही कुरुप.

( भूप–त्रिताला. )

सुखवित ना वनिता या । किमपि न गुणा स्वरुपता ना ॥ धृ० ॥ जेवि उडुहि खद्योत गणाना । सुंदर हिरकाणि काच ना । रुपगुण-हिना युवति भामा ना ॥ १ ॥　　( गोरख येतो )

गोरख—दादा, दादा, घोटाळा झाला. बाबा आले. तुम्ही या खोलींत व्हा.

दयाळ—पण देभ आणि मोहन दोघे मागील दारीं आहेत.

गोरख—तें मीं सांभाळतों. प्रथम या दारानं आंत व्हा–( दयाळ दारानें आंत जातो. एका बाजूनें गोरख जातो व दुसऱ्या बाजूनें धनानंद व दया येतात. )

धनानंद—थांब, कुठं चाललीस पुढं पुढं ? काय हमरस्त्यावर लोकांना तमाशा दाखवायचा आहे ? भंडावून सोडलं या कारट्यांनीं घरांत. ही न बोलून शहाणी. ती दुसरी बोलभांड. आणि तो कारटा पक्का नाटकी. तीन पोरं पण तीन रंग ! काय म्हणे त्या गयाळाशीं लग्न लावायची नाहीं. लग्न

केलं तर दयाळाशीं. नाहींतर जन्मभर कुवार ! अग, कारटे ! तूं कुमारी रहाशील खरी पण मी भिकारी होईन तो ! थोबाड फोडून टाकीन पुनः असं कांहीं बरळलीस तर ! बोल, गयाळाशीं निमूटपणं लग्नाला उभी रहाणार कीं मुसक्या बांधून उभी करायला मला भाग पाडणार ? दातखिळी बसली कीं काय ? बोल—होय म्हण. म्हण होय नाहींतर करतों ठार. या रुमालाचा गळ्याला गळफांस लावून जीव घेतों. बोल. बोल. ( गोरख पुढें येतो )

गोरख—बाबा—बाबा—( धनानंद चपापून मागें होतो. ) बाहेर कुणी आलं आहे.

धनानंद—कोण बरं ? गयाळाला बोलवायला पागलला धाडला होता, तो तर नाहीं ?

गोरख—छेः गयाळ नव्हे.

धनानंद—मग कोण बरं ?

गोरख—( स्वगत ) आलं आहे कोण म्हणा. ( प्रकाश ) हो, आले आहेत-कुणी अनोळखी गृहस्थ दिसतात. हातांत एक भलं मोठं नोटांचं पुडकं आहे.

धनानंद—नोटांचं पुडकं !—ठीक ! मग जलदीनंच गेलं पाहिजे. हो—नाहींतर व्हायची साल मजकूर शिल्लक बाकी ठीक ! कारटे, बऱ्या बोलानं कबूल हो. नाहींतर चामडी लोळवीन. आंतडीं बाहेर काढीन. ( जातो )

दया—देवा, देवा ! आतां तूं आमचा अंत तरी किती पहाणार ?

गोरख—ताई, डोळे उघड आणि समक्षच विचार या तुझ्या देवाला.

दया—कोण ? ( दयाळ येतो )

गोरख—तुझ्या देवाचा साक्षात्कार ! कां ताई, लाजलीसशी ?

( कवाली )

लाजूनि उभी तूं कां ? वर देख या दिशेला । विमल लालि गाला कां ये ? धर्मबिंदु भाला ॥ लज्जीत कधीं ना गे मज देखतां तुं बाला । विनय लाज आतां कां हीं ? जरि पाहसी दयाळा ॥ आहे न कुणी येथें परका न घे भयाला । गाय तूं मि गोरख ना हा गोभक्त देख याला ॥

दादा,ते दुसरे गोग्रासवाले ठेवले आहेत दडवन एके ठिकाणी. त्यांना घेऊन येतों इकडं. नाहींतर पडायची बाबांची त्यांची गांठ आणि यायचा भलताच प्रसंग. ( जातो )

दयाळ—दये, बोल कशाला बोलावलंस मला ?

दया—दयाळ, तें मी आपल्याला कोणत्या तोंडानं सांगूं ?

दयाळ—नकोच सांगूस. आतांचा सारा प्रकार मी डोळ्यांनीं पाहिला आहे, आणि कानांनीं ऐकला आहे.

दया—दयाळ, आपल्याशीं मन मोकळेपणानं बोलावं म्हणूनच बोलावलं. पण–

दयाळ—दये, तूं न बोलतांही तुला काय बोलायचं आहे, हें मला कळून चुकलं आहे. तूं जो प्रश्न आतां मला विचारणार आहेस त्याचं उत्तर द्यायला मात्र या वेळीं मी असमर्थ आहें.

दया—दयाळ-( गोरख देभ मोहन येतात. )

गोरख—दादा दादा, चला प्रथम बाहेर व्हा. बाबा पुन्हां इकडंच येताहेत. पण हे पहा–या बाजूनं आलेच. तुम्ही सारे व्हा आंत फिरून या खोलींत. ( दयाळ, देभ, मोहन आंत जातात. ) ताई, तूं इथं उभी रहा. माई सांपडली आहे बाबांच्या तडाक्यांत. बसेल उगीच तंडत त्यांच्याशीं आणि खाईल हातचा मार. ( जातो. माया आणि धनानंद येतात. )

माया—ताई, ताई, मला सोडव ग बाबांच्या हातून.

धनानंद—का ? ही कारटीही इथंच उभी. भंडावून सोडलं आहे या कारट्यांनीं मला. आणि तो कारटा कुठं गेला ? नोटांचं पुडकं घेऊन बाहेर कुणी आलं आहे. दिलीन एक थाप झोकून. बाहेर जातों तों कुणी नाहीं. एकुण काय ? सालमजकूर शिल्लक बाकी ठीक ! कोणत्या नक्षत्रावर हा दिवटा जन्माला आला देव जाणें. पुन्हां इकडं यायला निघालों तों मजघरांत ही खादाड कारटी ! उघड तोंड. मुखडा उघड. नाहींतर देईन एक श्रीमुखांत.

माया—श्रीमुखांत दिलीत तर थोबाड रंगेल पण पोट थोडंच भरायचं आहे ?

**धनानंद**—अग कारटे, बोल, काय करीत होतीस तिथं ?

**माया**—पोटभर खात होतें.

**धनानंद**—काय खात होतीस ?

**माया**—तांदळाचं पीठ.

**धनानंद**—कोरडं ?

**माया**—हो–काय हरकत आहे ? भुकेला भाताऐवजीं कोंडा, आणि तहानेला दुधाऐवजीं ताक.

**धनानंद**—आणि तें चोरून !

**माया**—मग काय करायचं ? मागून मिळत नाहीं; चोरून.

**धनानंद**—काय फुटाणे उडताहेत कारटीच्या जिभलीचे ! जीभ चांगली डागली पाहिजे. भारीच बेताल सुटली आहे.

**माया**—बाबा, चालायचंच असं. अहो आज कालच्या पोरीच तशा.

**धनानंद**—कशा !

**माया**—या अशा !

**धनानंद**—अग कारटे !

**माया**—अहो बाबा !

**दया**—माये, हें असं बोलणं अन् वागणं मुलीच्या जातीला शोभतं का !

**माया**—मग ताई, हें असलं बोलणं अन् वागणं बापाच्या जातीला तरी शोभतं का ?

**धनानंद**—बाप पसंत नसेल तर शोध एकादा फक्कडसा धगड ! धर त्याचा हात आणि हो घराबाहेर. चल. जा. जा—( थापट्या मारतो )

**माया**—( धनानंदाचा हात धरून ) अस्सं ? मग ही चाललें !

**धनानंद**—कुठं !

**माया**— ( गारा–केरवा )

जातें मी कुणा ठाया नवरा जगीं शोधण्यातें ॥ धृ० ॥ तें दर्शन काधिं होई मजला । मम कर देइन त्यातें । या मम धरुनी जनक करातें । देइ अन्य करिं मातें ॥ १ ॥

( दयेचा हात धरून पेटींत निघून जाते. )

धनानंद—ठीक ! एकुण साल मजकूर शिल्लक बाकी ठीक ! या पोरींनीं माझं डोकं पिकवलं आहे. बांधतों यांची मोट गयाळाच्या गळ्यांत, म्हणजे येतील चांगल्या सुतासारख्या सरळ. पण गयाळ कसा अजून येत नाहीं ! हा बेटा बनवावा तसा बनेल, आणि रहीमला दिलेलं वायद्याचं वचनही पुरं होईल. माया आहे गोरी ती कुठंही खपेल. पण मागून दयेची काळी गंडकी हुंडी कशी कुठं पटेल ? जन्मपत्रिकेप्रमाणं आधींच मला आहे साडेसाती. पण ही साडेसाती घराबाहेर घालवतांना जर पैसा खर्चीं पडला तर सालमजकूर शिल्लक बाकी ठीक ! तेव्हां एकीची मागणी व एकीची देणगी अशा दोन्ही मुली या गयाळानं पत्करायचं कबूल केलं हें ठीक झालं. आतां काळजी आहे ती फक्त मोबदला पांजरापोळांतील गायी कशा मिळतील ही ! स्वारी आलीच ( गयाळ येतो ) या गयाळ आलांत ?

गयाळ—आलों खरा पण थोडा वेळ झाला.

धनानंद—वेळ झाला ?

गयाळ—छेः छेः कोण म्हणतो वेळ झाला असं ?

धनानंद —बाकी आणखी थोडा वेळ होता, तर लग्न ठरवायचा मुहूर्त टळला असता-

गयाळ—अहो ठरावापूर्वी मुली तर दाखवाल ?

धनानंद—तें कशाला ? तें होईल मागून सावकाश. अहो या माझ्या दोन्ही पोरी आहेत नाठाळ गायी. एव्हांच हीं मारकीं गुरं तुमच्या अंगावर सोडलीं तर-

गयाळ—तर काय ? शिंगांनीं माझ्या पाठीचा कणा मोडतील कीं काय ?

धनानंद—अशीं शिंगं मोडून वासरांत जाऊं नका. प्रयत्न कराल तर त्या वासरांना दावांत ठेवायला काय शिंगं आहेत !

गयाळ—बाशिंगासाठीं प्रयत्न करणं भाग आहे. बरं पुढं ?

धनानंद—ठीक ! लग्नासाठीं पिवळ्या हळकुंडाखेरीज एक दमडीही खर्च नाहीं करायचा. नेसल्या वस्त्रानिशीं पोरी स्वाधीन करीन.

गयाळ—मग लग्न झाल्यावर पाहिजे तर तीं वस्त्रेंही आपल्याला परत देईन.

धनानंद—आतां फक्त एकच अट. या मुलीबद्दल आंदण काय काय द्यायला कबूल आहांत ?

गयाळ—आंदण ! कुणी द्यायचं तुम्हीं कीं मीं ? अहो माझा वर-पक्ष ना ?

धनानंद—अस्सं ?—मग लग्न फिसकटलं—

गयाळ—छेः छेः छेः, तसं असेल तर आपण म्हणाल तें आंदण द्यायला तयार आहें.

धनानंद—पहा. विचार करा. मागून फिराल.

गयाळ—छेः हो, बिलकूल नाहीं. काय पाहिजे बोला.

धनानंद—आपल्या पांजरपोळांतील देभच्या व रामानंदाच्या मिळून दोनशें तीन गाई—

गयाळ—कशाला ? अरे बापरे कसायाला विकायला ?

धनानंद—कसायाशीं तुमचा काय संबंध ? गायी आणायच्या आणि माझ्या स्वाधीन करायच्या. माझा रहीमशीं वायदा. त्यांत तुमचा काय संबंध ? अहो सोय जाणील तो सोयरा. बोला आहे कबूल ? नाहीं ? लग्न मोडलं—

गयाळ—छेः छेः, अहो कबूल म्हणून काय विचारतां ? अगदीं कबूल.

धनानंद—मग चला. आतां जा. आणि अर्धा तासाच्या आंत गायी घेऊन रहीमच्या कसाई खान्यांत या—

गयाळ—हा पहा चाललों. ( जातो ).

धनानंद—आपणही तडक तिकडंच जाऊन याची वाट पहात बसावं. हा बावळा गायी आणल्याखेरीज खास रहात नाहीं. बाकी यानं आज फसवलं तर सालमजकूर शिल्लक बाकी ठीक ! ( जातो. देभ दयाळ मोहन बाहेर येतात. )

दयाळ—देभ, आपणही आतां इथून तडक कसाईखाना गांठला पाहिजे. मोहन, तूं जा आणि रामानंदांच्या कानीं ही हकीगत घालून त्यानाही तिकडंच पाठवून दे. आम्हीं पुढं होतों. तो पहा गोरख. त्याला बरोबर घेऊन आपण घराबाहेर होऊं. ( जातात ).

---

# प्रवेश ३ रा.

( स्थळ कसाईखाना. धनानंद पागल व रहीम )

**रहीम**—धनानंद, वायद्याप्रमाणं गायी दोनशें चार आणल्या म्हणतोस आणि बाहेरील आवारांत तर गायी दोनशें तीन आहेत. मग एक गाय ?

**धनानंद**—ती गाय या गोपूरच्या पाटलापासन मी खरेदी घेतली आहे. पैसे पटवले आहेत. गाय घेऊन तो पाटील आतां येईल.

**रहीम**—अस्सं ! मग पागल, बाहेर जा आणि आवारांतून त्या गाई इलालखान्यांत घे—

**पागल**—बेशक—ह्यो चाललूं. ( पागल जाऊं लागतो तों रोशन येते )

**रोशन**—खबरदार ! खबरदार या गायींनां हात लावाल तर !

**रहीम**—पागल, काय ऐकतोस हिचं ? चल, जा आणि गायी आंत घे—

**रोशन**—हं–सबूर ! मी बिलकूल गायींना हात लावूं द्यायची नाहीं.

**रहीम**—अरे असा तोंड वासून जागच्याजागीं खिळून काय राहिलास? मी सांगतोंना ? चल जा, गाई आंत घे.

**रोशन**—मी फिरून सांगतें, गायींना मी बिलकूल हात लावूं द्यायची नाहीं.

**रहीम**—गायींना हात लावूं द्यायची नाहींस ?—कसाईखान्याच्या या माझ्या आवारांत मी गाई आंत घेऊं लागलों तर माझा हात धरणारी तूं कोण ?

**रोशन**—मी कोण होय ? मी कोण या गोष्टीचाही विसर पडला असेल तर ऐक. मी रोशन. ज्या बाबांच्या धंद्यावर तूं हा खुशालचंद–पणा चालविला आहेस, त्यांच्याच पोटीं आलेली तुझी सख्खी बहीण.

**रहीम**—म्हणजे एका कसायाचीच मुलगी ना ?

**रोशन**—हो, प्रामाणिकपणं धंदा करणाऱ्या एका कसायाची-कसावाची नाहीं.

रहीम—म्हणजे ! मी कसाब ! मी अप्रामाणिक ! असंच तुझं म्हणणं ?

रोशन—यांत काय संशय ?

रहीम—रोशन, जीभ संभाळून बोल.

रोशन—प्रथम तूं आपली नियत संभाळ.

रहीम—नियत कशी संभाळायची हें तुझं तुलाच कळतं, तर हा प्रसंग या घराला केव्हांच आला नसता. नात्यानं माझी सख्खी बहीण म्हणविणारी तूं--तूंच जर स्वतः नियत सोडून बेशरमपणानं बेहद्द वागूं लागलीस तर तूं माझी बहीण नाहींस असं मला कां वाटूं नये ? रोशन, तूं माझी बहीण असतीस तर माझ्या कट्टया दुष्मानाच्या चिथावणीनं या गायी अडवायला आज या जागीं यावेळीं तूं खास धांवून आली नसतीस.

रोशन—रामानंदांच्या चिथावणीनं अगर हिंदूंच्या पक्षपातबुद्धीनं गायी अडवायला या ठिकाणीं मी आलें, हा तुझा समज चुकीचा आहे.

रहीम—मग तूं इथं कां आलीस ?

रोशन—या गायींचा प्राण वांचवायला.

रहीम—म्हणजे गोरक्षण करायला ! मुस्लीम धर्माविरुद्ध बंडाळी करणाऱ्या हिंदु धर्माला मदत करायला ! होय ना ?

रोशन—छेः बिलकूल नाहीं.

रहीम—नाहीं म्हणून मी थोडाच ऐकणार आहें. गोरक्षणाच्या ढोंगानं मुस्लीम धर्माचं उच्चाटण करून जगांत हिंदु धर्माचं वस्तान बराबर बसवावं । आहे रामानंदाचा गनिमी डाव ! अंध प्रेमानं लागलीस तूंही त्याच्या नादीं. रामानंद तुझा कोण ? काय तो तुझा सगासोयरा आहे ? का तो तुझ्या धर्माचा आहे ?

रोशन—होय, रामानंद माझ्या धर्माचे आहेत.

रहीम—कसा असेल ? जन्मानं तूं मुसलमान ! नात्यानं माझी सख्वी बहीण ! माझा धर्म जर मुसलमान, तर तुझा धर्म कोणता ?

रोशन—माझा धर्म ? माझा धर्म अहिंसा ! भूतदया हा माझा धर्म ! भूतदयेचा हा धर्म जगांतल्या सर्व धर्मांना प्रमाण आहे. विविध धर्मभावनांचं यांत सार आहे. हिंदुमुसलमानच काय, पण जगांतल्या सर्व धर्मांचं

भूतदयेच्या या एका सर्वसंमत तत्वावर एकीकरण करावं, अशी माझी मनीषा आहे. धर्मप्रसारासाठीं मुसलमानांनीं जिहाद पुकारावी अगर ख्रिस्ति लोकांनीं क्रुसेड सुरू करावी, ही का भूतदया ? हिंदुनीं गायींचं रक्षण करावं पण रेड्याचा बळी द्यायला मनाई करूं नये, ही का भूत-दया ? जैनांनीं कबुतरांना दाणे घालावे पण अन्य पक्षी दाणे टिपूं लागतांच त्यांना दगड मारावे, ही का भूतदया ? भूतदयेच्या माझ्या विश्वव्यापी धर्म कल्पनेंत जगातल्या साऱ्या धर्मांचा, साऱ्या धर्म भावनांचा, सारखाच समावेश होतो. रहीमभाई, क्षुद्र कृमीकीटकांपासून तो बुद्धीवैभवशाली मानवी प्राण्यापर्यंत, सानथोर, कोणत्याही धर्माच्या, कोणत्याही जातीच्या कुणाही जीवाला, अत्यल्प इजा झाली, तरी माझ्या देहाला सहस्त्र विंचू डसतात. हिंसेच्या नुसत्या कल्पनेनं माझा जीव कसा व्याकूळ होतो ! प्राण हैराण होतो !

**रहीम**—आणि अहिंसेचं तुझं हें थोतांड पाहून माझाही प्राण हैराण होतो ! भूतदयेच्या या वारेमाफ कल्पना तुझ्या डोक्यांत कोंबून भूताट-कींत सांपडल्यासारखी तुला बेजरब थैमान घालायला लावणारा भूतांचा वेताळ तो रामानंद आहे, हें पाहून तर माझ्या अंगाची लाही लाही होऊन जाते. रोशन, ही भूतदया नाहीं. ही प्रेमाची भुताटकी आहे ! ही अंधजीवाची तरफदारी नाहीं. तर अंध-प्रेमानं अंध झालेल्या जीवाची बद-ख्याली बरळ आहे, हें नुमजण्याइतका मूर्ख हा रहीम खास नाहीं !

**रोशन**— मग मी तरी खरं बोलायला भितें का ? होय, रामानंदावर माझं प्रेम आहे ! पण प्रेमामुळं हे विचार सुचले नसून, या विचारामुळंच प्रेम जडलं आहे. दुर्दैवाच्या वावटळींत सांपडून येऊं नये ती विपरीत वेळ आलीच, तरीहि वेळीं हें प्रेम भंग पावेल, पण प्रेमाला जन्म देणारे माझे हे विचार अभंगच रहा ील !

**रहीम**—कोण बेशरमपणा ! तुझं त्याच्यावर प्रेम आहे ? आज प्रेम असेल, उद्यां शादीहि होईल !

**रोशन**—कुणी सांगावं ? तसंही होईल !

**रहीम**—( स्वगत. ) पण तसं व्हायला त्याला जिवंत ठेवीन तर ना ?

**रोशन**—रहीमभाई—

**रहीम**—चूप ! तुझा भाई म्हणून घ्यायलाही मला शरम वाटते. साऱ्या इस्लामी जगाला काळीमा लावणाऱ्या तुझ्या सारख्या बेशरम स्त्रीचं काळं तोंड पहायची माझी बिलकुल इच्छा नाहीं. चल, दूर हो. पागल, गाई आंत घे—

**रोशन**—हं—खबरदार ! मालकाच्या परवानगीशिवाय बेकायदे-शीरपणानं या गाई कसाईखान्यांत घ्यायला माझी मनाई आहे !

**रहीम**—कायदा कुणाला शिकवतेस मला ? काय ? तूं दूर होत नाहींस ! मग मीच होऊन या गाई आंत घेणार.

**रोशन**—निरपराध जीव वांचविण्यासाठीं मी अशी आड येईन.

**रहीम**—बेफामपणानं अशी आड येशील तर याच सुरीनं, याच जागीं, तुझा मुडदा पाडून मला पुढं जावं लागेल ! चल, हट मागें.—

**रोशन**—बिलकुल नाहीं. या अनाथ गायींचे प्राण वांचत असतील, तर त्या मोबदला या माझ्या क्षुद्र प्राणांचं मोल द्यायला, मी कधींच माघार घ्यायची नाहीं ! उघड्या डोळ्यांनीं मुक्या जीवांची हत्या पहा-ण्यापेक्षां तुझ्या हातांतलि या सुरीनं माझे डोळे मिटतील, तर त्यांत मला आनंदच आहे. म्हणून म्हणतें, प्रथम या गायी सोडून दे. आणि मग पाहिजे तर आपला सुरा चालव. आणि उडव ही माझी मान.

**रहीम**—रोशन, ही हमरी तुमरी सोड आणि दूर हो—दूर हो—

( दयाळ आणि देभ येतात )

**देभ**—दूर व्हा—व्हा सारे दूर—Get away.

**रहीम**—बदमाष बिगरपरवाना या माझ्या आवारांत येणारे तुम्हीं कोण ? बोला कोण तुम्हीं ?

**दयाळ**—बिगरपरवाना ज्यांच्या गायी चोरून आपण या आवारांत आणल्या आहेत त्या गायींचे मालक.

**देभ**—Yes, the owners of the cows in your compound !

**रहीम**—हरामखोर ! या गायी तुमच्या ?

देभ—यांतील तीन गायी माझ्या आहेत. Yes, three in all !

रहीम—तीन गाई तुझ्या ? आणि बाकीच्या ? (रामानंद येतो ).

राम—बाकीच्या दोनशें गायींचा मालक हा हजर आहे!

रहीम—( स्वगत ) अस्सं ! हा वेताळ आणि ही सारी याची भुतावळ ! चांगली गाडून टाकली पाहिजे. ( प्रकाश ) धनानंद, असा पुढं ये, आणि बोल हा काय प्रकार आहे ? या गायी कुणाच्या ?

धनानंद—ठीक. हा पहा गयाळच इकडं येत आहे. तोच सांगेल या गायी कुणाच्या तें. ( स्वगत ) पाहूं या स्वारी पढवलेली नक्कल कशी काय वठवते ती. ( गयाळ येतो ) या, गयाळ, अगदीं वेळेवर आलांत. बोला, या आवारातील पहिल्या गटातल्या तीन गायी कुणाच्या ?

गयाळ—तुमच्या—

देभ—कुणाच्या ?

दयाळ—छेः छेः तुमच्या.

धनानंद—अहो, डोकं नीट ठिकाणावर ठेवून बोला—या गायी कुणाच्या ?

गयाळ—तुमच्या.

राम—काय म्हणालांत तुमच्या !

गयाळ—छेः छेः, कोण म्हणतों असं ! अहो, तुमच्या—

धनानंद—ठीक. एकूण सालमजकुर शिल्लक बाकी ठीक !

रहीम—( स्वगत ) आतां उलटाच डाव टाकावा. ( प्रकाश ) रामानंद, या साऱ्या गायी माझ्या स्वतःच्या मालकीच्या आहेत.

राम—आपल्या ! अस्सं ! काय अधिकार !

रहीम—या गायी या गयाळापासून मी विकत घेतल्या आहेत.

राम—पांजरपोळांत राखणेस ठेवलेल्या गायी मालकाच्या परवानगी-शिवाय परस्पर विकायचा काय हक्क आहे या गयाळाला ? रहीम, या गायी मी खरेदी केल्याबद्दलचं हें खरेदी पत्र आहे. गायी माझ्या मालकीच्या आहेत. त्या आपण बिनहरकत सोडून द्या. दयाळ, जा. गायी सोडून आवाराच्या बाहेर घ्या. ( दयाळ जातो. दुसऱ्या बाजूनें पाटील गाय फर फर ओढीत आणतो. रामानंद धांवत पुढें जातो, ) हें काय ! सोडा,

पाटील, सोडा ही गाय. आपण हिंदु आहोंत. आणि गाय ही हिंदूंची देवता आहे.

**रहीम**—नादान! बेवकूब! हिंदू !-मुसलमानांच्या घरांत, हिंदूंचा हा गोंधळ बस कर. चल बाहेर हो—

**रोशन**—रहीम, रामानंद माझ्याकडे आले आहेत. मला भेटायला आले आहेत. आणि बाबांच्या वुइलप्रमाणं या जागीं तुझ्या इतकाच मलाही हक्क आहे.

**राम**—रहीम, मी आपल्या घरीं आहें. आणि आपल्या इच्छेविरुद्ध मी इथं रहाणं शिष्टाचाराविरुद्ध आहे, हेंहीं खरं आहे. तरी पण या गायीचे हाल माझ्यानं पहावत नाहींत. ही गाय इथून मुक्त झाल्याशिवाय माझं पाऊल इथून बाहेर निघत नाहीं, त्याला मी तरी काय करूं?

**रहीम**—काय घमेंड पहा! जणूं काय जगांतल्या साऱ्या गायींचा धनीच! हा पोळ ही गाय आतां इथून सोडवणार!

**राम**—हो, अलबत सोडवणार! मालकाच्या खुषीनंच ही गाय सोडवल्यावांचून मी इथून हलणार नाहीं!

**रहीम**—बदमाष! मालकाच्या खुषीनं प्रथम बाहेर हो.

**धनानंद**—थांबा, रहीम, बेतलीच आहे तर आतां होऊंद्यात दोन हात. लागूंद्यात काय ते दिवे या वेळीं. एरव्हीं नक्षा नाहीं उतरायचा. तुम्हीं बेफिकीर असा.

( पाटलाच्या कानाशीं कुजबुजतो. पाटील मानेनें होकार देतो. )

**राम**—पाटील, ही गाय आपण विकायला कां काढलीत?

**पाटील**—चालू खरपाडांत, अक्षी निकामी झाली म्हणून. आज तागायत दूधदुभतं दिलंन पण आतां भाकड झाली म्हणून.

**राम**—शिव शिव! काय हे विचार? या गायीची किती जावपीं आपण विकलीं असाल? दूधदुभतं किती खाल्लं असाल? हिच्या दुधावर तुमचीं मुलं बाळं जगलीं आणि आतां ही म्हातारी झाली म्हणून तिला कसायाकडे आणलीत? थोडा विचार करा. आपल्या जन्मदात्या आई इतकेच हिचे आपल्यावर उपकार आहेत. आई वृद्ध झाली म्हणून तिला कोणी

बाजार दाखवीत नाहीं, किंवा तिचा कोणी लिलांवही पुकारीत नाहीं. मग हे मुके पण परोपकारी जीव आपले धर्मांचे आईबाप नाहींत का? पाटील, आपण श्रीगोपालकृष्णाच्या सनातन आर्य धर्मांचे, गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपति शिवाजीमहाराजांच्या जातीचे, जिच्या दुधदुभत्यावर तुमचा हा पिंड पोसला त्या गोमातेला, या आसन्नमरण स्थितींत आपण कसायाला विकायला आणलीत, धन्य आहे आपली! आपली शेतवाडी असेलच—

**पाटील**—आहे. पण उपयोग काय? पीकपाणी बुडालं.

**राम**—पण तें कां बुडालं याचा आपण कधीं विचार केला आहे? पीकपाणी बुडालं खताच्या अभावीं ना? शेतीला लागणाऱ्या बैलांची उपज होत नाहीं म्हणून ना? मग तुम्हींच होऊन स्वतः आपल्या घरचीं गुरंढोरं कसाईखान्यांत आणून सोडतां, आणि शेतवाडी बुडाली म्हणून रडतां. पाटील, गोरक्षणाचं खरं महत्व आपल्यास कळलं पाहिजे.

**पाटील**—पण मला तर यांतलं कायबी कळलं नाय.

**राम**—नाहींच कळायचं तें. आतां कळेल. काय किंमत घेतां बोला या गायीची? माझ्याकडून काय वाटेल तें मोल घ्या. दहा रुपये घ्या. शंभर, पांचशें, हजार, फार काय लाख रुपये घ्या. पण ह्या वेळीं ही गाय इथून सोडली असं म्हणा.

**धनानंद**—अरे, या पाटलाला वायू झाला कीं काय? असा भोंकांड पसरून उभा काय राहिला? पागल, खेच त्याला इथून दवाखान्यांत.

**रहीम**—दे गचांडी लोभी थेरड्याला. पहातोस काय? (पागल धक्की मारून पाटलाला घालवून देतो) रामानंद, बऱ्या बोलानं तुहीं घरचा मार्ग सुधार, नाहींतर तुलाही धक्की देऊन, बाहेर घ्यायची पाळी येईल.

• **राम**—ही गाय सुटल्याखेरीज मी इथून मुळींच हालणार नाहीं.

**रहीम**—हं—आतां गाय कसची सुटते?

**राम**—गाय कशी सुटते? विश्वामित्राच्या हातून वसिष्ठाची सुरधेनु नंदिनी सुटली तशी!

रहीम—त्या झाल्या तुमच्या हिंदु पुराणांतल्या गोष्टी.

धनानंद—पुराणांतलीं वांगी पुराणांत.

रहीम—खेचा त्या गायीला आंत ( गाय खेचूं लागतात. ती हालत नाहीं )

राम—या मुक्या जीवाचे असे हाल हाल कां करितां ? कांहीं दया माया आहे का आपल्या हृदयांत ? कसाईखान्यांत जायला ही दीन धेनु नाखुष दिसते. कां लोटतां बळेंच तिला तिथं ?

रहीम—चल काफीर. नीघ, इथून बाहेर हो.

राम—कसायाच्या हातीं या स्थितींत ही गाय सोडून मी इथन निघून जाऊं ? जीव असा कासावीस कां बरं होऊं लागला ? प्राण असा घुटमळूं कां लागला ?

रहीम—जान घेईन आतां जास्त थेर करशील तर.

राम—मग घ्या, या माझ्या प्राणाचं मोल घ्या, पण या गायीचा प्राण वांचवा ! ही माझी गर्दन उडवा पण या गायीची गर्दन बचवा ! माते, आई तुझं हें दीन वदन पाहून माझं हृदय कसं भडभडून येतं. तुझे हे आर्द्र नयन पाहून माझ्या हृदयाला पीळ पडतो. काय करूं ग ? या मांगांच्या हातून तुझा बचाव तरी कसा करूं ? नको—नको करूंस हें दीन वदन ! तुझा हा हंबारव ऐकून माझे कान कसे बधिर झाले ! दृष्टी पुढं अंधेरी आली. जीवाचं सारं भान हरपलं ! ( गायीला ओढूं लागतात ) नका,—नका हो असे निष्ठुर होऊं ( चाबूक मारतात ) ह्या गाईच्या पाठी-वरील एक एक प्रहार माझं काळीज कसं तोडीत आहे ! हृदय फाडीत आहे. ( पुनः मारतात ) नका हो—नका, आपल्याला हात जोडतों, साष्टांग नमस्कार घालतों. पाहिजेतर या माझ्या उघड्या पाठीवर हे प्रहार करा. पण या गायीला असे मारूं नका या मुक्या जीवाचे असे हाल हाल करूं नका. ( पुनः मारतात ) छे. निष्ठुरपणाची कमाल झाली ! सहनशीलपणाची सीमा संपली ! आतां हाक तरी कुणाला मारूं ? कुणाचा धावा करूं ? गोकुलनिवासी गोपालकृष्णा, आपल्याशि-वाय अन्य कुणाची आठवण मला यावेळीं होणार ? यमुनेच्या डोहांत

कालियाचं मर्दन करून द्वापारयुगांत गोमातेला आपण निर्भय केलीत! गोकुळांत करांगुलीवर गोवर्धनपर्वत उचलून धरून त्यावेळीं आपण गवळ्यांच्या हजारों गायी राखल्यात! आणि आज या कलीयुगांत या दीन धेनुचा आर्तस्वर आपल्याला ऐकवतो ना?—रघुकुलदीपक दिलीपराया, गोसेवेचं आपलं पुण्य फळास येऊन आपल्याला पुत्रलाभ झाला. पण तें आपलं गोसेवेचं पुण्य आजच कुठं कसं लयाला गेलं? छत्रपती शिवाजी महाराज, गोसंवर्धनासाठीं आपण हातीं खड्ग धरल्यावेळीं आपल्याबाजूनं गोसेवेसाठीं खपणाऱ्या प्रत्येक मराठावीराच्या आत्माहुतीनं गोब्राम्हण प्रतिपालक अशी आपली किर्ति दिगंती झाली. पण तें गोपालनाचं आपलं पुण्य याचवेळीं कुठं कसं मावळलं? पाषाणालाही पाझर फोडणारा हिचा हा हंबरडा आपल्याला ऐकवतोना? धावा, गोपालकृष्णा, धावा—

(अभंग)

कोठें गुंतलासी द्वारकेच्या राया। धाव पाव देवा धेनूसी या ॥ धृ० ॥ गजेंद्राचा धावा ऐकुनी धावसी। कां न आज येसी धावोनीया ॥ १ ॥ द्वापारीं राखीली गायी गोप गोपी। आज कां न होसी कृपाळु बा ॥ २ ॥ येसि न धावोनी कापील हा गाय। वधिका हातीं तीसी सोडवीं गा ॥ ३ ॥ जोडीं हात ठेवीं मस्तक चरणीं। धाव धाव झणीं धाव देवा ॥ ४ ॥

(मुरलीरव ऐकूं येतो. गोरख मुरलीधराच्या वेषांत येतो.)

**गोरख**—'गावो मे अग्रतःसन्तु। गावो मे सन्तु पृष्ठतः। गावो मे हृदये सन्तु। गवांमध्यें वसाम्यहम्।' ॐ शांतिः शांतिः शांतिः।

**रहीम**—पहातां काय? खेचा त्या गाईला. (गाय ओढूं लागतात तों राम तिला धरतो.)


**राम**—नाहीं,—नाहीं—या गाईला मी कुणालाही स्पर्श करूं देणार नाहीं. सोडा हा दुबळा जीव!

**रहीम**—काफीर, चल सोड ही गाय, नाहींतर मर—

**राम**—( गाईच्या अंगावर पडून ) मरेन, पण ही गाय मी सोडणार नाहीं. गायत्री हेंच कर्म, गाय हाच धर्म, गाय हाच प्राण, गाय हाच स्वर्ग, हा गोकुलनिवासी गोपाल कृष्णाचा संदेश लवमात्र खरा असेल, तर जगातलं गोसेवेचं सारं पुण्य या गरीब गाईला मिळो, आणि हिची इथून सुटका होवो !

**रहीम**—पागल, काय ऐकतोस ही वटवट—खेच म्हणतों ना. खेच पुढं.—( पागल खेचूं लागतो तों ती गाय रामानंदाच्या पायीं पडून प्राण सोडते ) अरे हें काय झालं ? ही गाय मेली !

**राम**—भगवन् ! धन्य आहे आपल्या लीलेची ! रहीम, पाहिलंत ? ह्याचं नांव गोरक्षण ! मनुष्याला करतां आलं नाहीं, तें एका गायीनंच करून दाखवलेलं हें गोरक्षण ! !



# अंक ३ रा.

## प्रवेश पहिला.

( घनानंदाचें घर. रहीम व घनानंद )

**घनानंद**—रहीम, आपला डाव कांहीं चुकायचा नाहीं. आज आहे माझ्या कुटुंबाची श्राद्धतिथी. आपल्या बहिणीच्या श्राद्धाला रामानंद आंत आलाच आहे. तुम्हीं या बाजूला दबा धरून रहा. इथं फारशी रहदारी नाहीं. युक्तिप्रयुक्तीनं त्याला इकडं आणून सोडतों, आणि आपल्या स्वाधीन करतों. पोरंही आंत गुंतलीं आहेत, आणि त्याला पकडायचा डाव रचून त्या साठीं कृष्णंभटजींना मुद्दाम इकडं बोलावलं होतं, तेही येत आहेत. आपण आंत व्हा आणि इशारा देतांच या. ( रहीम जातो. कृष्णंभटजी येतो. ) या, भटजी उरकलाना सारा विधि ? मग आतां बोला आपल्या गायींची किंमत. गोप्रदानाचं उदक तुमच्या हातावर सोडतों आणि त्याच गायी मी खरेदी करतों.

**कृष्णंभट**—या दोन ढोरांस मस चाळीस रुपये पडले.

**घनानंद**—मग तीस देतों, आहे कबूल ? दहा रुपये माझा फायदा.

**कृष्णंभट**—भागलों मी आणि नफयास तूं धनी ?

**घनानंद**—ठीक, म्हणजे श्राद्धाची दक्षिणा म्हणून फुकटचे दहा रुपये तूं आतांच नाहीं का माझ्यापासून उपटलेस ? हे खर्ची पडलेले दहा रुपये आजच्या आज माझ्या वहींत जमा नकोत व्हायला ? श्राद्धाच्यावेळीं गाय विकत घेऊन तिचं दान करायचं हें नसतं विकत श्राद्ध घ्यायला कुणी सांगितलं आहे ? गोप्रदान, विप्रदान, हे दान सुटे गिरान, अशीं दानंच दानं करूं लागलों तर सालमजकुर शिल्लक बाकी ठीक !

**कृष्णंभट**—घनानंद, तें कांहीं नाहीं. या ढोरांचे मी चाळीस रुपये घेईन. ( गोरख येतो. )

**गोरख**—‘दया धर्मका मूल हें तत्त्व ज्यांचें । कसे ढंग हे आज तद्वंशजांचे । स्वहस्तें जिहीं गोप्रदानास द्यावें । तिहीं गायिला कां कसाया विकावें ? । ’ जय जय श्री गोमाताकी जय.

**धनानंद**—बस कर तुझं हें गोमातेचें पुराण. नाहींतर थोबाड रंगवीन. ( स्वगत ) हा कारटा इकडं कसा आला ? ही दिडका आंत नेऊन सोडली पाहिजे.

**गोरख**—बाबा, ह्या कृष्णंभटजींनीं आपल्याला फसवलं हें मी सांगायला आलों आहे. भटजीनीं गोप्रदानासाठीं आणलेल्या गायी नव्हत. त्यांपैकीं एक वासरूं आहे. आणि दुसरा बैल आहे.

**धनानंद**—अरे चोरा. मग घे पांच रुपये आतां. एक पैसुद्धां जास्त देणार नाहीं.

**कृष्णंभट**—अहो, या दोन ढोरांचें मोल पांच रुपये ? ( रामानंद येतो)

**राम**—कसला सवदा चालला आहे कृष्णंभटजी ?

**धनानंद**—( स्वगत ) ठीक ! काम सोळा आणे फत्ते. आतां रहीमला इशारा द्यावा, आणि या गोरखला खोलींत कोंडून ठेवावा. (उघड) हा कारटा भोकांड पसरून कसा हसतोय पहा. कांहीं भय, भीति—? चल नीघ—नीघ इथून— ( गोरख पुढें व धनानंद जातात. )

**राम**—भटजी, प्रायश्चित्तार्थ वैतरणी पार होण्याकरितां, वगैरे ज्या अनेक विध हेतूनं हें गोप्रदान करण्यांत येतं, त्या धार्मिक विधीची आपल्या या धर्मबुडव्या कृतीनं विटंबना होत नाहीं का ? ' वर्णांनां ब्राह्मणो गुरुः ' आपणच जर असे स्वैर आणि स्वछंदी वागूं लागलांत, तर वर्णाश्रमधर्माचा पाया कोसळून हिंदुसमाजाचं धर्म-मंदिर जमीनदोस्त व्हायला वेळ तो कितीसा लागेल ? ( कृष्णंभट रामानंदाचे पाय धरतो. ) उठा, मी जाणतों आपण फसलां. पुन्हां असे चुकूं नका. ( धनानंद येतो. )

**धनानंद**—भटजी, गप्पा मारीत बसलांत आणि आंतला पूजेचा पसारा कोण उरकील ? चला जा आपल्या उद्योगाला. ( कृष्णंभट जातो, धनानंद खूण करतो. रहीम दोनचार नोकर घेऊन येतो. )

**रहीम**—पकडा या बदमाषाला.

**राम**—कोण ?

**रहीम**—मी रहीम !— ( रामानंदाला पकडतात. )

धनानंद—चला उचला याला. इथून तडक मोटार, (रामानंदाला उचलून नेतात.) रहीम, कबूल केल्याप्रमाणं याला पकडून तर आपल्या स्वाधीन केला, आतां पुढील काम—

रहीम—माझं!–मोटारीनं एकदां का माझ्या बंगल्याचं तळघर गांठलं कीं भरलींच त्याच्या आयुष्याचीं पुरीं वर्षं!

धनानंद—पण रहीम, यांत माझं नांव—

रहीम—बिलकुल घेत नाहीं, त्याची काळजी नको. तूं मात्र यांतील एक अवाक्षरही कुठं बोलूं नकोस. मी येतों. (जातो.)

धनानंद—हो–नाहीं तर व्हायची सालमजकुर शिल्लक बाकी ठीक!

(जातो व दुसऱ्या बाजूनें गोरख येतो.)

गोरख—यांचा डाव कळून चुकला–पण आतां मामानां बांचवावं कसं? तडक रोशनबीना गाठावं. (जातो.)

## प्रवेश दुसरा

(स्थळ—रहीमच्या बंगल्याचा बहिर्भाग. बाहेर एक गाय बांधलेली आहे. जवळ वासरूं आहे.)

रोशन—रहीमचा कोण हा खुनशी स्वभाव. रामानंदांचा सूड घ्यायची त्याची मजल इतक्या थराला जाईल, अशी मला कल्पनाही नव्हती. पण या त्याच्या राक्षसी कृत्याबद्दल मी त्याच्यावर रागावूं का रामानंदाची ही अल्पशी सेवा करण्याची संधी आणून दिल्याबद्दल मी त्याचे धन्यवाद गावूं? या क्षणिक आनंदाचा करुणेंत तर अंत होणार नाहीं ना?

(बागेसरी–झपताला.)

देवा हीनादीना वाली तुं जागीं या नेसी विनाशा मनींचें विपद गा ॥ ध्रु. ॥ खेद मानु मी का मानूं सुखाला ना या सुखाशा मनीषा ना सफला ॥ १ ॥

(रामानंद येतो.)

**राम**—रोशनबी, आपले उपकार मी कसे फेडूं ?

**रोशन**—उपकार कसले यांत !

**राम**—किती थोर हृदय आपलं! आपण आज मला जीवदान दिलंत—

**रोशन**—कर्तव्यच केलं मी माझं—

**राम**—थोर माणसाच्या मनाची थोरवी अवर्णनीय असते. एकाच मातेच्या उदरीं जन्माला आलेलीं आपण उभय भावंडं. आपलं हें उदार मन पाहिलं अन् रहीमचा विश्वासघातानं माझा प्राण घ्यायचा बेत—

**रोशन**—गोरखकडून मला वेळींच न कळता तर या क्षणीं काय भलताच प्रसंग येता ?

**राम**—तो तसा खरोखरच येता, तर आपल्या कोमल हृदयाची, उदार मनाची साक्ष पटण्यापूर्वीच, हे डोळे मिटण्याचं दुर्भाग्य लाभून, त्यावेळीं मात्र तसा भलताच प्रसंग येता, असं आतां मलाही वाटूं लागलं आहे, रोशनबी, हिंदुमुसलमानांच्या एकीला आपण नित्य मदत देतां, गोरक्षणासाठीं अहर्निश झटतां, याबद्दल सारी जनता तर आपली ऋणी आहेच. पण सर्व काळीं सर्वस्थळीं सावलीसारखी मागं राहून माझ्यावर आपण नित्य उपकाराचं ओझं लादतां, याबद्दल मी आपला जन्माचा ऋणी आहे. कां घालतां उगाच आपले स्वतःचे प्राण धोक्यांत या रामानंदासाठीं ? बोला, रोशनबी, बोला—

**रोशन**—क्षमा करा. मला याचं उत्तरच देतां येत नाहीं.

**राम**—आपण आज अशा कष्टी कां ? आपल्याला कष्टी पाहून माझ्या जीवाला असह्य दुःख होत आहे. बोला, आपले क्लेश दूर करायचं सामर्थ्य ईशकृपेनं या रामानंदाच्या ठायीं आहे. म्हणून म्हणतों बोला.

**रोशन**—नाहीं—रामानंद, तें सामर्थ्य आपल्याठायीं नाहीं—

**राम**—काय म्हणालांत ? तें सामर्थ्य माझ्या ठायीं नाहीं ?

**रोशन**—खास नाहीं.

**राम**—कशावरून म्हणतां आपण हें असं ?

**रोशन**—आपले विचार मी पुरतेपणीं जाणतें म्हणून.

**राम**—आपण काय बोलतां हेंच मला कळत नाहीं.

**रोशन**—आपल्याला कांहींच न कळावं म्हणून आजवर केलेला प्रयत्न मानवी हृदयाच्या दुर्बलतेनं आज असा विफल केला. ह्या हृदयकपाटांत कोंडून ठेवलेली कोमल भावना—आतां मी आपल्यापासून कशी लपवूं ?—रामानंद,

( पिलु—केरवा )

सारा आपुला भरंवसा नाहीं कुणी तारणार । नसे तारणार । मातें कुणी तारणार ॥ धृ. ॥ विकल प्राण बोलुं कैशि ? कां मज अवमाना ? कां हो कां या दासिला ना । घ्या हो; अंगना हि घ्या कराला ॥ १ ॥

**राम**—अरेरे ! या घटकेपावेतों या गोष्टीची मला स्वप्नांतही कधीं कल्पना शिवली नाहीं. आजवर मी आपल्याशीं मोकळ्या मनानं वागलों, बोललों चाललों—पण हें असं असेल, हा विचारही कधीं चुकून सुद्धां माझ्या डोक्यांत आला नाहीं. रोशनबी, दैवानं कोणत्या विपरीत परिस्थितींत लोटून दिलं आपल्याला हें ?—

**रोशन**—रामानंद, क्षमा करा—येतें मीं.

**राम**—थांबा—एक क्षणभरच थांबा. कुठं चाललांत आपण ?

**रोशन**—खरंच, कुठं चाललें मी? रामानंद, सांगा. मी कुठं जाऊं ? काय करूं ?

**राम**—रोशनबी, प्रथम मन स्थिर करा. शांत व्हा.

**रोशन**—विरोधी भावनांच्या उर्मी उसळत असतां मन शांत कसं होईल ?

**राम**—विवेकानं !—अचल मेरुपर्वतासारखं नित्याचं निश्चल असं माझं मनही किंचित्काल अस्थिर झाल्याखेरीज राहिलं नाहीं हें खरं, पण लगेच परमेश्वरी करुणा भाकतांच तें शांतही झालं ! तीच परमेश्वरी करुणा भाका आणि विवेकानं मन स्थिर करा —शांत व्हा—

**रोशन**—अंतःकरणाची शांति अढळ राखायचा कितीही निर्धार केला तरी आतांसारखं एकादेवेळीं हृदयाची कालवाकालव होऊन, भावनांचा भडका उडून जातो, त्याला मी तरी काय करूं ?

**राम**—रोशनबी, एकतर माझे विचार आपण जाणतांच. आपला विवाह झाला तर हिंदुधर्मशास्त्राप्रमाणं मी अनंत पापी ठरून, रौरवाचा अधिकारी होईन, अशी माझी अजूनही प्रामाणिक समजूत आहे. पण आपल्या आतांच्या उपकाराची फेड म्हणून इतकं खडतर प्रायश्चित्तही भोगायला मी तयार झालों असं किंचित्काल मानलं तरी त्यायोगं आपल्या गोरक्षणाच्या कार्याची केवढी हानी होईल, अलंदुनिया आपल्या या पवित्र कार्यावर वैषयिक प्रेमाची कशी आग पाखडील, या एका विचारानं माझी सारी अक्कल गुंग होऊन जाते. रोशनबी, आपला विवाह झाला तर आपल्याला स्वर्ग सुटेल, चारित्र्य चुकेल, मायदेश मुकेल, धर्म बुडेल, पवित्र कर्तव्य फसेल !

**रोशन**—रामानंद, आपला वृथा समज झाला. या साऱ्या गोष्टी मला कळत नव्हत्या अगर नाहींत असं का आपल्याला वाटतं ? परिस्थितीची व शक्याशक्यतेची योग्य जाणीव जर मला नसेल, तर आपल्यावर प्रेम करायला मी अपात्रच ठरेन. आपल्या वल्लभाला चारित्र्यहीन झालेला पाहून कोणत्या रमणीला आनंद वाटेल ? केवळ, लग्नाच्या स्वार्थी विचारानं मी अस्थिर झालें, असाच आपला समज झाला असल्यास मला क्षमा करा. रामानंद, रमणीचं हृदय हेंच खरं त्यागाचं मंदिर आहे ! त्याग हाच खऱ्या रमणीचा आदर्श आहे ! परोपकाराच्या पवित्र क्षेत्रांत, मानवजातीच्या उद्धार कार्यांत, कायावाचामनानं आपला देह झिजवून आपण क्लेश भोगीत असतां लग्नाच्या सुखसोहळ्यांत दंग होण्याइतकी स्वार्थी ही रोशन खास नाहीं. लौकिकी लग्न हेंच कांहीं माणसाचं जीवित–साफल्य नाहीं. आज मला आपल्या विचारांची पुरती ओळख झाली, ब्रह्मचर्यव्रताची आपली शपथ माझ्या कानीं आली. मीही आज मोठ्या आनंदानं अविवाहीत राहून पवित्र मनानं आपल्या कार्याला वाहून घेतें. रामानंद,

( सारंग–केरवा. )

झालां गुरु मला आत्मा सुखविला । वाहि देह आतां आर्ता जनाला दिनाला या हिंदभूला ॥ ध्रु० ॥ प्रेमभंग झाला, भाव भवाच्या जाइ लयाला, भावें विनता भारता ही हिंदबाला ॥ १ ॥

**रामानंद**—अहाहा! खरोखर धन्य आहे आपली. आपला हा अलौकिक त्याग साऱ्या दुनियेला आदर्श होईल. आपल्या या अपूर्व आत्मत्यागाच्या उज्वल किरणांनीं या रामानंदाचं तेजही फिकं पाडलं आहे. (रहीम येतो.)

**रहीम**—रामानंद! कुठं आहे रामानंद?—हरामखोरा, त्या तळघरांतून पळालास नाहीं? कोणी सोडवलं तुला तिथून?—

**रोशन**—मी! मी सोडवलं त्यांना तिथून! रहीम, विश्वासघातानं दुसऱ्याचा प्राण घ्यायला निघालास. पण हें खुनशी कृत्य करायला पुढं पाऊल टाकण्यापूर्वी वाडवडिलांच्या नावालौकिकाची तरी कांहीं चाड बाळगायची होतीस.

**रहीम**—वाडवडिलांच्या नांवलौकिकासाठींच तर जीवावर असा उदार होऊन, मी याचा प्राण घ्यायला निघालों आहे. मी जाणतों कीं याच्या खुनाबद्दल उद्यां मला फाशीं जावें लागेल. खुशाल मोठ्या आनंदानं उद्यां फांशीं जाईन. पण माझ्या लौकिकवान घराण्यांतील एका स्त्रीशीं व्यभिचार करणाऱ्या माझ्या सख्या बहिणीला बाटवणाऱ्या या बाटग्या हिंदूला आज ठार करीन.

**रोशन**—तोबा! तोबा! ऐकवत नाहींत हे शब्द. रहीम काय बोलतोस हें?

**रहीम**—बोलूं नको तर काय करूं? या हरामखोराला पाहिलं कीं माझ्या तळव्याची आग मस्तकास जाऊन भिडते, आणि वाटतं कीं एकदम जाऊन याच्या नरडीचा घोटच घ्यावा. (रामानंदाच्या अंगावर धावून जातो. मध्यें रोशन येते.) रोशन, तूं अशी आड येशील तर मागाहून पस्तावशील. बाजूला हो. काय नाहीं? मग कुळाला लागलेला डाग प्रथम तुझ्याच रक्तानं धुतों. (तिचा हात धरून तिला ओढणार तोंच मिर्झासाहेब येतो).

**मिर्झा**—हं, खबरदार! बेहिंमती माणसा, एका स्त्रीवर, प्रत्यक्ष पाठच्या बहिणीवर असा हात उचलायला तुला लाज नाहीं वाटत? चल हो मागं.

**रहीम**—मिर्झासाहेब, आपण धर्मानं खरोखरच मुसलमान असाल तर या बेशरम बाटग्या स्त्रीची तरफदारी करायला आपल्यालाही शरमच वाटली पाहिजे.

मिर्झा—रहीम, रोशननं रामानंदाबरोबर शादी लावावी ही गोष्ट मलाही आवडणार नाहीं. वैयक्तिक स्वार्थाचा प्रश्न सोडून दिला तरी हिंदु मुसलमानांत असे विवाह व्हावेत, हें तत्वच मला बिलकुल मंजुर नाहीं. हें जरी खरं आहे तरी आपल्या पुढं मला एक सवाल टाकायचा आहे. रोशननं रामानंदाबरोबर शादी लावायचं जर मनांतच आणलं, तर तिला अटकाव करायचा आपल्याला काय अधिकार आहे ? रोशन वयानं मेजर आहे. आपण फार तर तिला घरांतून हांकून लावाल, कदाचित् जन्मभर आपण तिचं तोंडही पाहणार नाहीं. पण तिचे, अगर या रामानंदाचे प्राण घ्यायला आपण निघणं म्हणजे शुद्ध आततायीपणा आहे.

रहीम—जगाचा काय वाटेल तो प्रवाद सहन करायला मी तयार आहे. पण प्रथम या हरामखोर हिंदूला आणि नंतर या रोशनला—

राम—हरामखोर कोण मी ? काय केली आहे कुणाची मी हरामखोरी ?

रहीम—कुणाची ? कुराणाची ! महंमद पैंगबराच्या साऱ्या इस्लामी धर्माची ?

राम—जगांतले सारे धर्म हिंदु धर्माइतकेच मला पवित्र आहेत. जगांतल्या कुठल्याच धर्माशीं अगर धर्म प्रथाशी जर माझा द्रोह नाहीं तर तो इस्लामशीं तरी कसा असेल ?

रहीम—द्रोह नाहीं ? मग ही गोरक्षण चळवळ कशाला ?

राम—गोरक्षण चळवळ गोरक्षणाला—गायीचें रक्षण करायला.

रहीम—मग त्या योगं इस्लामी धर्माशीं द्रोह होत नाहीं ?

राम—कोण म्हणतो असं ?

रहीम—मी म्हणतों असं.

मिर्झा—पण कुराण तर असं म्हणत नाहीं. 'अल्लापावेतों बळी दिलेल्या जिवांचं मांस अगर रक्त पोंचत नाहीं, तर प्रार्थना पोंचते ' असं ज्या कुराणांत लिहिलं आहे, तें कुराण तर सांगत नाहीं. ' गाई इत्यादि चतुष्पाद जनावरं खाण्याकरितां नाहींत, दुध ओझी वहाणें या कामाकरितां आहेत, ' अशी ज्या कुराणाची सक्त आज्ञा आहे, तें कुराण तर असं सांगत नाहीं ?

रहीम—पण मुसलमानी धर्मांत इदीच्या पवित्र दिवशीं गोवधाची जरूरी आहे—

मिझी—नाहीं—असं मी दाखवून देतों. इब्राईम पैगंबराच्या इमानाची परीक्षा करण्याकरितां अल्लानं त्यांस सांगितलं—बाबा तुला आवडत्यांत आवडती अशी वस्तु तूं मला अर्पण कर. इब्राईम प्रभूकरितां इस्माईल नांवाच्या आपल्या पुत्राचा बळी द्यायला तयार झाला. पण प्रभूच्या लीलेनं इस्माईलच्या ठिकाणीं बकरं झालं, आणि इब्राईमच्या हातून मुलाऐवजीं बकरं कापलं गेलं. पुढें अल्लानें तें बकरंही सजीव केलं. अशी ही बकरी-इदीची मूळकथा आहे. या कथेशीं अगर सणाशीं गायीचा काय संबंध ? या सणांत जनावर बळी द्यायच्यावेळीं जो मंत्र म्हटला जातो, त्यांतही गायीचं नांव कुठंच नाहीं. 'दुम्बा' नावाच्या मेंढराच्या जातीचा मात्र उल्लेख आहे.

रहीम—पण मुसलमानांत तर अशी चाल आहेना ? मग हिंदूनीं तरी एवढा अट्टाहास कां धरावा ?

मिझी—पण मी म्हणतों, मुसलमानांनीं तरी हा वेडा दुराग्रह कां धरावा ? हिंदूंच्या धर्मशास्त्रांत गोवधाचा निषेध मानला आहे. गाय मारली असतां हिंदुलोकांना आपला धर्म बुडाला असं वाटतं ? पण गाय मारण्यांतच मुसलमानांचा खरा धर्म नाहीं किंवा एकाद्या सणाच्या दिवशीं गाय मारलीच पाहिजे, अशी कुराणाचीही आज्ञा नाहीं. मग ज्या बारीक सारीक गोष्टी धर्माची प्रधान अंगें नाहींत, ज्या केल्याच पाहिजेत, न केल्यास धर्म बुडतो, अशी धर्माज्ञा नाहीं, त्या केल्यानं जर हिंदु नाखुष होत असतील तर त्याबद्दल मुसलमानांनीं तरी विनाकारण कां हट्ट धरावा ?

रहीम—मुसलमानांचा हट्ट, बेवकूफ हिंदूंच्या गोरक्षण चळवळीमुळं.

राम—पण गोरक्षणाची उभारणी आम्हीं मुसलमानबंधूंच्या प्रेमसंपादनावर केली आहे. गोवधबंदी आम्हीं जबरीनं मागत नाहीं, लीनतेनं मागतों ! शत्रुत्वानं मागत नाहीं, बंधुत्वानं मागतों ! फुटीकरितां मागत नाहीं. जुटीकरितां मागतों ! ताठ्यानं मागत नाहीं तर गोडीगुलाबीनं मागतों !

रहीम—गोडीगुलाबीनं मागतां, मग त्यायोगं साऱ्या मुसलमानांची मनं कां दुखली जातात ?

राम—कुणाची मनं दुखली जातात ? प्राचीन काळीं कायद्यानं अगर मृत्युपत्रानं गोवधबंदी करणाऱ्या मोगल बादशाहांची मनें तर दुखलीं गेलीं नाहींत. आणि आज तरी आपल्या गोपूर हिंदुमास्लेम युनियनचे अध्यक्ष हे मिर्झासाहेब, अफगाणिस्थानचे अमीर हबीबुल्लाखान, इत्यादि थोर समंजस आणि शहाणे मुसलमान पुढारी, तसेच इस्लामी धर्माचे प्रमुख मौलाना यांची मनें तर दुखली जात नाहींत !

रहीम—म्हणजे माझं मन दुखलं जातं. तेव्हां मी असमजस—मी मूर्ख—हाच तुझ्या बोलण्याचा रोख ना ? मग ऐक—माझं—या रहीमचं मन या चळवळीनं दुखलं आहे. माझ्याशीं तूं हरामखोरी केली आहेस, आणि म्हणूनच तुझ्याशीं माझं वैर आहे.

राम—कोण म्हणतो असं ? या रामचं रहीमशीं वैर ? बिलकुल नाहीं. रामरहीम दोन नाहींत—एक आहेत. जी रामची जन्मभूमी तीच रहीमची ना ? ज्या भूमीवर राम वाढणार, फिरणार, जगणार, त्याच भूमीवर रहीमना ? ज्या भूमींत रामची रक्षा पडणार त्याच भूमींत रहीमचं दफन होणार ना ?

रहीम—अस्सं ? म्हणजे माझं दफन व्हावं—मी मरावं हीच तुझी इच्छा ! हरामखोर ! तुझ्याशीं वितंडवाद घालीत बसण्यांत काय अर्थ आहे ? तुला एकदम गाडून टाकला पाहिजे. ( अंगावर धाऊन जातो )

रोशन—रामानंद, मागं व्हा—मागं व्हा—

राम—छेः ! प्रत्यक्ष प्रलयकाल लोटला, खालून पृथ्वी दुभंगली, अगर वरून आकाश कोसळलं, तरी हा रामानंद इथून रेसभरही हालणार नाहीं.

रहीम— झंपा.

वद वृथा ना या वचा । तव असुहननिं न लव भयासि पदा मनिं माझ्या ॥ धृ० ॥ कुलोच्छेद मम शठमनिं असतां । खल भगिनिरता । हतबल करि तुज जीवास अंतास संताप मनाचा ॥ १ ॥

घमेंडखोर, मग मर—( रहीम हातांतलि लाठी मारण्याला पुढें होतो. तो पाय घसरून तोंडघशी पडतो, व बेशुद्ध होतो. राम त्याला सांवरून त्याचें डोकें आपल्या मांडीवर घेतो. वारा घालतो ).

**मिर्झा**—रोशन, थोडं पाणी घ्या लवकर.

**रोशन**—आंतून पाणी घ्यायला वेळ लागेल. ही फतिमा-रहीमचीच पाळलेली दुधाची गाय इथं आहे. हिचंच दुध पाजा. ( रोशन गायीचें दूध पिळून आणून देते. राम तें त्याला पाजतो. रहीम सावध होतो. )

**रहीम**—कोण ? रामानंद ?—तूं देव कीं सैतान ?

---

## प्रवेश ३ रा.

( धनानंदाचें घर—दयाळ )

**दयाळ**—खरंच, दया किती सालस समंजस आणि प्रेमळ आहे ! कुणाही माणसावर सहज छाप पाडील असे तिच्या अंगीं गुण आहेत. देवानं तिला रूप दिलं असतं-विधात्यानं तिला गोरी सुंदर केली असती, तर किती छान झालं असतं ? माझं मन असं डळमळूं का लागलं ? सौंदर्य का सद्‌गुण ?—सद्‌गुण नकोत कुणाला ? ते तर हवेतच. पण सद्‌गुणाच्या हिरकणीला सौंदर्याचं कोंदण नसेल तर काय आहे मजा ? बस्स, आपला निश्चय कायम—त्यांत चलाविचल होऊं देतां नये. पण ही पहा दयाच इकडे येत आहे. ( दया येते )

**दया**—दयाळ, अगदीं वेळेवर आलांत. आपलीच भेट पाहिजे होती. त्या गयाळाची स्वारी आज आम्हां दोघींनां पहायला यायची आहे.

**दयाळ**—आणि तेवढ्या साठींच तर मी हा आलों आहें. त्याची कशी काय फटफजिती करून त्याला काढून लावायचं, हें गोरखला मी नीट पढवून ठेवलं आहे—

**दया**—या फटफजितीनं काय व्हायचं आहे—?

**दयाळ**—अग शहाण्याला शब्दाचा मार. पण असल्या बेअकली माणसाच्या वांट्याला विटंबना. विटंबनेच्या मार्गानं आला शुद्धीवर आणि घेतली माघार तर ठीक—नाहींतर आहेतच दुसरे उपाय.

**दया**—दुसरे तिसरे उपाय करायचे आहेत काय ? आपल्या हातीं आहे तो एक उपाय करायचा नाहीं.

**दयाळ**—कां बरं ? माझ्या हातीं आहे असा प्रत्येक उपाय करायला मी तयार आहे. दये, अशी लाजूं नकोस. मी समजलों तूं काय म्हणतेस तें. देभशीं तुझं लग्न ठरवून द्यावं–( गोरख येतो )

**गोरख**—ठरलं ! दादा, देभशीं लग्न ठरलं–

**दयाळ**—कुणाचं ? केव्हां ? ( माया येते )

**गोरख**—विचारा या माईला. देभनी होकार दिला. खरं ना माई ? पहा कशी लाजली ती !

**माया**—हो माझं अडलं आहे खेटर लाजायला–!

**गोरख**—अरे हो, ही लाजेल कशी ? तिचं देभवर काय चोरटं प्रेम आहे ? मी सरळ गेलों, देभना भेटलों, आणि लग्न ठरवन टाकलं–

**दयाळ**—काय घोंटाळा केलास तूं हा गोरख ? मी दयेसाठीं देभला विचारणार होतों. मायेच्या आधीं दयेचं नको का कुठं जुळायला ?

**गोरख**—तें तर केव्हांच ठरलं आहे.

**दयाळ**—कुठं ?

**गोरख**—म्हणजे ? अजून नाहीं ठरलं ? दादा–ताई–! म्हणजे ? हा वेळ पावेतों–

**दयाळ**—तूं मूर्ख नाहींस, असा माझा समज होता. पण तूं तो आज खोटा ठरवलास. दया कांहीं तुझ्या इतकी मूर्ख नाहीं. ती शहाणी आहे. ती काय माझी आवड निवड जाणत नाहीं. ती जाणते, कांहीं झालं तरी मी कांहीं काळ्या कुरुप मुलीशीं लग्न करणार नाहीं. ( दया फणकाऱ्यानें निघून जाते. )

**गोरख**—किती कठोर आहांत हो दादा तुम्हीं ? ताईला काय वाटेल यानं ?

**दयाळ**—मग मला काय वाटेलं यानं, त्याचा माझा मी विचार नको का करायला ? ते राहूं द्या सध्यां. गयाळ यायची वेळ झाली. पढवलेल्या नाटकाची कितपत तयारी आहे ?

**गोरख**—ताईला विचारलं. ती पडली सभ्य. तिनं नाकारलं. माई कबूल झाली. होयना माई ? आमच्या नकला पाठ. रंगी तालीमही घेऊन पाहिली आहे.



रामः—वरून आकाश कोसळलं तरी हा रामानंद इथून रेसभरही हालणार नाहीं. ( पान ६२. )

Blocks & Printing by Manoranjan Press, Bombay.] [ Photos by M. N. Kirtikar, Bombay.

**दयाळ**—काम कसं बेमालूम झालं पाहिजे.

**गोरख**—त्याची नको काळजी.

**दयाळ**—मी येतों तर. ( दयाळ जातो )

**गोरख**—अरे वा:, माई हा वेळ पावेतों माझं इकडं लक्षच गेलं नाहीं. अग आज हा तुझा थाटमाट !

**माया**—मग आहेच मी प्रेक्षणीय तशी.

मनोज्ञ बाला असें तशी जागीं मी दिसाया !

नटुनि उभी अशि; का वर ना प्रित पाहुनिया ॥ धृ० ॥

**गोरख**—म्हणजे ? वर ? कोण ?—

**माया**—न ये मुखातें नाम वदाया। विनया घे भावी ना जाया ? ।

नरवरा प्रियकरा नटूनी थटूनी भुलवी तया । झुलवि

कशी बघ पतिहृदया ॥ १ ॥

उगाचि का पहायला यायचे आहेत ते. जन्म गांटीचा प्रसंग.

**गोरख**—म्हणूनच वाटतं बाबांनीं थैलीची गांठ सैल करून तुम्हांला इतक्या सजवून काढल्या ! जशा कांहीं गौरीच !

**माया**—भोलाशंकर यायचा आहे ना पहायला.

**गोरख**—शंभू महादेव म्हण. बाकी हा शंभू महादेव खरा. कारण शंभू महादेवाचा सासरा दक्ष, आणि याचा सासरा म्हणजे आमचे बाबा आपलं डबोलं राखायच्या कामीं आहेतच सदा दक्ष. शंकराला होत्या दोन बायका. एक डोक्यावरील गोरी गंगा आणि दुसरी मांडीवरील काळी कालिका. आमचा हा शंभू महादेव तुला नाचवील डोक्यावर आणि ताईला खेळवील मांडीवर.

**माया**—थांब हां. तुलाच प्रथम मी खेळवतें चांगली. ( त्याला दोन्हीं बाजूंनीं थापट्या मारते ).

**गोरख**—भिल्लिणीच्या वेषांत तो बं–भोला किरात यायच्या पूर्वीच हें नर्तन सुरूं झालं वाटतं ! अहाहा, पायावर नक्षत्र पडल्यासारखी कशी

नाचते आहे नक्षत्रासारखी माझी बहीण ! हें नृत्य पाहून त्या भोळ्या शंकराला तांडवच करावं लागेल !

माया—कशाला येतो आहे मेला इकडं ?

गोरख—तुम्हांला पहायला—

माया—काय समजतं आहे त्याला.

गोरख—समजायला नको कांहीं. दिसलं कीं झालं.

माया—डोळे शाबूत तरी आहेत का त्याचे ?

गोरख—डोळ्याच्या खाचांत काचा शाबूत आहेत. मात्र त्यांतून तो पहातो दुसऱ्याच्या दृष्टीनं.

माया—हा दोघींनां एकदम कसा काय पाहणार ?

गोरख—ती मजा तर और आहे. तूं आहेस पांढरी. तुझ्याकडे पहातांच त्याचे डोळे होतील पांढरे आणि ताई आहे काळी. तिच्याकडे पाहतांच त्याच्या डोळ्यांपुढं येईल काळोखी.

माया—मिटतील मेल्याचे डोळे.

गोरख—वाः ! त्याचे डोळे उघडावेत म्हणून तर उघड्या डोळ्यांनीं आपण हें सारं नाटक करतों आहोंत. पण पहा तीच स्वारी इकडं येत आहे. पुढल्या नाटकाची नक्कल पाठ करायला तूं आंत हो कशी.

माया—आले बं–भोला ! टं–शंकर !! (जाते. दुसऱ्या बाजुनें धनानंद आणि गयाळ येतात. )

धनानंद—तुम्हीं इथं असा. मी मुलींना पाठवतो. हा गोरखही इथं असेल. पाहून झालं कीं मी येतों मागून. गोरख आंत जा. त्या दोघींनां घेऊन ये. आणि तूं बरोबर रहा–कान उपट एकेकीचा, जर गमजा करतील तर.

गोरख—ठीक आहे. ( स्व. ) तेंच हवं होतं. ( जातो )

धनानंद—गयाळ, तुम्हीं मुली पाहून घ्या. पण प्रथम करार—

गयाळ—त्या दिवशीं झाला ना ?

धनानंद—पण तो पाळला कुठं गेला ? अटीप्रमाणं पांजरापोळांतल्या त्या गायी कुठं मला लाभल्या ? शिवाय एक गोष्ट आपण माझ्यापासून लपविलीत. आपली पहिली बायको जिवंत आहे ?

गयाळ—होय. पण मी तिला टाकून दिली आहे.

धनानंद—कां ?

गयाळ—तिला मूल होईना म्हणून.

धनानंद—मग हा दोष कुणाचा ? तिचा ? त्याला ती बिचारी काय करणार ? मुलं न व्हायचं कारण वेगळंच आहे. अहो, लक्ष्मी-सरस्वतीचं, अर्थात संपत्ति-संततीचं आहे जन्माचं हाडवैर. कधीं एकत्र म्हणून नांदायच्या नाहींत. आणि तेंही ठीकच आहे. लक्ष्मी पडली विष्णूची बायको. ती स्वतःच मुळीं वांझ. लक्ष्मी वांझ नसती तर शेषशायी नारायणाला आपल्या नाभींतून पुत्र निर्माण करण्याचा द्राविडी प्राणायाम कां करावा लागता? असली वांझ लक्ष्मी घरांत भरून घर पोराबाळांनीं थोंडंच भरायचं आहे ? म्हणून म्हणतों, पोरं हवी असतील तर प्रथम ही लक्ष्मी घराबाहेर घ्या. कमींत कमी दोनशें गायींचा तुमचा माझा करार होता. तेव्हा आतां या दोनशें गायींचे प्रत्येकीं शंभर रुपये द्यायचा नवा करार करीत असाल तर हें सारं जुळेल.

गयाळ—म्हणजे ? वीस हजार रुपये ? इतके ?

धनानंद—कां बरं ? मोबदला दोन मुली घ्यायच्या आहेतना ? दोन ! नाहीं कबूल ? लग्न मोडलं.

गयाळ—छेः छेः छेः ! अहो कबूल म्हणून काय विचारतां ! अगदीं कबूल—हा घ्या चेक ( चेक देतो )

धनानंद—ठीक आहे. इथं असा. मी येतो आंतून. ( स्व. ) हो हें लग्न आज मोडतं तर सालमजकूर शिल्लक बाकी ठीक ! ( जातो ).

गयाळ—छेः, छाती होत नाहीं भेटायला या पोरींनां. पोरी कसल्या बायकाच त्या ! काय नशीब आहे पहा. सहज धोंडा टाकून पाहिला तों दोन पांखरं. पण हें फुलपाखरूं कोण ? दया कीं माया ( माया येते. ) आपण कोण ? नका-अशा लाजूं नका-बोला, आपलं नांव-दया कीं माया ?

माया—दया—

**गयाळ**—काय, आपण दया ? आपण दयाबाई ? अहाहा ! दयाबाई, आपल्या हृदयांत जर लवमात्र दया असेल तर या गयाळाला—

**माया**—इश्श ! हें काय बोलायचं बाई ! मी काय बाबांच्या बाहेर आहे ? पण माझी एक अट आहे गडे. आमच्या मायेची संमति आणा प्रथम–हो, नाहींतर पुढं व्हायची सवती सवतींत भांडणं.

**गयाळ**—हो, कबूल–कुठं आहे ती ?

**माया**—या पडवीनं चला म्हणजे डाव्या बाजूला एक खोली लागेल तिथं.

**गयाळ**—मग आपण हालूं नका इथन. तिचा होकार घेऊन अस्सा येतों परत. ( जातो. दुसऱ्या बाजूनें स्त्री वेषांत गोरख येतो ).

**गोरख**—कुठं गेला ? या बाजूला ? मग तूं हो आंत–अग, या बाजूनं नाहीं या बाजूनं. या बाजुला तो गेला आहे ना ? रंगभूमीवरून नटांनीं कुठल्या विंग मधून जायचं यायचं हें मुळींच चुकतां नये. चल हो आंत. तो पहा आलाच. ( माया जाते. त्या जागीं गोरख उभा रहातो. गयाळ येतो. )

**गयाळ**—( स्व. ) आंत कुणीच स्त्री नाहीं. आतां पुढं ? मायेचा होकार आहे असं सांगितल्या खेरीज ही दया कबूल व्हायची नाहीं. दावा लोणकडी झालं. ( प्रकाश ) दयाबाई–( चपापतो–स्वगत ) ही कोण ? दया ? मघां इथं उभी होती ती ? बायकांकडं समोरासमोर पहायची छाती होती नाहीं. म्हणून अशी आयत्या वेळीं फजिती होते. कोण बरं ही ?

**गोरख**—कां ? असं मौन कां ? बोलायचं नाहीं वाटतं ?

**गयाळ**—आपण–?

**गोरख**—कोण ते विसरलांत वाटतं ?

**गयाळ**—आपण–?

**गोरख**—दया–!

**गयाळ**—अरे हो ! दया ! दयाबाई !–दयाबाई—

**गोरख**—कां, भेटली का माया ?

**गयाळ**—हो, भेटली-भेटली म्हणजे ! खोटं कीं काय ?

**गोरख**—कोण म्हणतंय खोटं ! अगदीं खरं—पण कुठं !

**गयाळ**—या पडवीनं असं गेलं कीं डाव्या बाजुला एक खोली लागते तिथं—

**गोरख**—अस्सं, काय म्हणाली ?

**गयाळ**—कबूल झाली. आरंभीं थेडि आढेवेढे घेतलंन. पण पुढं दिली ठेवून एक—

**गोरख**—श्रीमुखांत वाटतं !

**गयाळ**—हं—हं—हं—! तेंच—तेंच तें ! तें कांहीं विचारूं नका. दिली तश्शी ठेवून तेव्हां कुठं कबूल झाली—

**गोरख**—खरंच कीं काय ?—अहो पण ती पहा. मायाच इकडं येत आहे.

**गयाळ**—( स्वगत ) अरेच्चा, हा घोटाळा झाला ! ( प्रकाश ) कुठं आहे म्हणालांत ? ( समोर पाहूं लागतो तों मागून गोरख निघून जातो. ) कुठं आहे ? कुठं ? ( मागें वळून पहातो. ) अरेच्चा, हें काय ? ही दयाही इथं नाहीं. पण हें एकपरी ठीक झालं. दोघी एकत्र येत्या तर फजिती होती. पण ही समोरून कोण येत आहे ? मायाच असावी, दुसरी कोण ? ( दुसऱ्या बाजुनें गोरख पुन्हां येतो. ) मायाबाई—

**गोरख**—अहो कोण कुठली ! मी माया नाहीं मी दया—

**गयाळ**—आपण दया कशा असाल ? दयाबाई या बाजूनं आतां इकडं गेली—

**गोरख**—मग आतां या इकडून गेलेली दया पुन्हां अशी या इकडून आलेली मी दया.

**गयाळ**—छेः खोटं बोलतां—

**गोरख**—काय ? मी खोटं बोलतें ? ( रडूं लागतो. ) अं—अं—अं !

**गयाळ**—अरे अरे अरे ! ही रडूं लागली. ( त्याचे डोळे पुसूं लागतो. )

**गोरख**—कांहीं नको गडे. मायेच्या आपण श्रीमुखांत दिलीत, असं आतांच नाहीं का आपण माझ्याजवळ म्हणालांत ? मग मी काय खोटं बोलतें ! अं अं अं !—

**गयाळ**—मग पाहूं नीट-पाहूं दे-अरेच्चा, ही दया-दयाबाई-

**गोरख**—नीट पहा-नाहीं तर पुन्हां चुकाल,

**गयाळ**—छेः कशाला पाहिजे ? आपणच दयाबाई-( माया येते. )

**माया**—अहो, ही दया तर मी कोण ?

**गयाळ**—आतां मात्र पुरी कंबख्तीची वेळ आली! कोण बरं ? माया-दया-दया-माया-

**गोरख**—अहो, असे दया-माया, दया-माया, काय बरळत आहांत ?

**गयाळ**—छेः छेः छेः, डोकं फिरून जायची वेळ आली ! हें घर भुताटकीनं भारलं आहेसं दिसतं ! या दोघी बहिणींचा काय ब्रह्मघोंटाळा आहे देव जाणें. आपण इथून आतां पळावंच झालं. ( जाऊं लागतो. )

**गोरख**—अहो चाललांत कुठं ? आतां मी आपल्याला सोडायची नाहीं गडे ! हो, पदरीं पडलें आणि पवित्र झालें. इकडची सेवा नको का करायला ? थांबा गडे-असं काय ?

नका टाकुनि जाऊं माझा डोळा पाण्यानं किं हो भरला । असे हांसत बोलत चालत जीव कीं हो दमला । तुमच्यासाठीं-तुमच्यासाठीं झुरत भारी-तंटा हो माझ्याशिं केला- ! ( मारतो )

**गयाळ**—अग हो, हो-पुरे पुरे-मेलों मेलों-काय पण हिचा हात ? भारीच मृदु- ! भारीच कोमल- ! ही कोण ? ( मायेकडे पाहून ) दया ! आणि ही ? ( गोरख स्त्रीवेष टाकतो ) अरेच्चा, अरे, हा गोरख ! अरे चोरा, मला बडवलंस काय असं ?-कंबर मोडली कीं हो माझी-अयाई ! थांब लेका, तुझा बाप येऊं दे. पण हा पहा आलाच.

**माया**—बाबा आले, आतां इथून यःपलाय-( जाते )

**गयाळ**—या, घलानंद पहा. तुमच्या पोरानं मला बडवलंन, बेदम ठोकलंन कीं हो !

**धनानंद**—अरे कारट्या, काय केलंस ?

**गोरख**—हे म्हणतात तेंच !-

धनानंद—अरे, कांहीं दया–माया–

गोरख—हो, दया आणि माया! त्यांच्यासाठींच तर याला असं निर्दयपणं ठोकावं लागलं!

धनानंद—मोठाच बहिणींचा कैवारी कीं नाहीं? पोरट्या, तुझा विचार तरी काय आहे? हें लग्न तूं मोडणार कीं काय?

गोरख—जमल्यास तसा प्रयत्न करून पहाणार आहें.

धनानंद—हा तुझा बाप जिवंत असे तों हें शक्य नाहीं बरं? तो मेल्यावर बोल पाहिजे तर–

गोरख—अस्सं? बरं आहे. (जाऊं लागतो.)

धनानंद—इकडं ये. चाललास कुठं?

गोरख—आपण जीवंत असेतों इथं राहून काय होणार?

धनानंद—म्हणजे? मला मारायची तयारी करायला चाललास वाटतं?

गोरख—माणसाच्या हातीं काय आहे? जोतिषाप्रमाणं जसं पत्रिकेंत असेल तसं.

धनानंद—पत्रिकेंत माझं मरण आहे आज उद्यां इतक्यांत.

गोरख—तसं असेल तर तें टाळणं माझ्याच काय पण माझ्या बापाच्याही हातीं नाहीं.

धनानंद—कारट्याच्या पोटांत बापाची दया माया किती आहे पहा.

गोरख—बापाच्या मनांत पोरींची–दयेमायेची जितकी, अगदीं तंतोतंत तितकीच!

धनानंद—हा कारटा एकदांचा मरेल तर सुटेन! (त्याला मारणार तों तो निसटून जातो. आणि ती चपराख गयाळाला लागते.)

गयाळ—अयाई! मोडला–पाठीचा कणा मोडला!

धनानंद—एकूण सालमजकूर शिल्लक बाकी–ठीक! (दोघे जातात.)

## प्रवेश ४ था.

( गो-मंदिराचा बहिर्भाग. देवळाच्या गाभाऱ्यासमोर बाहेरील पटांगणांत एक भला मोठा नंदी असा देखावा. पडद्यांत–'दीन-दीन' 'हरहर महादेव' पकडा–ठोका अशा आरोळ्या. कांहीं हिंदु–मुसलमान हातांत लाठ्या घेऊन पूर्वोक्त ओरडत येतात. मुसलमानांच्या बाजूनें रहीम, फाजल, धनानंद–शिवाय रोशन दयाळ, देभ इत्यादि येतात. )

**रहीम**—मारा–हाणा या काफीर हिंदूंना–

**हिंदु**—पकडा–ठोका या मुसलमानांना—

**रोशन**—( हिंदु मुसलमानांच्या मध्यें उभी राहून ) शांत व्हा. माझे हिंदु मुस्लीम भाई हो, शांत व्हा. धर्माच्या नांवाखालीं होणारा हा रक्तपात बंद करा. ही हिंसा थांबवा.

**रहीम**—प्राचीन मुसलमानांचं नांव सांगणाऱ्या माझ्या आजच्या मुसलमान भाईनों, काय ऐकतां हिचं ? चला, शिरा आंत,–आणि फोडा या मूर्ति–प्रथम घाला घणाचे घाव या दगडी नंदी बैलावर, करा या फत्तराच्या राशीचे तुकडे आणि शिरा आंत–( मिर्झासाहेब येतो. )

**मिर्झा**—सबूर ! रहीम, तुझ्या दृष्टीनं हा शिळेचा पुतळा असेल, ही फत्तरांची रास असेल, पण हिंदूंच्या दृष्टीनं ही देवता आहे. हिंदुधर्मभावनांवर घणाचे घाव घालून तुला काय मिळणार आहे ? धर्मभावना सोडून दिली तरी या नंदीच्या आसनाखालीं एक प्राचीन शिलालेख कोरलेला आहे. ऐतिहासिक दृष्टीनं प्राचीन शिल्पकलेचं व हिंदु संस्कृतीचं हें एक स्मारक आहे—

**रहीम**—खुशाल असूं दे. मला त्याची काय पर्वा आहे ? हिंदूंचा पुरा निःपात झालाच पाहिजे. हिंदुसंस्कृती व हिंदु धर्म दोन्ही जमीनदोस्त झालींच पाहिजेत.

**मिर्झा**—हिंदूंचा निःपात करून आज मुसलमानांना या देशांत कोणता स्वार्थ साधायचा आहे ? हिंदु संस्कृती अगर हिंदुधर्म हीं जमीनदोस्त करूं म्हटलं तरी तें आज शक्य तरी आहे का ? आणि शक्य आहे असं



गोरख—नका टाकुनि जाऊं— ( पान ७० )

[ Photos by M. N. Kirtikar, Bombay.
Blocks & Printing by ManoranjanPress, Bombay.]

मानलं, तरी त्यांत मुसलमानांचा फायदा आहे का? उलट मी म्हणतों कीं यांत त्यांचा तोटा आहे.

रहीम—अरे काय ऐकतां याचं? चला फोडा ही मूर्ति आणि शिरा आंत—

हिंदु—चला मारा—ठोका या मुसंड्यांना—( रामानंद येतो. )

राम—खबरदार! मुसंडे! कोण मुसंडे! एकाच मातृभूमीवर सख्या भावाप्रमाणं एकाच घरीं वाढलेले, हे तुमचे मुसलमान बंधु मुसंडे? बोला, प्रथम मला सांगा—हा दंगा कसा सुरू झाला?

रोशन—तें मी सांगतों. मशिदीजवळ एका वाण्यानं एक गाय एका मुसलमानाला विकली. ती गाय सोडवायचा हिंदूंनीं प्रयत्न केला—पण तो वांया गेला. उलट त्या मुसलमानानं तिथं हिंदूंच्या देखत ती गाय कापून काढिली आणि स्वतः तो मशिदींत नमाज पडण्यासाठीं निघून गेला. त्याच बाजूनं नंतर तासे वाजंत्री वाजवीत एक हिंदूंची मिरवणूक आली. त्या मशीदीजवळ वाद्यें न वाजवायचा आजवरचा रिवाज आहे पण गोहत्येनं चिडलेल्या हिंदूंनीं मशिदीसमोर वाद्यें वाजवलीं. आणि तिथून दंग्याला सुरवात झाली.

हिंदु—पण दंगा प्रथम सुरू व्हायला कारण हे मुसलमान! यांनींच प्रथम मशिदीसमोर आपल्या पवित्र गोमातेचा अपमान केला—

राम—आणि म्हणून मारहाण करीत आपण त्यांच्या मागं लागलांत! आपल्या इतकीच गोमातेला मी प्रेमानं अन आदरानं पवित्र मानतों. पण पवित्र गाई इतकंच हिंदुमुसलमानांच्या एकीचं कार्यहि मी पवित्र समजतों. गायीसाठीं सुद्धां मुसलमानबंधूंशीं वैर संपादन करण्याची अगर त्यांच्याशीं तंटा करण्याची माझी बिलकुल इच्छा नाहीं.

हिंदु—पण आमच्या डोळ्यांदेखत जर मुसलमान गायी कापूं लागले तर आम्हीं काय करावं?

राम—प्रेमानं त्यांची समजूत घालावी. अल्लाच्या नांवानं त्यांची करुणा भाकावी. आपण हें ध्यानांत घ्या कीं त्यांना विनंती करून, वेळीं सत्याग्रह करून गोरक्षणाच्या बाबतींत त्यांच्या वृत्ति आपण पालटूं शकूं, असा माझा दृढ विश्वास आहे. आपण या मार्गानं जाल तर हिंदुस्थानची सांप्रतची

स्थिति ध्यानांत घेऊन, मुसलमान बंधुही तसे तयार होतील, अशी माझी खात्री आहे!

**हिंदु**—आणि ते तसं न करतील तर ?

**राम**—तर काय ? त्यांना मारावं ? त्यांचे प्राण घ्यावे ? छे: बिलकूल नाहीं. आपला सनातन आर्यधर्म या गोष्टीच्या विरुद्ध आहे. गाय ही जशी आपली माता आहे. तसाच या हिंदभूवर जन्मभूमीसारखं प्रेम करून रहाणारा प्रत्येक हिंदी माणूस आपला बंधु आहे. मातेला वाचवणं हें आपलं कर्तव्य तर खरंच. पण भावाचा खून करणं हें पाप नाहीं का ? गायीला वाचवण्यासाठीं सुद्धां मुसलमानबंधुंचा वध करणं हा अधर्म नव्हे कां ? अशावेळीं भावाचा खून करण्याऐवजी आपण स्वतःच मरायला तयार झालं पाहिजे. माझ्या समोर जर कुणी गाय मारूंलागला आणि उघड्या डोळ्यांनीं माझ्यानं गोवध न बघवला, तर तात्काल मी माझा स्वतःचा प्राण देईन, पण माझ्या मुसलमान भाईचा प्राण मी कदापी ही घेणार नाहीं. म्हणून म्हणतों, आर्यांचं नांव सांगणाऱ्या माझ्या हिंदु-भाइंनों, हटा—प्रथम मागं हटा. आणि फेंकून द्या त्या हातांतील लाठ्या खालीं—

**हिंदु**—आम्हीं लाठ्या फेंकल्या तर हे मुसलमान आम्हांला मारतील, ठोकतील आमचं देवस्थान बुडवतील.

**राम**—या मुसलमानबंधुंना मी आपल्या वतीनें हात जोडीन, त्यांच्या पाया पडेन. अल्लाच्या नावानं त्यांच्याकडे आपल्या प्राणांची भीक मागेन. काय वाटेल तें करीन, पण आपल्या प्राणांला अगर प्राणांपेक्षांहि प्रिय असलेल्या या देवस्थानाला कोणत्याहि प्रकारची इजा पोंचू देणार नाहीं. पण इतकेंही करून ते आपल्यावर धांवून आलेच, तर मारतील-मार खा ! प्राण घेतील-प्राण द्या ! पण तुम्हीं मात्र हात वर उचलूं नका. सहनशीलतेच्या व अहिंसेच्या दिव्य तपोबलानं बाटलेलीं देवळं पवित्र होतील ! बाटलेले देव पावन होतील ! म्हणून म्हणतों फेंका. त्या हातांतल्या लाठ्या खालीं फेंका—फेंका म्हणतो ना ! ( हिंदु लाठ्या खालीं फेंकतात. )

**मिर्झा**—रहीम, हिंदूंनीं लाठ्या खालीं फेकल्या असतां मुसलमानांनीं

आतां माघार घेतली नाहीं, तर दंग्याचा सारा दोष मुसलमानांवर येईल. म्हणून म्हणतों मागं व्हा—

**रहीम**—बिलकुल नाहीं. ही मूर्ती आम्हीं फोडणार.

**राम**—या माझ्या देहाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या करा-आणि मग ही मूर्ती फोडायला पुढं या.

**रहीम**—चला, पहातां काय ? फोडा मस्तक आणि व्हा पुढं–( मुसलमान पुढं होणार तोंच नंदीच्या गोमुखांतून कांहीं व्हालंटीअर्स बाहेर येतात, व पुढें आडवे पडतात. त्यांत महात्मागांधींच्या वेषांत गोरख आणि मौलानाच्या वेषांत मोहन ) अरेच्चा हे कोण ?

**दयाळ**—विश्वामित्राच्या सैन्याशीं टक्कर द्यायसाठीं वसिष्ठाच्या कामधेनूच्या रोमारोमांतून जसे सहस्त्र म्लेंछ बाहेर आले. तसे रामानंदांचं व या मूर्तीचं रक्षण करण्यासाठीं अग्नीच्या असंख्य ठिणग्याप्रमाणं या जड पाषाणांतून बाहेर आलेले हे असंख्य जीव !

**गोरख**—आमचे जीव घ्या आणि पुढं व्हा.

**रहीम**—मग घ्या. प्रथम यांचे जीव घ्या. आणि पुढं व्हा.

**भिझी**—खबरदार ! या निरपराध बाळकांवर हात उचलाल तर ! रहीम काय केला आहे या निष्पाप पोरांनीं आपला गुन्हा !

**रहीम**—यांनीं नसेल, पण यांच्या काका मामांनीं तर केला आहे ना ? हिंदूंनीं मशिदीसमोर वाद्यें वाजविलीं, हा काय लहान सहान गुन्हा ? मग आम्हीं ही मूर्ती कां फोडूं नये ?

**राम**—नमाजाच्या वेळीं मशिदीजवळ हिंदूंनीं हट्टानं वाद्यें वाजविलीं असतील तर ती हिंदूंची चूक आहे. मुसलमानांनीं गोवध करूं नये असं आम्हीं ज्या तत्वासाठीं म्हणतों, त्या पवित्र तत्वासाठींच हिंदूंनींही नमाजाच्या वेळीं मशिदीसमोर वाद्यें वाजवणें गैरशिस्त आहे. मुसलमानांना नमाजाच्या वेळीं पूर्ण शांतता लागते. योगसाधनाच्या, पूजेच्या अगर ध्यानाच्या वेळीं पूर्ण शांतता अवश्य आहे, ही बाब हिंदूनांही अपरिचित नाहीं. मग हिंदूंनीं तरी हा रिवाज कां मोडावा !

हिंदू—मग मुसलमानांनीं तरी आधीं आमच्या दृष्टीसमोर हट्टानं गोवध कां करावा ?

राम—एकानं गाय मारली म्हणून दुसऱ्यानं वासरूं मारणं ठीक नाहीं.

मिर्झा – प्रत्येक धर्मांतील विचारी माणसानं परमधींयांच्या धर्मभावना पवित्र मानणं, हें त्यांचं कर्तव्य आहे ! नमाजाच्यावेळीं मशिदीसमोर वाद्यें वाजविणं ही जितकी हिंदूंची चूक आहे तितकीच हिंदंच्या देखत त्यांचा उपमर्द करावा म्हणून मुसलमानांनीं गोवध करणं ही मुसलमानांची चूक आहे! निःपक्षपात बुद्धीनं पहातां यांत दोन्हीं समाजाची सारखीच चूक आहे. लाठ्या खालीं फेंकून हिंदूंनीं पर्यायानं ही आपली चूक कबूल केली आहे. मग मुसलमानांनीं त्या मार्गानं जायला नको का ? या हिंदूंनीं लाठ्या खालीं कां फेंकल्या ? त्यांच्या अंगांत आपल्याशीं झुंजायला शक्ति नाहीं म्हणून ? छेः बिलकुल नाहीं. त्यांनीं या लाठ्या खालीं फेंकल्या हा दंगा थांबावा म्हणून. मग माझ्या प्यार मुसलमानभाईनों, आपल्या लाठ्या खालीं फेंकून मनाचा हा मोठेपणा आपण दाखविणार नाहीं का ? आपली आणि आपल्या धर्माची अब्रू राखणार नाहीं का ? मानसिक औदार्यांत साऱ्या मुस्लीम समाजाची जगांत होणारी नाचक्की आपण टाळणार नाहीं का ? भाई हो, महंमद पैगंबराची या वेळीं आठवण करा—कुराणाचं स्मरण करा—आणि अस्सल मुसलमानाला साजेलसं या वेळीं वर्तन करा ! अल्लाच्या नांवानं आपल्यापुढं पदर पसरून आपल्या साऱ्यांचा हा दास मिर्झासाहेब आपल्याजवळ एवढीच भीक मागत आहे, कीं इस्लामी धर्माच्या इज्जतीसाठी तरी आपण या वेळीं हातांतल्या लाठ्या खालीं फेंका आणि हा दंगा थांबवा—( मुसलमान लाठ्या खालीं फेंकतात ) शाबास—!

रहीम—अरे हें काय ? तगदीर ! घात केला यानं या वेळीं. ( रहीम स्तंभीत होतो. मोहन ( मौलाना ) व गोरख ( महात्मा ) एकमेकांना मिठी मारून ' हिंदूमुसलमानकी जय ' ओरडतात. )

---

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( रहीमचें घर. रहीम व फाजल. )

**रहीम**—फाजल, बेटा मी सांगतों तें ऐक. मुसलमानांची हुरमत घ्यावी म्हणून आज गावांत हिंदुलोक पोळ सोडायची जाहीर मिरवणुक काढणार आहेत. या मिरवणुकीला हरकत घेतां यावी म्हणून जमातीनं असा जाहीर फतवा काढला आहे कीं त्यावेळीं गावांत प्रत्येक मुसलमानानं मिळेल ती गाय कापावी, हातीं येईल ती गाय छाटावी.

**फाजल**—मग बाबा, आपला हुकुम व जमातीचा फतवा पाळायला मी केव्हांही तयार आहें.

**रहीम**—होय ना ? मग ठेव या कुराणावर हात ( फाजल तसें करतो ) आणि खा कसम—

**फाजल**—आपल्या पायाना साक्ष ठेवून, आणि इलाहच्या या पवित्र धर्मग्रंथाची कसम खाऊन सांगतों कीं जमातीचा हा फतवा मी बिन-हरकत पाळीन.

**रहीम**—शाबास ! बेटा, जा. ( फाजल जातो ) हिंदूंची हिकमत ओळखून त्यांची हड्डी नरम करायला मी नामर्द का आहें ? पण हिंमत तरी कुणाच्या हिमायतीवर धरायची ? जिवाचा हिय्या करून यांच्याशीं टक्कर द्यायला पुढं व्हावं तों माझे च पाय मागं खेचायला, जिथं घरची घरभेदी माणसं तयार, तिथं मी तरी एकटा काय करणार ? घरांत बहीण फितूर ! गावांत मिर्झासाहेबासारखे कट्टे मुसलमानही फितुर ! बेहत्तर आहे रोशन फितुर झाली तर, बेहत्तर आहे मिर्झासाहेब फितुर झाला तर, फार काय पण बेहत्तर आहे सारा मुसलमान समाज फितुर झाला तर, पण या देहांत धुगधुगी आहे तोंवर, या कुडींत प्राण आहे तोंवर, दंड ठोकून या हिंदूंशीं दोन हात करायला मी एकटा समर्थ आहें ! युद्धाच्या मैदा-

नावर या धर्मयुद्धांत जरी मी एकटा एकच उरलों तरी फिकीर नाहीं. पण या वेळीं माघार न घेतां, साऱ्या हिंदुसमाजाला व हिंदुधर्माला एक ठोकर देऊन पायाच्या टाचेखालीं चिरडून टाकायला मी देहाची कमजोरी अगर दिलाची लाचारी मात्र बिलकुल दिसूं देणार नाहीं! बस्स, ह्याच मातबर मामला दिलांत कायम! खुदाची कसम यांत कसूर झाली तर. ( फाज़ल येतो )

फाजल—बाहेर मिर्झासाहेब आले आहेत.

रहीम—जा, त्यांना आंत धाडून दे. ( फाजल जातो. ) हा या वेळीं इकडं कुठं? कोणत्या का हेतूनं येईना. येतोच आहे तर सामदामदंडभेदाचा उपयोग करून यावेळीं याला आपल्या पक्षाला वळवायचा प्रयत्न कां करून पाहूं नये? ( मिर्झासाहेब येतो. ) आदाब जनाब मिर्झासाब!

मिर्झा—आदाब! आदाब रहीम! जमातीच्या फतव्यासंबंधीं, खुल्या दिलानं आपल्याशीं चार शब्द बोलावे, म्हणून मी मुद्दाम आलों आहे. या वेळीं हिंदु नाखुष होतील, असला हा फतवा काढण्यांत, जमातीनं मोठी चुक केली आहे, असं नाहीं आपल्याला वाटत?

रहीम—बिलकुल नाहीं. मिर्झासाहेब, मला आपल्याला एक सवाल टाकायचा आहे. आपला धर्म कोण?

मिर्झा—इस्लाम!—

रहीम—कशावरून?

मिर्झा—कशावरून? माझ्या कृतीवरून! माझ्या आचरणावरून! इस्लामी धर्मावरील व कुराण ई–शरीफ वरील माझ्या अढळ निष्ठेवरून. मुस्लीम धर्मा इतका पवित्र धर्म, कुराणा इतका पवित्र ग्रंथ, आणि महंमद पैगंबराइतका पुण्य पुरुष जगांत आजवर दुसरा कुणी झाला नाहीं, व पुढंही कुणी होणार नाहीं, असंच मी मानतों. मी जन्मानं मुसलमान असून, ‘ ईश्वर एक आहे आणि त्याचा प्रेषित महंमद आहे ’ या तत्वावर माझा पूर्ण विश्वास आहे. कुराण-ई-शरीफचा नित्य पाठ म्हटल्या खेरीज मी झोंपत नाहीं. हातपाय धुवून जमिनीवर डोकं टेकून दररोज पांच वेळ नमाज पडल्या खेरीज मी रहात नाहीं.

रहीम—मग आपल्या बोलण्यांत आणि वागण्यांत विरोध दिसतो तो कां ?

मिर्झा—विरोध दिसतो ? कुणाला ?

रहीम—इतर मुसलमानांना.

मिर्झा—कुराण अगर कुराणांतील धर्म तत्वें यांच्याशीं विरोधी वर्तन करणारे जे कुणी मुसलमान असतील त्यांना ! न्यायानं व उदारपणानं वागणं, कपट न करणं, सदा सत्य भाषण करणं, मद्यपाननिषेध पाळणं, आणि सर्व मानव जातीशीं—अर्थात परधर्मीयाशीं सुद्धां, समानबंधुत्वानं वागणं, इत्यादि ज्या गोष्टबिद्दल कुराणांत सक्त पैगाम आहे, तो पैगाम मी प्रत्यक्ष आचरणांत आणीत असल्याचं, ज्यांना रुचत नसेल त्या मुसलमानांना ! रहीम, आतां मी आपल्याला विचारतों, आपला देश कोण ?

रहीम—माझा देश हिंदुस्थान.

मिर्झा—कशावरून ?

रहीम—कारण या देशांत आम्ही जन्मलों आणि याच देशावर आमचं प्रेम आहे म्हणून.

मिर्झा—या देशावर आपलं प्रेम आहे ? छेः, मुळींच नाहीं.

रहीम—कोण म्हणतो असं ?

मिर्झा—मी म्हणतों असं. हा मिर्झासाहेब असं म्हणतो. स्वदेशावर जर तुमचं प्रेम असतं, तर हल्लीं करीत अहांत त्या गोष्टी आपण कधींच केल्या नसत्या. हिंदुमुसलमानांत तेढ उत्पन्न होईल, व राष्ट्रीय दृष्ट्या अत्यंत आवश्यक असलेल्या एकीला विघातक होईल, असली धार्मिक भानगड याचवेळीं आपण खास उत्पन्न केली नसतांत. स्वधर्मावर प्रेमकरणं हें जसं आपलं कर्तव्य आहे तसंच स्वधर्म संभाळूनही स्वदेशावर प्रेम करणं, हेंही आज तितकंच महत्वाचं आपलं कर्तव्य आहे, हें हिंदुस्थानांतील प्रत्येक मुसलमानानं आज अवश्य ध्यानांत ठेवलं पाहिजे. स्वधर्म बुडवा, अगर सारे हिंदु व्हा, असं तुम्हांला कोण सांगतो ? पण स्वधर्म राखूनही स्वदेशाचं कल्याण होत असेल, तर त्या कामीं माघार घेणं, यासारखा दुसरा देशद्रोह नाहीं ! धर्माची बाब असेल तिथं हिंदूनं हिंदु रहावं, मुसलमानानं मुसल-

मान रहावं, अगर खिस्त्यानं खिस्ती रहावं. पण जिथं राष्ट्रहिताचा प्रश्न असेल, तिथं हिंदु, मुसलमान, पारशी, खिस्ती, यहुदी, सर्वधर्मीय हिंदवासी यांनीं एक होऊन जुटीनं वागणं, यांतच साऱ्यांचं कल्याण नाहीं, कां ?

रहीम—या असल्या एकीच्या मुलथापाला भुलून जमातीला काय आपला धर्म बुडवायचा आहे?

मिर्झा—जमातीनं हा फतवा काढला नाहीं तर आज काय होईल ?

रहीम—हिंदुलोक मुसलमानांच्या नाकावर पाय टिचून तोऱ्यानं ही मिरवणुक गांवभर फिरवतील.

मिर्झा—बरं फिरवलीच तर मुसलमानांचं त्यांत काय बिघडेल ? मुस्लीमधर्म कसा तरेल ? हिंदूंना मिरवणुक काढायची असेल तर हा फतवा सुटूनही ते थांबतील का ?

रहीम—न थांबतील तर जबरदस्तीनं आम्हीं त्यांना भाग पाडूं.

मिर्झा—म्हणजे एकमेकांचीं डोकीं फोडूं असंच ना ? मग त्यानं आपला धर्म कसा तरेल ? मुसलमान ताबुदाची, चांदाची अगर डोलाची मिरवणुक गांवभर फिरवीत नाहींत ? मग हिंदूंना ही मिरवणुक काढूं नका, असं म्हणायचा मुस्लीम जमातीला काय अधिकार आहे ? हरकत घेऊन तेढ उत्पन्न करण्यांत कोणता फायदा आहे ?

रहीम—फायदा असो वा नसो, तूं मुसलमान आहेस, आणि जमातीचा हुकूम पाळणं तुझं कर्तव्य आहे.

मिर्झा—पाळणं, न पाळणं वा तटस्थ रहाणं, हा माझ्या सदसद्विवेक बुद्धीचा प्रश्न आहे.

रहीम—यांत जमातीशीं बेइमानी आहे.

मिर्झा—असेल. पण माझ्या सदसद्विवेकबुद्धीला पटणाऱ्या खऱ्या इस्लामी धर्माशीं बेइमानी करायला मी मुळींच तयार नाहीं.

रहीम—ही आपली भूल आहे. एकाद्या व्याख्यानाच्या ठिकाणीं टाळ्या घेण्यासाठीं या आपल्या वल्गना ठीक आहेत. पण जिथं रोटीबेटी-चाच बाब निघते तिथं आपल्यासारख्या बढाईखोर वावदुकालाही जमा-तीसमोरच नाक घाशीत यावं लागतं. पण तें जाऊं द्या. मिर्झासाहेब, कसंही

झालं तरी आपण मुसलमान अहांत. आणि म्हणूनच आपले सारे दोष विसरून जायला मी तयार आहे. रोशनवर आपलं प्रेम आहे. तिची आपण मागणीही केली आहे. या आपल्या मागणीचा स्वीकार करून, गोडीगुलाबीनं आणि तसं न जुळल्यास जबरदस्तीनंही मी ही शादी घडवून आणायचं ठरवलं आहे. मात्र आपण एक गोष्ट मंजुर केली पाहिजे. उद्यांच्या मिरवणुकीच्या प्रसंगीं आपण आपला हेका सोडून आपण आमच्या पक्षाला मिळालं पाहिजे. बोला, आहे कबूल ?

**मिर्झा**—छेः, बिलकुल नाहीं. रहीम, कुराण–इ–शरीफनं निषिद्ध मानलेली ही लाचलुचपत मला देऊं करून, आपण हें धर्माचंच काम करीत असाल नाहीं ? नाण्याच्या अगर इष्काच्या नादानं मतांतर करून अगर पक्षाभिमान सोडून मी आपल्या जाळ्यांत अडकेन, असा जर आपला भ्रम असेल तर तो साफ चुकीचा आहे. रहीमसाहेब, एका स्त्रीच्या लाभासाठीं मी आपल्या सदसद्विवेक बुद्धीचा जाहीर लिलाव पुकारून असा राजरोस विकरा करूं ? रोशनवर माझं प्रेम आहे, पण त्या प्रेमासाठीं मी स्वतःची छीः थूः करून घऊं ? घराण्याचं नांव बुडवूं ? धर्माला काळोखी फासूं ? रोशनवर माझं प्रेम नाहीं असं कोण म्हणतो ? रोशन तर माझ्या दिलाची प्यार आहे, आणि तिच्याशीं शादी लावावी, ही तर माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. पण रहीमसाहेब, तसाच अटीचा प्रश्न आला तर आपल्याला मी असं ठाम बजावून ठेवतों कीं, हा मिर्झासाहेब मोठ्या आनंदानं तें प्रेमही झुगारील, अगर ती शादीही लाथाडील, पण चंचल बुद्धीनं आपल्या चारित्र्यापासून एक रेसभरही ढळणार नाहीं.

**रहीम**—मिर्झासाहेब, ही मगरुरी कांहीं फार दिवस टिकायची नाहीं बरं. ध्यानांत असूं द्या. (जातो)

**मिर्झा**—काय स्वभाव हा ? किती कठोर ? आणि रोशन किती प्रेमळ ? माझ्याबरोबर रोशनची हा बळजबरीनं शादी लावणार ? वेडा नाहीं तर काय ? प्रेमांत जबरी काय कामांची ? जबरी करायची नाहीं म्हणून तर आज कितीतरी दिवस तिच्या प्रेमाची आराधना करून शेवटीं

निराशही झालों ना? खरोखरच आशेला जागा नाहीं का? पण फिरून एकवार प्रयत्न करून पहायला काय हरकत आहे? पण ही भेटेल कुठं? हा पहा फाजल. फाजल—बेटा, आंत तुझी रोशनमा असेल नाहीं? तिला इकडे धाडून दे. आज हा शेवटचाच प्रयत्न. प्रेमासाठीं रोज जगणं आणि रोज मरणं यांत काय प्रेम आहे? रोशन आज कबूल झाली तर ठीकच. नाहीं तर आपला निश्चय कायमच आहे.

( रोशन येते. )

**रोशन**—मिर्झासाहेब, सकाळपासून माझ्या डोक्यांत एक नॉटी प्रॉब्लेम आहे. डोकं दुखूं लागलं पण उत्तर कांहीं आलं नाहीं.

**मिर्झा**—असा कोणता प्रॉब्लेम बुवा? जॉमेट्रीचा का?

**रोशन**—छेः, हा एक बुद्धिबळाचा डाव आहे. आपण सोडवतां का?

**मिर्झा**—ऐकूं द्या तर खरा. पाहूं या सुटतो काय तो.

**रोशन**—डाव समजणं कांहीं कठीण नाहीं. उत्तर कठीण आहे. पोळाच्या मिरवणुकीला रहीमकडून हरकत व्हायची असल्यामुळं रामानंद मोठ्या फिकीरींत असतील. त्यांना तिथून कसं सोडवायचं हाच तो प्रॉब्लेम. अजून सुटत नाहीं. तुम्हाला सुचते का कांहीं युक्ति? मिर्झासाहेब, बोला सुचते का? काय नाहीं?—अय्या, सुचली—आतां कुठं युक्ति सुचली. रहीमचं अस्सं नाक दाबलं कीं तो अस्सं तोंड उघडलि आणि रामानंद आपोआप अस्से सुटतील. काम फत्ते! बोलतां बोलतां कशी पण युक्ति सुचली?

**मिर्झा**—रोशनबी, आपल्याला सारं कांहीं सुचतं. पण माझ्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं सुचत नाहीं.

**रोशन**—कोणता प्रश्न?

**मिर्झा**—शादीचा—

**रोशन**—शादीचा प्रश्न मी आज अजिबात विसरलें आहें आणि आपण तो विसरावा अशी माझी इच्छा आहे.

**मिर्झा**—रोशन, माझ्या प्रेमाचा अव्हेर करून—

रोशन—प्रेम!—मिर्झासाहेब, आपण बोलतां त्या अर्थानं प्रेम हा शब्दच मुळीं माझ्या कोशांतून अजिबात लुप्त झाला आहे.

( कामोद—त्रिताल )

रत मन ना हें। प्रेमीं लौकिक झालें ॥ धृ० ॥ मम बोल खोल फोल न बोल; कदा नच झालें ॥ १ ॥

माझ्या हृदयांतील वैषयिक प्रेमाचा झरा आटून तें माझं हृदय निर्विकल्प प्रेमाच्या पुण्यपावन पवित्र जलानं तुडुंब भरून गेलं आहे. शादीचा विचार मनांतून केंव्हांच हद्दपार होऊन त्या जागीं भूतदयेनं आणि परोपकारानं ठाणं दिलं आहे. मी असं ठरवलं आहे कीं आतां जगायचंच तर तें वैवाहिक सुखलालसेसाठीं नाहीं तर तें पैगंबराचा भूतदयेचा पैगाम पुरा पाडण्यासाठीं! मिर्झासाहेब, आपल्याकडून मला आतां फक्त एकच मनाची शंका फेडून घ्यायची आहे. मी आपल्या मागणीला असा नकार देतें म्हणून आपण माझ्यावर रागावणार तर नाहीं ना? प्रेमांत निराश झाल्यानं डोक्यांत राख घालून आणि हिंदुमुसलमानांच्या एकीचं कार्य सोडून देऊन आपण फतव्याच्या पक्षाला तर सामिल होणार नाहीं ना?

मिर्झा—रोशनबी, हिंदमुसलमानांच्या एकीचं कार्य सोडून फतव्याचा पक्ष धरावा म्हणून प्रत्यक्ष आपण जरी माझी मागणी मान्य केलीत, तरीसुद्धां त्या गोष्टीला मी केंव्हांच कबूल होणार नाहीं. यापूर्वीच आपला होकार मिळता तर कदाचित् आपली शादी होती. पण आतां ज्याअर्थी परोपकारार्थ आपण प्रेमात संन्यास घेऊन, आत्मार्पणाचा मार्ग मला मोकळा करून दिला आहे, त्या अर्थी मी सुद्धां प्रेमाची फकिरी घेऊन शेष आयुष्य माझ्या आवडत्या विषयाला वाहून घ्यायचं निश्चित केलं आहे. रोशनबी, या हतदैवी हिंदुस्थानांत असं एकही खेडं आतां शिल्लक राहू द्यायची इच्छा नाहीं कीं त्या ठिकाणीं हिंदु मुसलमानांतील दुही मोडून एकीचं कार्य सफल झालं नाहीं. या पुरुषार्थासाठीं आजन्म झटेन तरच मी मिर्झासाहेब.

( जातो. )

**रोशन**—खरंच, पुरुषार्थ साधून पुरुष हें नांव सार्थ करणारे आजवर जगांत मला दोनच पुरुष आढळले. हिंदु समाजांत रामानंद आणि मुसलमान समाजांत हे मिर्झासाहेब ! मिर्झासाहेबासारखे थोर पुरुष मुसलमानांत आहेत म्हणूनच मुसलमान समाजाची अब्रु आहे ! परवरदिगार, मिर्झा साहेबांच्या पवित्र कार्यांत त्याना यश दे ! आणि धर्मविद्वेषामुळं उत्पन्न होणारे तंटेबखेडे मोडून जगांत समतेचं साम्राज्य चिरकाल टिकेल असं कर.

(देसकार-त्रिताल.)

अर्जी जगावरि प्रसरिता होवो समता अल्ला ॥ ध्रु० ॥ भजा वंद्य कृष्णा करिमा वा कारण मुळि भेदा गणिता नच अल्ला ॥ १ ॥

---

## प्रवेश दुसरा.

( धनानंदाचें घर. गोरख आणि माया येतात. )

**गोरख**—माई, कशी मजा केली ? कसं केलं गोरक्षण ? गद्धा बाशिंग लावून बसला होता.

**माया**—पण तो बंगला तुम्हाला कसा मिळाला ?

**गोरख**—मिळाला महा प्रयासानं. तुम्ही घरून नाहींशा झालांत तेव्हांच मला संशय आला. पण पत्ता कांहीं लागेना. शेवटीं कृष्णंभटजीची मूठ दाबली. तेव्हां कुठं इंगित बाहेर फुटलं. त्यांच्याकडून कळलं, गावाबाहेरील रहीमच्या बंगल्यांत लग्न उरकून घ्यायसाठीं बाबा तुम्हां दोघींना घेऊन गेले आहेत. मग काय ? दयाळदादाना भेटलों, देभना गाठलं, आणि फिरवला मोर्चा बंगल्यावर.

**माया**—आम्हाला तरी बाबानी तिथं किती फसगतीनं नेलं. शहराबाहेर जत्रा भरते. त्या जत्रेला चला म्हणून सांगन गाडींतून आम्हांला त्या बंगल्यांत नेलं. तिथं तो मेला अजागळ गयाळ. आम्हाला त्याच्या स्वाधीन करून बाबा निघून गेले अन पहातें तो लग्नाची सारी तयारी. कृष्णं भटजी

आले, वाजंत्री आली, ताशा वाजूं लागला. जणुकाय मेल्याच्या स्मशान यात्रेची तयारी. पळायचा विचार करून पहातें तो चोहींकडे कड्या कुलपें. दिंडी दरवाजावर पठाणांचा पहारा.

**गोरख**—त्याच पठाणांनीं आम्हालाही अडवलं. प्रसग तर अगदीं हातघाईवर आला. ते कांहीं आंत जाऊं देत ना. शेवटीं मला सुचली एक युक्ति. तो बंगला रहीमचा. पूर्वी त्यांत रोशनबी रहात असत. हें आठवलं. गेलों आणि रोशनबीनाच बरोबर घेऊन आलों. बंगल्याच्या पिछाडीच्या बाजूस आमराईतून एक रस्ता आहे. त्या रस्त्यानं त्यांनीं आम्हांला आंत नेलं. झालं, आंत प्रवेश झाल्यावर मग काय विचारतां ? गेलों आणि त्यांच्या बाशिंगालाच हात घातला. पुढचा सारा देखावा तुम्ही पाहिलांतच. वाः ! कशी मजा केली ?

**माया**—खरंच मजा केलीस. पण गोरख, ताई कुठं गेली ? मघापासून शोधतें आहे. सांपडत नाहीं.

**गोरख**—चला शोधूं. जावे कुठं ? तू जा या बाजूनं आणि मी जातों या ( जातात. दयाळ येतो. )

**दयाळ**—झालं–काम फत्ते. शेवटीं त्या गयाळची पुरी फजिती झाली. पण दये, तुझ्या अंगच्या गुणांनीं, माझ्या सौंदर्याच्या कल्पना पार बदलून तूं मात्र मला आज पुरतं फजीत केलंस. सौंदर्य कीं सद्गुण ? या प्रश्नाचं उत्तर निकट सांनिध्यामुळं तुझ्या अंगीं झळकणाऱ्या तुझ्या गुणांनींच दिलं. खरंच, प्रेम म्हणजे निव्वळ भावनांचा खेळ. हें आजवर नुसतं नाटक कादंबऱ्यांत वाचीत होतों. पण त्याचा प्रत्यक्ष अनुभव आज पटला. दयेकडे पाहून आजवर मी नाक मुरडीत असे, डोळे मिटीत असे. पण दया तीच आणि तोच मी आज. पण तीच मला आज नाकाडोळ्यांनीं किती सुंदर दिसते आहे ! लग्न दयेशींच करायचं असं काल ज्यावेळीं मनाशीं ठरलं, त्याच वेळीं गोरखबरोबर तिला तसं कळवलंही. आनंदानं बेहोष होऊन दया येईल–पण ही कोण ? दयाच. आणि हातांत काय ! कागद. ( हातांतील कागदाकडे पहात पहात दया येते ) काय वाचतेस दये !—

दया—अगबाई ! कोण आपण ? ( कागद लपवते. )

दयाळ—असा लपवतेस का तो कागद ? पाहूं दे ना काय आहे एवढं त्यांत तें.

दया—कांहीं नाहीं.

दयाळ—नाहीं कसं ! त्यांत काय आहे तें मला माहिती आहे.

दया—होय ना ! मग सांगा ना काय आहे त्यांत तें.

दयाळ—सांगू ?—त्यांत प्रेमाच्या जादूनं भारलेला एक मंत्र आहे.

दया—पण हा अर्वाचीन प्रेम-मंत्र नाहीं. प्राचीन आहे.

दयाळ—म्हणजे ? हें काय नवीनच तंत्र ?

दया—तें असं आहे. हा कागद आहे माझ्या ओळखीच्या एका प्रणयिणीचा. ती आहे बिचारी रंगारुपानं काळी सावळी. पण आधुनिक प्रणयी तरुण कसले रसिक ! त्यांना काय काळ्या कुरुप मुली आवडायच्या !

दयाळ—( स्वगत ) ही आमचीच संभावना चालली आहे.

दया—त्यांच्या प्रणयपत्रिका खेळायच्या सौंदर्याचा ताम्रपट मिळालेल्या ताम्रमुखी गोर मुली पाहून. तेव्हां तिनं बिचारीनं प्रेमपत्रिका लिहायचा अर्वाचीन घोपट मार्ग सोडला आणि एका भटाला गाठून अभीष्ट वर प्राप्तीचा हा गोपद्माचा एक प्राचीन मंत्र घेतला. गोपद्माचं व्रत करायचं असतं लग्नानंतर. पण आमच्या भटजींनीं प्रेमाच्या जादूनं भारून हा एक नवीनच मंत्र तयार केला आहे. एका कागदावर गायींची चार पावलं काढून त्यांची एक आठवडाभर पूजा करायची म्हणजे अभिष्ट वराची प्राप्ति होईल. असं आहे हें व्रत. तेंच हें गोपद्म. ही गायींचीं पावलं—

दयाळ—कुठं आहेत ! मला तर या कागदावर कांहींच दिसत नाहीं.

दया—प्रणयी जनाच्या दृष्टीनं पहावं लागतं.

दयाळ—कसंही पाहिलं तरी काय ? हा कागद कोरा सफेद दिसतो.

दया—मग तेंही बरोबर आहे. हा कागद सफेत आणि गाईही सफेद आहे.

दयाळ—म्हणजे !

दया—त्यांत काव्य आहे. आपल्या प्रियकराला काळा रंग आवडत नाहीं म्हणून या माझ्या मैत्रिणीनं काळ्या रंगाच्या साऱ्या वस्तु वर्ज केल्या आहेत. नेसायची काळी चंद्रकळा, डोळ्यांत भरायचं काळं काजळ, लिहायची काळी शाई—

दयाळ—पण चेहऱ्याचा काळा रंग ?

दया—व्हाईट जपान फासून नाहींतर पावडर मारून घालवायचा.

दयाळ—किती दिवस ?

दया—आपल्या प्रियकराच्या डोक्यांतले काळेपणाचे विचार काळं करी तों—

दयाळ—मग तुझी ही काळी मैत्रीण ओळखली बरं तिचा प्रियकरही माझ्या ओळखीचा आहे. त्याचा तिला एक निरोप आहे. कळविशील तिला ? तिला म्हणावं गोपद्माचं तुझं व्रत फळास आलं आहे. तुझी मनकामना लवकरच तृप्त व्हायचा योग आहे.

दया—खरं का ? मग मी हें जाऊन तिला कळवतें कशी !

दयाळ—कुठं चाललीस ?

दया—त्या माझ्या जिवाच्या मैत्रिणीकडे.

दयाळ—थांब. ही तुझी मैत्रीण कोण हें सांगितल्याशिवाय मी तुला इथून जाऊं देणार नाहीं.

दया—मला नाहीं माहीत कोण ती.

दयाळ—मग मी सांगतों—

दया—कोण ?

दयाळ—तूं-! आतां कां लाजतेस ? तुम्ही दोघी काय दोन आहांत ? तुम्हां दोघींचा जीव एकच ना ? बोल—

दया—मी काय बोलूं ?

दयाळ—नकोच बोलूंस. मनचे विचार बोलायचं ओठांनीं जरी नाकारलं तरी चेहरा कांहीं मनोभूमीवर तरंगणारे विकार दडवूं शकत नाहीं. दये, यावेळीं हा तुझा मुखचंद्र—

दया—हो–पण काळेपणाचा त्याच्यावरील तो डाग—

दयाळ—तुझ्या सद्गुणाच्या शुभ्रतेला खऱ्या चंद्राच्या डागाप्रमाणं अधिकच शोभा देत आहे.

( भीमपलास—त्रिताल )

रमणिच्या आननिं शोभा दे नव तिलक जेवि सुरुपा नारी ॥ धृ० ॥ प्रकृतिसखीमुख चंद्र; अंक तो तिलकचि गमत मनास ॥ १ ॥

दये, गोरखनं माझा निरोप तुला नाहीं कळविला ?

दया—होय–आणि त्यावेळीं मला किती आनंद झाला आहे म्हणून सांगू ?

( सिंदुरा—केरवा )

मंगल दिन हा आला समयाला मोद मना बहु झाला ॥ धृ० ॥ ब्रह्म ब्रह्म युगें गात जपाला । लाभत तें जैं काला भजकाला । साधक तैं प्रित झाला ॥ १ ॥ धन्य धन्य प्रिय कांत मिळाला । प्रेम-तपा जय आला सुकृताला । पावत मी जगिं बाला ॥ २ ॥

दयाळ—अस्सं, मग माझ्याच तोंडून हें वदवायचं होतं. खरं ना ? आतां तरी झाली खात्री ? बोल ( तिचे दोन्ही हात धरून ) झाली ? झाली ?— ( माया येते. )

माया—अगबाई, हें काय ?–गोरख, गोरख,—( गोरख येतो ) अरे हें पाहिलंस ? हीं इथं ताई आणि दादा—

गोरख—जशी काल तूं आणि देभ—

माया—चल, चावट कुठला.

गोरख—चावट बिवट म्हणून शिवी देशील तर बघ. गयाळाच्या पांजरापोळांत नेऊन सोडीन. बाबांच्या साऱ्या जिंदगीबरोबर या दोन गायींची मालकीही त्यांच्या पश्चात् माझ्याकडे आली आहे.

माया—म्हणजे काय ?

गोरख—अग म्हणजे काय ? बाबा वारले.

दया—गोरख, कांहीं जीभेला हाडबीड आहे का ? असं अभद्र बोलणं बरं कां ?



गोरख—मजाच मजा !— ( पान ९३ )

Blocks & Printing by Manoranjan Press, Bombay.] [ Photos by M. N Kirtikar, Bombay.

माया—हो, ही आली मोठी बाबांचा कैवार घेणारी !

गोरख—ताई, यांत मलाही मोठा आनंद आहे, असं का तुला वाटतं? जीवावर येऊनच हे शब्द मी बोलतों. पण करणार काय ? दुसरा उपायच शिल्लक राहिला नाहीं.

माया—नाहींतर काय ? बाबांच्या चिक्कू स्वभावाचा किती म्हणून त्रास सोसायचा ? गोष्टी कोणत्या थराला चालल्या कांहीं मेली सीमा ?

गोरख—या त्रासांतून कायमचं सुटायला दादानीं एक नामी युक्ति काढली आहे.

दया.—कसली?

दयाळ—मामांच्या मरणाचं हें नाटकच पुढं चालू ठेवायची ! मामांचा आहे ज्योतिषावर भयंकर विश्वास. त्यांच्या हातीं हल्लीं जी जन्म पत्रिका आहे ती आहे खोटी. आह्मीच ती एका खेट्यामार्फत त्यांच्या हातीं जाईल असं केलं आहे. त्या पत्रिकेप्रमाणं आजच्या तिथीस, या घटकेस मामा साप चाऊन मरणार, असं भविष्य आहे.

दया—मग आतां बाबा आहेत कुठं ?

गोरख—त्यानीं एक मोठं पिंप आणलं आहे. आणि साप चावूं नये म्हणून घटका टळेपर्यंत पिंपांत पाणी भरून, डोईभर पाण्यांत बसले आहेत.

दया—बाई बाई ! काय तरी हें !

माया—अग ही भीती मरणाची नाहीं तर पश्चात डबोलं कोण राखील याची.

दयाळ—मग पश्चात डबोलं कोण कसं राखील याचंच चित्र दाखवायचं आहे त्यांना.

गोरख—पण तुमची साऱ्यांची मदत पाहिजे. ताई, तूं ! तूं नाहींच बोलायचीस मला माहीत आहे. बरं तुंग ?

माया—या नाटकांत देशील ती भूमिका घ्यायला मीं तयार आहे. अरे आम्हीं कवडीचुंबक बापाच्या मुली. कधींकाळीं सिनेमा नाटक दिसेल तर शपथ. मग अशीं घरच्याघरीं फुकटची करमणूक करून घ्यायला काय हरकत आहे ?

दयाळ—आंत सारी कांहीं तयारी आहे. ही पहा. या नाटकांतली पात्रेंही हळुहळु गोळा होऊं लागली. हे देभ आले ( देभ येतो ) हीं मामांचीं सावकारी कुळें. ( दोन कुळें येतात. ) आतां नाटकाला आरंभ.

गोरख—दादा, घटका टळून गेल्यामुळं पिंपाबाहेर येऊन बाबाही रंगभूमीवर प्रवेश करीत आहेत. आम्ही आंत होतों. ठरीव वेळीं प्रवेश करूं. चला ग ( गोरख, दया, माया, जातात. )

दयाळ—हं, घ्या उपरणी आणि गुंडाळा डोक्याला. ( तसें करतात. ) अस्सं—आतां नकलेला आरंभ. ( धनानंद येतो. )

धनानंद—( स्वगत ) ठीक ! घटका टळून गेली. आतां डर नाहीं. जन्मपत्रिका खोटी ठरली. खूप बचलों. बाकी आज मरतों तर सालमजकूर शिल्लक बाकी ठीक.

१ कुळ—( हेल काढून ) अरेरे, मेला गेला बिचारा.

२ कुळ—( सुस्कारा टाकून ) एवंच, मोठा वाईट प्रसंग आला.

धनानंद—( स्वगत ) अरेच्चा, हें काय नाटक !

१ कुळ—अरेरे, मरणारा मरून गेला—

२ कुळ—पण बिचाऱ्याचीं पोरं बाळं उघडीं पडलीं कीं हो—

देभ—मेला-सुटला एकदाचा. Dead and gone, gone for ever !

धनानंद—( स्वगत ) मेला ! कोण मेला ! हें आहे तरी काय ?

१ कुळ—भर दोनप्रहरीं साप चावून कीं हो मेला.

२ कुळ—जन्मपत्रिकेंत होतंच तसं.

धनानंद—( स्वगत ) कुणाच्या ?

देभ—धनानंद ! धनानंद ! कुठं गेलांत हो ? Where have you been ?

धनानंद—( स्वगत ) अं ! म्हणजे ?

१ कुळ—एवढं मोठं घरदार—

२ कुळ—कुळांच्या माना मुरगळुन गोळा केलेला—

देभ—कदर्यूचा डेरा–शायलॉकचा रांजण-मारवाड्याची पोतडी !

१ कुळ—पण यांतली एक दमडी स्वतःसाठीं वापरली असेल तर शपथ..

२ कुळ—नशीबीं हवं ना ? तो जन्मदरिद्री पडला पक्का चिक्कू कद्र—

देभ—Yes, that cruel Jew in Shakespeare's Merchant of Venice.

धनानंद—( स्वगत ) असं ! एकूण हें सारं अस्मादिकांचंच पुराण चाललं आहे.

१ कुळ—बाकी तो मेला हें आम्हां कुळांच्या पथ्यावर पडलं.

२ कुळ—कोण लेक देतो आतां सावकारी बाकी ?

धनानंद—( स्वगत ) ठीक ! एकूण सालमजकुर शिल्लक बाकी ठीक !

देभ—धनानंद-धनानंद, कुठं आहांत हो ! Where have you been ?

धनानंद—( पुढें होऊन ) या इथं ! हा पहा चांगला जीता जागता आहे.

दयाळ—हे कोण कुठले राजश्री ?

धनानंद—म्हणजे ? मला ओळखलं नाहींत ! अहो तो मीच नव्हे का—?

दयाळ—कुठला पागल आला आहे. ( पागल येतो. )

पागल—अफसोसकी बात मेरा मालीक मर गया है !

धनानंद—याचा मालक मेला आणि मी कोण !

पागल—बाकी दिसूका माज्या मालका सारकोच दिसते.

दयाळ—उघडा पडला पोर बिचारा गोरख.

देभ—Just an orphan now. O Pity! Pity! ( गोरख येतो. )

गोरख—दादा—गेले, बाबा आपल्याला सोडून कीं हो गेले.

दयाळ—नको. नको रडूं असा. तं रडूं लागलास कीं मलाही हुंदका अनावर होतो. जनरूढीकडे पहा आणि दुःख गिळून टाक.

धनानंद—गोरख,—

गोरख—आपण कोण !

दयाळ—हा कोणी बेवकूफ भोंदु बुवा मघापासून बेछूटपणानं बरळत सुटला आहे मीच धनानंद असं.

गोरख—अस्सं ! मग पागल लगाव लाथ आणि खेंच बाहेर.

धनानंद—गोरख-गोरख, हें काय ! अरे मी तुझा बाप ना ?

गोरख—छे:, बिलकुल नाहीं. बाबा तर केव्हांच वारले.

दयाळ—हा पाहिलांत पुरावा ? ही मामांची जन्मपत्रिका. यांत त्यांच्या मरणाचं भविष्य स्पष्ट लिहिलं आहे. तसंच हें डॉक्टरचं सर्टीफिकेट. देभ वाचा.

देभ—( वाचतो ) " I certify that Mr. Dhananand is defunct." म्हणजे मेला—

धनानंद—काय मेला ? ठीक! एकूण सालमजकूर शिल्लक बाकी ठीक.

दयाळ—थांबा. हा आणखी पुरावा. ही गावांतील जादा वर्तमानपत्रांमधील बातमी. ' शोचनीय मृत्यू ' या सदराखालील त्यांचा मृत्युलेख !

देभ—Hopeless ! Quite hopeless ! काय झाली खात्री ?

धनानंद—कशी होईल ? तो पहा गयाळच येत आहे. तोच देईल माझी ओळख ( गयाळ येतो. )

गयाळ—कुठं आहे गोरख ? लेका, पोरी पळवून आणल्यास नाहीं ?

गोरख—कुणी तूं का मी ?

गयाळ—चल, त्या दोन मुली तरी स्वाधीन दे, नाहीं तर माझे पैसे तरी दे.

गोरख—मुली स्वाधीन द्यायला तयार आहे. पण कुठल्या ठाऊक आहे ! पहायला आल्यावेळीं पाहून पसंत केलेल्या त्या दोन.

गयाळ—त्या कशाला ?

गोरख—खेटरांची माळ करून तुझ्या गळ्यांत घालायला.

गयाळ—माझे आपले पैसेच दे कसे.

गोरख—कुणी घेतले ?

गयाळ—तुझ्या बापानें.

दयाळ—अरे, याचे बाबा वारले. बोल, तुला जायचं आहे त्यांच्या मागोमाग त्यांना भेटायला ?

धनानंद—कोण म्हणतो असं ? मी मेल्याचं हें काहूर आहे. गयाळ, आतां तूं तरी सांग. बोल, मी धनानंद ना ?

**गयाळ**—अरे हो-हा धनानंद.

**दयाळ**—होय काय ? नीट पहा. हा धनानंद नाहीं.

**धनानंद**—नाहीं कसा ? मीच धनानंद.

**गयाळ**—फिरून पाहूं द्या. अरेच्चा ! हाच धनानंद. धनानंद, पोरींच्या लग्नासाठीं म्हणून माझ्याकडून वीस हजारांचा चेक घेतला होतास ना ? दे माझे पैसे आतां परत.

**धनानंद**—( स्वगत ) अरेच्चा, हे पैसे जर याला परत दिले तर साल मजकूर शिल्लक बाकी ठीक. आतां उलटंच बोलावं. ( प्रकाश ) काय म्हणालास ? मी धनानंद ? छेः, चुकत असशील. अरे मी नव्हे धनानंद. पाहिजे असेल तर विचार या लोकांना. हेच सांगतील.

**दयाळ**—घ्या ही कबुली. ही जन्मपत्रिका, हें डॉक्टरचं सर्टीफिकेट, हा मृत्युलेख, आणि ही याची कबुली. आतां नक्की ठरलं. हे कांहीं माझे मामा नव्हत. हा कुणी तरी पाजी लफंग्या आहे.

**धनानंद**—( स्वगत ) ठीक. म्हणजे आतां माझी मलाच शंका येऊं लागली आहे कीं मी खरोखरच मेलों आहे कीं जीवंत आहे. ( आंत रडारड )

**दयाळ**—अरेरे, ही पोरक्या पोरींची रडारड ( दया, माया येतात )

**माया**—गोरख, गोरख, आपले बाबा आपल्याला सोडून कोरे गेले. अखेरीस भेटसुद्धां झाली नाहीं त्यांची.

**देभ**—धनानंद, धनानंद, Where have you been ?

**पागल**—अफसोसकी बात मेरा मालिक मर गया है !

**माया**—बाबा—बाबा—कुठं आम्हांला सोडून गेलांत हो.

**दयाळ**—नका, अशा रडूं नका. आजवर आपण थोडं कां रडलांत ? किती छळलं होतं मामांच्या चिक्कू स्वभावानं ? आतां वाईट काय झालं ? मजा करा. काय समजलांत ?

**गोरख**—मजाच मजा.

पिता न जिता राहिला । पैसा आला हातां आतां मौजे ना सीमा ॥ धृ० ॥ धन मम हातीं । मग मज भीती । जनाचि मनाचि कशाचि ना । किती झाला मना मोद या ॥ १ ॥ बस्स-मजा !

एक बंगला घेतों, फर्नीचर आणतों, मोटार खरेदी करतों, जुगार खेळतों, बस मजाच मजा! ताई-माई तुम्हां दोघींना माणीक-मोती, जडजवाहीर, फॅशनेबल ड्रेस, रिस्टवॉच, काय चाहील तें. बस मजाच मजा! साऱ्या कुळांना सूट देतों. जा, बस करा मजाच मजा! (कुळें जातात) गयाळ तुमचे वीस हजार रुपये. चेक देतो. बस जा मजा करा. (गयाळ जातो.)

देभ—अरे हो हो हो हो—wait a bit. लुटतोस कीं काय बाप जाद्याची इस्टेट? Your Shylock father's estate?

गोरख—अवघ्या पांच मिनटांत. मागं शिल्लक कांहीं रहातां नये! माझ्याच बापाच्या घरचा माल कीं नाहीं. त्याला काय हरकत आहे!

धनानंद—(स्वगत) छातीस धक्का बसला माझ्या. हें मी काय पहातों! काय ऐकतों?

दयाळ—(स्वगत) मामांच्या चर्येत असा पालट कां झाला? मात्रा लागू पडली वाटतं? द्यावेत आणखी असेच कांहीं वळसे कीं काम फत्ते.

गोरख—अहो देभ, बाबांनीं ही सारी इष्टेट साठवून ठेविली आहे ती कशाला? पश्चात् या पठ्याच्या चैनीलाच ना? मग काय? बस करा मजाच मजा!

धनानंद—(स्वगत) म्हणजे? पै पै करून पैदास झालेला पैसा बापाच्या पश्चात बेपरवा पोराकडून असाच उधळला जात असेलना? स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन आणि दुसऱ्याच्या पोटावर पाय देऊन, गोळा केलेल्या गंगाजळीची, होळीचे होळकर जमून, क्षणांत अशीच होळी होत असेल का? छेः छेः पहावत नाहीं हें दृश्य. ऐकवत नाहींत हे शब्द. डोळ्यापुढं अंधेरी आली. पाय लटलटूं लागले. धरा, मला कुणी-तरी धरा. (देभ व दयाळ धरतात. तो सावध होतो. गोरख, दया माया त्याचे पाय धरतात.)

गोरख—बाबा, क्षमा करा.

दया—आम्हां दोघींनाही.

धनानंद—उठा. बाळांनो, हा पुनर्जन्म दिल्याबद्दल मीच तुमची क्षमा मागायची. तुमचा चिक्कू कृपण बाप मेला, आणि हा नवा धना-

नंद आज नव्यानं जन्मास आला. आज माझे डोळे उघडले. उभ्या आयुष्यांत तिजोरीचा नुसता भारवाहक होण्यापलीकडे मी तरी काय कमावलं ! ना ऐहिक भोग ना पारमार्थिक पुण्यसंचय ! मुलींनो, तुमच्या बाबतींत मी किती घोर अपराधी आहें.

**गोरख**—पण बाबा त्याची कृतीनं भरपाई करतां येण्यासारखी आहे. ताईचं आमच्या दादावर आणि माईचं या देभवर प्रेम आहे. त्यांच्या विवाहाला—

**धनानंद**—माझी पूर्ण संमति आहे. गोरख, गोधन विक्रीच्या पापाचं क्षालन म्हणून मी आजपासून संन्यास घ्यायचं ठरवलं आहे.

**गोरख**—चला. हें आनंदवृत्त प्रथम मामांच्या कांनीं घालूं ( जातात. )

---

## प्रवेश तिसरा.

( गोमंदिराचा बहिर्भाग. मध्यभागीं शृंगारलेलं एक पोळ आहे. एका बाजूला हातांत सुरा असलेला रहीम व दुसऱ्या बाजूला रामानंद उभे आहेत. व्हालंटीअर्स व कांहीं हिंदुमुसलमान हजर आहेत असा देखावा. )

**रहीम**—रामानंद, गोपूर मुस्लीमजमातीतर्फे हा पोळ सोडायच्या कामीं माझी मनाई आहे. कारण, यांत मुसलमानांची हुरमत घ्यायचा तुमचा डाव आहे.

**राम**—ही आपली चुक आहे. उलट मुसलमानांकडून हरकत न होतां हा पोळ सुटला तर त्या योगं हिंदुमुसलमानांची एकी जगजाहीर व्हावी, हा माझा हेतु आहे. हिंदूना धार्मिक दृष्ट्या पवित्र असलेल्या गायीनं मुसलमानांचं असं काय घोडं मारलं आहे कीं हिंदुमुसलमानांच्या या एकीच्या प्रश्नांत मुसलमानानीं गोवधाचं घोडं असं जिथं तिथं दामटीत बसावं !

**रहीम**—मग माझाही एक सवाल आहे. हिंदूंची गायीविषयींची ही काय भावना आहे कीं त्यांनीं गोरक्षणाचं इतकं स्तोम माजवावं ! हे लोक गायीवर इतके काय भाळले आहेत, हेंच कोडं मला उलगडत नाहीं.

**राम**—मग हें कोडं ज्या क्षणीं उलगडेल त्याचक्षणीं आपण होऊनच ही हरकत मागं घ्याल आणि हिंदू मुसलमानांच्या एकीला संमति द्याल.

**रहीम**—पण ही गोष्ट मला पटवून द्यायची हिंमत तुलाच काय पण तुह्मां हिंदूंचा तो देव खालीं आला तरी त्यालाही नाहीं.

**राम**—ती पटायला प्रथम हिंदु मन पाहिजे–हिंदु हृदय पाहिजे.

**रहीम**—मग मी तर बोलून चालून मुसलमान. माझं मन मुसलमान. माझं हृदय मुसलमान. ही हिंदु भावना मला पटणंच शक्य नाहीं. आणि म्हणूनच गोवध बंदीला माझी हरकत आहे. रामानंद, एकच मनसुबा. बऱ्या बोलानं जाहीर मिरवणुकीचा हा बेत तूं एकदम रद्द कर. नाहींतर या हातांनीं, या सुरीनं, तुझ्या डोळ्यादेखत हा पोळ मी या इथं उभा चिरून काढीन.

**राम**—रहीम, संतापाचे चारच शब्द यावेळीं मी उच्चारले तरीही ती हिंसा होईल. म्हणून तुमचा तो परवरदिगार तुह्माला तशी दुर्बुद्धी न देवो इतकीच भगवंताजवळ मी करुणा भाकतों

**रहीम**—ही असली शुष्क बडबड ऐकत बसायची मला संवयच नाहीं. यावेळीं एकट्या अल्लाखेरीज कुणीही जरी इथं हजर झाला आणि त्यानं मला मनाई केली, तरी हा पोळ कापल्याखेरीज मी स्वाथ राहणार नाहीं. एक घांव दोन तुकडे हेंच या रहीमचें ब्रीद. घे याचं प्रत्यंतर. ( रहीम सुरा उगारून मारणार तोंच रोशन फातिमेला घेऊन येते. )

**रोशन**—थांब, भाई थांब. फेंक तो हातांतला सुरा खालीं आणि पहा इकडं या बाजूला केवढा भयंकर अनर्थ गुजरला आहे तो ! तुझी पाळलेली गाय ही फातिमा कापली जात होती.

**रहीम**—हा रहीम जीवंत असतांना कुणा दुष्मन हिंदु शिवाय हें धाडस करायची कुणाची छाती आहे ?

**रोशन**—दुष्मानाची झाली तरी हिंदु गाय कापतील, हें संभवतच नाहीं. कांहीं मुसलमान गुंड बरोबर घेऊन फाझल घरीं आला आणि आपल्या गोठ्यांत ही गाय ते मारणार तों मी मध्यें आड आलें. ही गाय रहीमभाईची प्यार आहे, हिला मारूं नका, असं त्यांना मी परोपरीनं विनवूं लागलें. पण ते कांहीं ऐकेनात. शेवटीं त्यांच्या हातीं पायीं पडून, पाहिजे तर रहीम समक्ष हिची हत्या करा असं सांगून, हिला घेऊन मी तुझ्याकडे यायला निघालें. तों वाटेंत आणखी मुसलमानांच्या झुंडी या

गायीवर लोटल्या मी एकटी घाबरून गेलें. इतक्यांत त्या ठिकाणीं मिर्झा साहेब आले. त्यांनीं मोठ्या शिकस्तीनं बेफाम झालेला तो सारा जमाव थोपवून धरला आणि मी मोठ्या मुष्किलीनं वाट काढून ही गाय घेऊन तुझ्याकडे आलें. ते पहा–ते पहा. मुसलमान किती खवळले आहेत ते. पुढं मिर्झासाहेब आणि तो सारा जमाव मागं. हे इकडेसच आले. ( दीन दीन ओरडत सारे मुसलमान व मिर्झासाहेब येतात. )

**मुसलमान**—दीन–दीन ! चला व्हा पुढं. आणि तुकडे तुकडे करा या गायीचे.

**मिर्झा**—थांबा, भाईनों, थांबा. या गायीचे तुकडे तुकडे करून हिंदु-मुसलमानांच्या एकीचे असे तुकडे कां करतां ? हिंदु लोक गायीला माता असं म्हणतात. हिंदूंच्या या गायीवर होणारी प्रत्येक जखम म्हणजे हिंदु-मुसलमानांच्या हिंद भूमातेवर होणारी भयंकर जखम आहे, असंच आपण समजा ! धर्माच्या नावाखालीं उगाच डोकीं फिरवून आणि आपापसांत दुही माजवून काय होणार आहे कुणाचा फायदा ? आज कदाचित् हिंदु मरतील. उद्यां आपणही मराल. हा आपला आणि आपल्या देशाचा अधःपात टाळायचा असेल, तर ही आत्मविनाशाची बुद्धि टाका आणि या वेळीं मागं व्हा !– पहा. पहा.–ही गाय कशी केविलवाण्या मुद्रेनं पहात आहे ती ! भाईनो, ही गाय आपल्याकडे पहात नाहीं तर अखिल भारतभू या केविलवाण्या नजरेनं आपल्याकडे पहात असून, आपल्याला मागं व्हायची याचना करीत आहे, असं समजा आणि मागं व्हा—

**मुसलमान**—मिर्झासाहेब, आपलं म्हणणं आम्हाला बिलकुल पसंत नाहीं. आपला मान आपण राखून घ्या आणि आपणच मागं व्हा. कुठं आहे ती गाय ? खेंचा पुढं. ( कांहीं मुसलमान गायीकडे धांवत येतात. )

**रहीम**—खबदार ! खबरदार या गायीला हात लावाल तर. सोडा हिला.

**मिर्झा**—( स्वगत ) अरेच्चा, हें काय ?

**रोशन**—( स्वगत ) ठीक झालं ! ( कांहीं मुसलमान पुढें होतात. )

**रहीम**—खबरदार ! या फतिमेभोंवतीं माझ्या जीवाचा कोट आहे ! देहाची ढाल आहे ! मी जीवंत या जागीं उभा असताना कोण समर्थ

आहे या फतिमेच्या अंगावर वार करायला ? [ हातांत सुरी घेऊन फाजल येतो ]

**फाजल**—मी !—आपला लाडका मुलगा हा फाजल !—

**रहीम**—कोण ? फाजल ? माझा हुकूम मोडून तूं ही गाय मारणार ?

**फाजल**—छेः, आपला हुकूम अक्षरशः पाळून. बाबा, गोपूर मुस्लीम जमातीचा हुकूम मी अक्षरशः पाळावा, अशी आपणच माझ्याकडून शपथ घेवविली आहे ना ? मग त्या शपथेच्या आड येऊन आज प्रत्यक्ष आपणही माझा हात धरूं शकत नाहीं—

**रहीम**—मग तुझा असा हात धरूनच—

**फाजल**—एक रेसभरही मागं खेंचाल तर त्यापूर्वीं या सुरीनं या गायीची गर्दन धडा वेगळी होईल.

**रहीम**—मग प्रथम तुझीच गर्दन छाटून या गायीची गर्दन मला बचावली पाहिजे.

**रोशन**—रहीमभाई, या गायीची गर्दन बचावली पाहिजे, ही गो॰ तुझ्याइतकीच मलाही पटते. पण या गायीचे प्राण वाचवायचं पुण्यकर्म करीत असतां, पुत्रहत्येचं केवढं घोर पातक तुझ्या हातून होत आहे, याचा विचार कर. पित्याचं नांव सांगून कसाबाची कृति करणाऱ्या पाषाणा, पहा–पहा– तुझ्या पोटीं जन्मास आलेला, तुझ्या कुळाचं नांव सांगणारा, तुझ्या धर्माची ध्वजा हातीं घेऊन वीर वृत्तीनं मरायला तयार झालेला, हा सत्यव्रत बालक पहा. या निरपराधी मुलाची हत्या करून का तूं ही गाय वाचवणार ?

**रहीम**—होय. या फाझलची हत्या करुनच मी ही गाय वाचवणार. वेळ आलीच तर धर्मही झुगारून देईन, फाझललाही सोडीन, पण ही फतिमा मात्र मी गमावणार नाहीं.

**राम**—रहीम, आपण धर्मानं अस्सल मुसलमान! नित्य गोवध करणारे स्वतः हिंदूंच्या गोरक्षण चळवळीविरूद्ध. असं असतां या गायीचा जीव वाचवायसाठीं प्रत्यक्ष मुलाचा बळी द्यायला निघालांत, हें कसं ?

**रहीम**—रामानंद, एका जिवावरच्या दुखण्यांत मी आसन्न मरण स्थितींत असतां त्या अपंग स्थितींत आपल्या दुधावर मला जगवलं या

फतिमेनं. ही फातिमा मला माझ्या ठिकाणीं आहे आणि तेव्हांपासून तिच्यावर माझं माइतकंच किंबहुना मापेक्षांही जास्त प्रेम आहे.

**राम**—रहीम, मग हिंदुलोक गोरक्षण करतात तेंही याच भावनेनं. हिंदुंची गायी विषयींची काय भावना आहे हें आपल्याला ऐकायचं होतं ना ? मग ऐका. या एका गायीविषयीं जी आपली एकट्याची भावना तीच साऱ्या गायींविषयीं साऱ्या हिंदूंची भावना !

**मुसलमान**—भाईहो, या काफीर लोकांचे–साऱ्यांचे तुकडे केल्याशिवाय ही गाय हातीं यायची नाहीं. म्हणून चला, पुढं व्हा—

**रहीम**—एक पाऊल टाकाल तर आपलं स्वतःचंच नुकसान करून घ्याल.

**राम**—थांबा, माझ्या मुसलमान भाईनों, एक क्षणभरच थांबा. रहीम, काय होईल फायदा आपल्या या अत्याचारी वृत्तीनं ? आपण मराल, आपल्या जातभाईंना माराल, आणि शेवटीं आपण मरतांच ही गायही मरेल. ही गाय जीवंत रहावी एवढीचना आपली इच्छा. मग तें काम मी करून दाखवतों.

**रहीम**—इतकं करशील तर मी तुझा जन्माचा दास होऊन राहीन.

**राम**—मग फेंक तो छुरा आणि हो बाजूला. फाजल, बोल ही गाय तूं मारणार ?

**फाजल**—हो. अलबत.

**राम**—कां ?

**फाजल**—असं मुस्लीम जमातीनं ठरविलं आहे म्हणून.

**राम**—पण जमातीनं असं कां ठरविलं आहे, माहिती आहे ?

**फाजल**—होय. पोळ सोडायला हिंदूंना मनाई करतां यावी म्हणून.

**राम**—मग हिंदूंनीं हा पोळ सोडायचा बेत रद्द केला तर गोवध बंद होईल ? ही गाय सुटेल.

**फाजल**—हो, खात्रीनं. या घटकेला.

**राम**—मग साऱ्या हिंदूंच्या वतीनं जाहीर करतों कीं जमातीच्या इच्छेविरुद्ध हा पोळ सोडायचा बेत रद्द झाला आहे. झालं काम ? मग सोड ही गाय.

**फाजल**—ही पहा गाय सुटली.

**राम**—रहीम, आपली गाय आपल्या ताब्यांत घ्या.

**रहीम**—रामानंद, तूं देव कीं सैतान असा आजवर मला प्रश्न होता. पण आज याक्षणीं खात्री पटली कीं तूं सैतान नसून देव आहेस. जातीचा अस्सल मुसलमान एका अल्ला खेरीज कुणापुढंही हात जोडीत नाहीं. तसं नसतं तर या वेळीं मी तुला साष्टांग नमस्कार घातला असता. रामानंद, हिंदूंची गायीविषयींची भावना मला तंतोतंत पटली. याउपर मी स्वतः तर गोवध करणार नाहींच, पण इतर मुसलमानांनींही तो करूं नये, अशीच खटपट करीन ! चला, या मला आपल्याला कडकडून भेटूं दे. [ दोघे भेटतात. ]

**मिर्झा**—राम रहीमच्या या भेटींतच हिंदु मुसलमानांची एकी आ[ज] दृढ झाली.

**रोशन**—खरंच, राम-रहीम एक होत, हें संत कबीराचं गीतच सत्य ठरलं. पण कबीराच्या वेषांत हा कोण ? गोरख—( गोरख कबीराच्या वेषांत येतो. )

**गोरख**—'राम-रहीम करीमा केशव । अलख नाम एक साचा है ॥धृ॥ जिसकूं तुम बिसमिल्ला कहते । विष्णु हमारे सोई है ॥ १ ॥'

**मिर्झा**—या गोपुर पुरतं पाहिलं तर हिंदु मुसलमानांच्या एकीचं येथी[ल] कार्य पुरं झालं.

**राम**—तसंच पोळ सोडूनही गोरक्षणाचं जें कार्य झालं नसतं, तें पोळ न सोडताहीं आज अस्सं घडून आलं. ( घनानंद, देभ, दया, माया, येतात )

**गोरख**—( कबीराचा वेष टाकून ) आणि मामा माझंही गोरक्षणाचं कार्य यशस्वी झालं. या पहा सोडवून आणलेल्या दोन गाई. ताईचं दादाशीं व माईचं देभशीं लग्न ठरून बाबांची त्याला संमति मिळाली आ[हे].

**दयाळ**—आणि संन्यास घेऊन मामा आपल्या गोरक्षण चळवळीस येऊन मिळाले आहेत—

**राम**—अरे पण हें सारं झालं कसं !

**दयाळ**—इथं वेळ लागेल. घरीं चला म्हणजे सांगतों.

**राम**—असो. जिच्या प्रसादानं, आपणां सर्व्यांना हें यश मिळालं त्या गोमातेचा जयजयकार करूं ! श्रीगोमाताकी जय ! भारतमाताकी जय ! हिंदुमुसलमानकी जय !

---